भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च २०२४ ला संपलेल्या कालावधीचा अहवाल....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक, क्रमांक क. भानिम २०२६ / प्र.क्र. ६३ /लोलेस,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक १४ जुलै, २०२६.

परिपत्रक

संदर्भ :- शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक भानिम १२००/प्र.क्र.२०५ / लोलेस दि.१८ जानेवारी २००१.

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च २०२४ ला संपलेल्या कालावधीचा अहवाल. महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची एक प्रत PDF स्वरुपात या परिपत्रकासोबत आवश्यक त्या समयबद्ध कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.सदर अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयाच्या https://cag.gov.in/ag/nagpur/en या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२. संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचीत करण्यात येते की,भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक याचां मार्च २०२४ रोजी संपलेल्या कालावधीचा अहवालात त्यांच्या विभागाशी / कार्यासनांशी संबंधित मुद्यांसंदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती , संबंधित विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने तसेच प्रधान महालेखापाल कार्यालयाची संमती (Vetting) करुन घेऊन परस्पर लोक लेखा समिती कक्ष,विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई,यांच्याकडे पाठविण्यात याव्यात व त्याची एक प्रत या कार्यासनास अग्रेषित करावी. तदनंतर विभागातील संबंधीत कार्यासनांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या प्रती या कार्यासनास सादर कराव्यात.सदर अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या प्रती तीन महिन्यांच्या विहित मुदतीत लोक लेखा समितीस सादर करण्यात याव्यात.

३. लोक लेखा समितीच्या यापूर्वी झालेल्या साक्षींदरम्यान प्रशासकीय विभागांकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने पाठविण्याबाबत होणारा विलंब आणि त्यामध्ये असलेल्या त्रुटी यांचा लोक लेखा समितीने गांभिर्यपूर्वक विचार केलेला आहे व त्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. यास्तव या विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १८ जानेवारी, २००१ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे कोटेकोरपणे पालन करावे, तसेच खालील सूचना प्रकर्षाने ध्यानात घ्याव्यात.

I स्पष्टीकरणात्मक ज्ञापने परिपूर्ण आणि स्वयंस्पष्ट असावीत. त्यामध्ये चूकीची माहिती दिलेली नसावी. स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या २० इंग्रजी प्रती व तसेच ४० मराठी प्रती लोक लेखा समिती, विधानमंडळ सचिवालयास पाठवाव्यात. तसेच त्या पत्राची व स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची प्रत्येकी १ प्रत लोलेस कार्यासन, वित्त विभाग यांचेकडे पाठवावी

II. उपरोक्त प्रयोजनासाठी विभाग प्रमुखांकडून/नियंत्रण अधिकाऱ्यांकडून काही माहिती मागविणे आवश्यक असेल तर ती माहिती "अत्यंत तातडीने पाठवावी" अशी त्यांना सूचना करावी.

III.या मध्ये क्षेत्रीय कार्यालयांकडून दिरंगाई झाल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती संबंधित सचिवांच्या तात्काळ निदर्शनास आणावी.

IV. कोणत्याही परिस्थितीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोक लेखा समितीकडे पाठविण्याबाबत विलंब होता कामा नये, याची सर्व संबंधीत विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी.

V. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून लोक लेखा समितीला स्पष्टीकरणात्मक ज्ञापने फार विलंबाने प्राप्त होतात. याबाबत लोक लेखा समितीच्या अध्यक्षांनी शासनाकडे वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे लोक लेखा समिती विषयक कामकाज गांभिर्याने व तत्परतेने हाताळण्यात यावे.

४. यासंदर्भात असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सदर अहवालातील परिच्छेदांची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापालांच्या मान्यतेने लोक लेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांच्याकडे व त्याची एक प्रत वित्त विभागाकडे विहित मुदतीत पाठविण्यास संबंधितांकडून विलंब झाला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७१४१५१९११९४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.07.14 15:22:03 +05'30'

(रविकुमार लिंगनवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- अहवालाची प्रत PDF स्वरुपात.(online)

प्रतिः- सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई -३२
सर्व सह सचिव / उप सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत :- माहितीसाठी:-
संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई.
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)- १, महाराष्ट्र मुंबई
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ महाराष्ट्र मुंबई
उप सचिव, लोक लेखा समिती कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA
लोकहितार्थ सत्यनिष्ठा
Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा
मार्च 2024 ला संपलेल्या कालावधीचा अहवाल
Report of the Comptroller and Auditor General of India
for the period ended March 2024

Marathi

English

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra

2026 चा अहवाल क्रमांक 4
Report No. 4 of 2026

(अनुपालन लेखापरीक्षा - नागरी)
(Compliance Audit – Civil)

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA

लोकहितार्थ सत्यनिष्ठा

Dedicated to Truth in Public Interest

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च 2024 ला संपलेल्या कालावधीचा अहवाल

महाराष्ट्र शासन

2026 चा अहवाल क्रमांक 4

(अनुपालन लेखापरीक्षा - नागरी)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांचा
मार्च 2024 ला संपलेल्या कालावधीचा
अहवाल

महाराष्ट्र शासन
2026 चा अहवाल क्रमांक 4
(अनुपालन लेखापरीक्षा - नागरी)

अनुक्रमणिका

उपोद्घात

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षासाठी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांकडे सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 आणि त्याअंतर्गत जारी केलेल्या लेखापरीक्षण आणि लेखा विनियम, 2020 च्या तरतुदींनुसार केलेल्या राज्य शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणाचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष समाविष्ट आहेत.

या अहवालात नमूद केलेली प्रकरणे ही वर्ष 2023-24 या कालावधीसंबंधी चाचणी लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आलेल्या तसेच जी मागील वर्षांत निदर्शनास आली परंतु मागील लेखापरीक्षा अहवालांमध्ये नोंदवता आली नाही, अशा प्रकरणांपैकी आहेत. जिथे आवश्यक असेल तिथे, 2023-24 नंतरच्या कालावधीशी संबंधित प्रकरणे देखील समाविष्ट करण्यात आली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकानुसार (मार्च 2017) हे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.

कार्यकारी सारांश

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल, महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या शासकीय विभाग आणि महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवणाऱ्या बाबींशी संबंधित आहे.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारीणीला सुधारात्मक कृती करण्यास सक्षम करणे आणि धोरणे आणि निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संस्थेच्या कार्यचालन कार्यक्षमतेत आणि वित्तीय व्यवस्थापनात सुधारणा होईल व प्रशासनाला सुद्रुढ करण्यास हातभार लागेल.

या अहवालात **'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण' या विषयावरील एक विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण,** एक **'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' या विषयावरील माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षण** आणि पाच **स्वतंत्र लेखापरीक्षण परिच्छेदांचा** समावेश आहे.

'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाचे' विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण

महाराष्ट्रात 50,858 चौरस किमी वनक्षेत्र आहे. ज्यामध्ये 9,865.62 चौरस किमी अतिशय दाट जंगल, 21,577.79 चौरस किमी मध्यम घन जंगल आणि 19,415.12 चौरस किमी खुले जंगल आहे. कोणत्याही विकास प्रकल्पासाठी वनजमिनीची आवश्यकता असल्यास, वापरकर्ता संस्थेला पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून (एमओईएफ ॲन्ड सीसी) मंजुरी घ्यावी लागेल आणि एमओईएफ ॲन्ड सीसी द्वारे विहित केलेल्या राज्य भरपाई वनीकरण निधीमध्ये भरपाई वनीकरणा साठी रकमेच्या स्वरूपात भरपाई द्यावी लागेल. महाराष्ट्र भरपाई वनीकरण नियोजन आणि व्यवस्थापन प्राधिकरण (महा-कॅम्पा) हे वनजमिन गैर-वन वापरासाठी वळवल्यामुळे जंगल आणि झाडांचे नुकसान भरपाई करण्यासाठी भरपाई वनीकरण उपक्रम राबवुन राज्य भरपाई वनीकरण निधीचे व्यवस्थापन आणि वापर करेल.

ऑगस्ट 2024 ते फेब्रुवारी 2025 या कालावधीत 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी महा कॅम्पा वरील एसएससीए घेण्यात आला. एसएससीएचे निष्कर्ष, शिफारशींसह, खाली दिलेले आहेत:

- महा कॅम्पा भरपाई वनीकरण अंतर्गत नियोजित उपक्रमांपैकी केवळ 47.37 *टक्के* साध्य करू शकले आणि वार्षिक संचालन योजना (एपीओ) तयार करण्यात, सादर करण्यात आणि मंजुरी देण्यात झालेल्या विलंबामुळे एपीओ मध्ये मंजूर रकमेच्या केवळ 42.48 *टक्के* रक्कम खर्च होवु शकली.

- 11 विभागांमधील 60 प्रकल्पांमध्ये, वळवण्यात आलेल्या 4,168.01 हेक्टर वनजमीनसाठी, भरपाई वनीकरण हे अपेक्षित असलेल्या बिगर-वनजमीनऐवजी 3,777.33 हेक्टर वनजमिनीवरच नियोजित/पूर्ण केले गेले.

- चुकीच्या जागेची निवड आणि मंजूर जमीन इतर वृक्षारोपण योजनांसाठी वळवल्यामुळे 2,592.73 हेक्टर जमिनीवरील भरपाई वनीकरण हाती घेता आले नाही.

- मार्च 2024 पर्यंत, भरपाई वनीकरणासाठी प्राप्त झालेली 5,727.243 हेक्टर बिगर-वन जमीन राखीव वन किंवा संरक्षित वन म्हणून अधिसूचित केली गेली नव्हती, त्यामुळे ती 'भारतीय वन कायदा, 1927' च्या कायदेशीर संरचनेतुन आणि संरक्षणातून बाहेर राहिली.

- ₹ 94.69 कोटीचा कॅम्पा निधी अर्थसंकल्प योजनांच्या अंमलबजावणीसाठी अनियमितपणे वळवला. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी एपीओमध्ये नसलेली ₹ 40.37 कोटीची कामे अनधिकृतपणे केली.

- वापरकर्ता एजन्सींकडून राष्ट्रीय प्राधिकरणाला भरपाई वनीकरणासाठी रकमेचे अनियमित प्रेषण आणि जमा केलेल्या रकमेच्या विलंबित प्रेषणासाठी ₹ 40.80 कोटीचे राष्ट्रीय प्राधिकरणाकडून व्याज न मिळणे.

- महा-कॅम्पाने गोरेवाडा प्राणीसंग्रहालयात रेस्क्यू सेंटर (प्राणी बचाव केंद्र) उभारण्यासाठी 2021-22 आणि 2022-23 या कालावधीत महाराष्ट्र वन

विकास महामंडळाला ₹ 5.50 कोटी सीएएफ नियम, 2018 चे उल्लंघन करून वितरित केले.

- नियामक मंडळ निष्क्रिय होते आणि सुकाणू समिती व कार्यकारी समितीने नियमित बैठका न घेतल्यामुळे महा-कॅम्पाच्या कार्यकलापावर अपुरी देखरेख झाली.

लेखापरीक्षण शिफारस करते की:

- *महा-कॅम्पाने निर्धारित वेळेनुसार आणि जबाबदारीसह एक अंतर्गत नियोजन दिनदर्शिका तयार करावी जेणेकरून निर्धारित देय तारखांना राष्ट्रीय प्राधिकरणाकडे एपीओ सादर केले जातील आणि मंजूर वेळापत्रकानुसार निधी जारी केला जाईल.*
- *विभागाने संयुक्त स्थळ तपासणी आणि भू-संदर्भाच्या आधारे योग्य बिगर-वन जमिनीची सत्यापित भु-बँक तयार आणि कार्यान्वित करावी, जेणेकरून विहित केलेल्या एक वर्षात किंवा दोन हंगामात भरपाई वनीकरण वेळेवर पूर्ण होईल.*
- *सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 4 नुसार वापरकर्ता संस्थांद्वारे सर्व भरपाई वनीकरण मिळकत राष्ट्रीय कॅम्पा निधीत जमा करणे बंद करून थेट राज्य कॅम्पा निधीमध्ये जमा केल्या जातील याची खात्री करण्यासाठी शासनाने आवश्यक निर्देश जारी करावे.*
- *महा कॅम्पाने एक औपचारिक गुंतवणूक धोरण तयार करावे व अंमलात आणावे आणि अतिरिक्त शिल्लक सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 26 आणि 30 नुसार शासकीय प्रतीभुती किंवा शेड्यूल्ड बँकांच्या मुदत ठेवींमध्ये गुंतवणुक करावी.*
- *महा कॅम्पाच्या नियामक मंडळ, सुकाणू समिती आणि कार्यकारी समितीच्या बैठकी विहित कालावधीमध्ये बोलावल्या जाव्या आणि देखरेख व अंतर्गत नियंत्रणे मजबूत करण्यासाठी भौतिक प्रगती, निधीचा वापर आणि अभिलेख देखभालीचा आढावा घेण्याचे आदेश दिले जावे.*

'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' चे माहिती तंत्रज्ञान (आयटी) लेखापरीक्षण

1996-1997 पासून महाराष्ट्र शासनाने त्यांच्या विभागांसाठी विविध मॉड्यूल विकसित करून संगणकीकरण सुरू केले. भारत सरकारने (मे 2007) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाद्वारे एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) अंमलात आणण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्र शासनाने एप्रिल 2008 पासून अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि देखरेख कार्ये, शासनाच्या खर्चाचा लेखाजोखा आणि कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनासह इतर वैयक्तिक दाव्यांचे स्वयंचलितीकरण करण्याची कारवाई सुरू केली. ही कार्ये पाच वेब-सक्षम मॉड्यूलच्या विकासासह स्वयंचलित आणि एकत्रित केली गेली. महाकोश पोर्टल वित्त विभागाने विकसित केलेल्या विविध अनुप्रयोगांच्या लिंक्स प्रदान करते. आयएफएमएस मध्ये सामान्यत: अर्थसंकल्प, ट्रेझरी, बिल/पेमेंट प्रक्रिया, प्राप्ती लेखा, निवृत्तीवेतन व्यवस्थापन, सेवार्थ मॉड्यूलद्वारे वेतन व्यवस्थापन हे मॉड्यूल आहेत ज्यामध्ये पाच उप-मॉड्यूल आहेत.

आयएफएमएस वरील आयटी लेखापरीक्षण 2018-19 ते 2023-24 या कालावधीत हाती घेण्यात आले. आयटी लेखापरीक्षणाचे निष्कर्ष खाली सारांशित केले आहेत:

- लेखापरीक्षणामध्ये सेवा स्तर करार (एसएलए) मध्ये नमूद केलेल्या प्रमुख घटकांच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आढळून आल्या. परफॉर्मन्स मॉनिटरिंग टूल्स (पीएमटी) आणि पॅकेज की इन्फ्रास्ट्रक्चर विकसित आणि तैनात करण्यात अयशस्वी झाल्यामुळे प्रकल्प देखरेख आणि डेटा सुरक्षा दोन्हीशी तड्जोड झाली.

- आयएफएमएस इन्फ्रास्ट्रक्चर मध्यवर्ती होस्ट केलेले आणि भौतिकदृष्ट्या सुरक्षित असले तरीहि, परवाना नसलेल्या सॉफ्टवेअरचा वापर, सॉफ्टवेअर इंस्टॉलेशनवर निर्बंधांचा अभाव आणि युएसबी सारख्या बाह्य उपकरणांचा अनिर्बंध इत्यादीमुळे क्लायंट पातळीवर असंवेदंशील/भेद्य होते.

- मुख्य कार्यप्रणाली (की मॉड्यूल्स) मध्ये द्वि-घटक प्रमाणीकरण आणि एन्क्रिप्शनचा अभाव, पासवर्ड धोरणांची अपुरी अंमलबजावणी, वापरकर्ता खाते लॉकआउट यंत्रणेचा अभाव आणि अयोग्य भूमिका व वापरकर्ता

व्यवस्थापन यासारख्या अनेक गंभीर सुरक्षा आणि प्रवेश नियंत्रणात कमकुवतपणा होत्या.

- लेखापरीक्षणामध्ये वापरकर्ता स्तर आवश्यकतांचे अपुरे मूल्यांकन आढळून आले, ज्यामुळे बिल तयार करण्यासाठी मानवीय हस्तक्षेप झाला.
- विविध मॉड्यूल्समध्ये डेटा अखंडतेमध्ये काही कमतरता आहेत उदा., मास्टरमध्ये परिभाषित नसलेल्या अनुदान प्रकारातील वस्तूंवर मंजुरी, प्रमाणीकरण नियंत्रणे उदा., विशेषतः अद्‌वितीय संमिश्र की मर्यादा.
- ही प्रणाली मास्टर आणि ट्रान्झॅक्शनल डेटामधील महत्त्वपूर्ण संदर्भिय एकात्मकता तपासणीची अंमलबजावणी करत नाही. मास्टर टेबल्समधील डुप्लिकेट नोंदी, नोंदणीकृत नसलेल्या किंवा दुबार लाभार्थ्यांच्या दाव्यांवर प्रक्रिया करणे आणि संदर्भीय व संयुक्तिक की बंधनांचा अभाव यामुळे आर्थिक व्यवहारांच्या विश्वासार्हतेशी तडजोड झाली.
- विभागाने आयएफएमएस मॉड्यूल्सच्या प्रभावी आणि कार्यक्षम वापरासाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण केले नाही. नियतकालिक प्रशिक्षणाचा अभाव आपत्ती पुनर्प्राप्ती (डीआर) योजनांच्या प्रभावीतेबद्‌दल चिंता निर्माण करतो.

लेखापरीक्षण शिफारस करते की:

- *प्रकल्पाच्या उर्वरित घटकांची पूर्तता सुनिश्चित करावी.*
- *महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण 2011 नुसार तार्किक प्रवेश नियंत्रणे असावीत.*
- *आयएफएमएसच्या कामगिरीचे नियमितपणे मूल्यांकन करण्यासाठी एक मजबूत अभिप्राय यंत्रणा सुनिश्चित करावी.*
- *डेटा अखंडतेसाठी पुरेसी अनुप्रयोग नियंत्रणे असावीत.*

इतर अनुपालन लेखापरीक्षा निरीक्षण

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या लेखापरीक्षणादरम्यान, आढळून आलेले प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

- ‘सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील 53 गावांना पाणी पुरवठा’ बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल चुकीचा बनविल्यामुळे ₹ 94.39 कोटींचा वायफळ खर्च आणि पाणी पुरवठा योजना भौतिकरित्या पूर्ण होऊनही सुरू न होणे.
- महावितरणाचे ₹ 7.77 कोटी थकीत असल्याने बाधीत झालेल्या विद्‌युत पुरवठ्यामुळे बीड पाणी पुरवठा योजनेसाठी खरेदी केलेली पंपिंग यंत्रसामग्री निष्क्रिय राहिली आणि ₹ 97.28 लाखांचा खर्च निष्फळ ठरला.

सार्वजनिक बांधकाम विभाग

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखापरीक्षणादरम्यान, आढळून आलेले प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

- स्थानिक संस्था, नगरपरिषदा आणि इतर शासकीय विभागांकडून, सविस्तर आराखडे, अंदाजपत्रके तयार करण्यासाठी किंवा तांत्रिक मान्यता देण्यासाठी, आकारण्यात येणाऱ्या ₹ 21.73 कोटी शुल्काचे, सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये अनियमित वितरण.
- सवलत करारात तरतुद नसताना टप्प्याच्या शीघ्र साध्यतेसाठी सवलतधारकाला ₹ 1.34 कोटी बोनसचे अनियमित प्रदान.

संचालक, विमान वाहतूक (सामान्य प्रशासन विभाग)

संचालक, विमान वाहतूक (सामान्य प्रशासन विभाग) यांच्या लेखापरीक्षणादरम्यान प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आढळले:

- एच-145 हेलिकॉप्टरसाठी देखभाल, दुरुस्ती आणि तपासणी एजन्सीच्या नियुक्तीला विलंब झाल्यामुळे ₹ 2.07 कोटींचा टाळता येण्याजोगा खर्च.

प्रकरण-I

प्रस्तावना

प्रकरण I

प्रस्तावना

1.1 या अहवालासंबंधी

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थां यांच्या खर्चाच्या अनुपालन लेखापरीक्षणातून निदर्शनास आलेल्या प्रकरणांशी संबंधित आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निर्देशांतर्गत कार्यालय, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई आणि कार्यालय, महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर त्यांच्या अधिकारक्षेत्राअंतर्गत येणारे विविध शासकीय विभाग आणि कार्यालये, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम (लेखापरीक्षीत संस्था) यांचे लेखापरीक्षण करतात. **तक्ता 1.1** मध्ये दाखविल्याप्रमाणे प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा-II), नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात प्रत्येकी आठ समुह येतात.

तक्ता 1.1: लेखापरीक्षण अधिकारक्षेत्रांची समुह-निहाय विभागणी

अ. क्र.	प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-I), महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे समुह	महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणारे समुह
1	आरोग्य व कल्याण	ऊर्जा व शक्ती
2	शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार	उद्योग व वाणिज्य
3	ग्रामीण विकास	वाहतूक
4	कृषी, अन्न आणि संबंधित उद्योग	पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान
5	जल संपदा	सार्वजनिक बांधकाम
6	नगर विकास	वित्त
7	संस्कृती व पर्यटन	माहिती तंत्रज्ञान व संचार
8	सामान्य प्रशासन	कायदा व सुव्यवस्था

या कार्यालयाने लेखापरीक्षण केलेल्या विभागांची, स्वायत्त संस्थांची आणि सार्वजनिक उपक्रमांची समुह निहाय यादी खालील **तक्ता 1.2** मध्ये दर्शविली आहे आणि तपशील ***परिशिष्ट 1.1*** मध्ये दिला आहे.

तक्ता 1.2: या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केलेले समूह-निहाय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम

समूहाचे नाव	विभागांची संख्या	स्वायत्त संस्थांची संख्या	सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची संख्या
ऊर्जा आणि शक्ती	1	2	8
उद्योग आणि वाणिज्य	1	1	29
वाहतूक	2	1	6
पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान	2	3	4
सार्वजनिक बांधकाम	2	1	16
वित्त*	2	-	4
माहिती तंत्रज्ञान व संचार	1	-	1
कायदा व सुव्यवस्था	2	2	1
एकूण	**13**	**10**	**69**

* *या अहवालात वित्त समूहाचा समावेश नाही*

हा अहवाल महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात समूहामध्ये 11 विभाग आणि दहा स्वायत्त संस्थांमधील निवडक युनिटच्या खर्चाच्या लेखापरीक्षणातून निदर्शनास आलेल्या लेखापरीक्षण निरीक्षणांशी संबंधित आहे. महसूल क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वित्त समूहाच्या लेखापरीक्षणावरील आणि वाणिज्यिक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांच्या लेखापरीक्षणावरील लेखापरीक्षण निरीक्षणे स्वतंत्र अहवालांद्वारे स्वतंत्रपणे नोंदवली जात आहेत.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा मुख्य उद्देश आहे. लेखापरीक्षण मानकांनुसार अहवाल देण्याच्या गुणवत्तेचा स्तर हा व्यवहारांचे स्वरूप, व्याप्ती आणि परिमाण यांच्याशी सुसंगत असायला पाहिजे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती तसेच धोरणे व निर्देश तयार करण्यास सक्षम करणे अपेक्षित आहे, ज्यामुळे संस्थांची कार्यक्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारले जाईल. अशाप्रकारे, चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

1.2 लेखापरीक्षीत घटकांची रुपरेखा

राज्यातील सचिवालय स्तरावरील विभागांचे प्रमुख, अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव असतात आणि त्यांना संचालक/आयुक्त आणि अधिनस्थ

अधिकारी सहाय्य करतात. मागील वर्षाच्या तुलनेत वर्ष 2023-24 मधील राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांचा सारांश **तक्ता 1.3** मध्ये दिला आहे.

तक्ता 1.3: 2022-23 च्या तुलनेत 2023-24 मधील राजकोषीय व्यवहारांचा सारांश

(*₹ कोटी मध्ये*)

प्राप्ती	2022-23	2023-24	संवितरण	2022-23	2023-24
विभाग-अ: महसूल खाते					
महसूली जमा			महसूली खर्च		
स्वतःचा कर महसूल	2,77,486.31	3,02,343.37	सामान्य सेवा	1,30,590.81	1,39,874.71
करेतर महसूल	16,776.41	20,857.94	सामाजिक सेवा	1,63,329.16	1,89,224.05
केंद्रीय कर/ शुल्कांचा वाटा	60,000.97	71,349.75	आर्थिक सेवा	80,819.94	83,363.03
भारत सरकार कडून सहायक अनुदान	51,414.24	36,045.40	सहायक अनुदान आणि योगदान	32,874.49	31,888.67
एकूण विभाग-अ महसूल जमा	**4,05,677.93**	**4,30,596.46**	**एकूण विभाग-अ महसूल खर्च**	**4,07,614.40**	**4,44,350.46**
विभाग-ब: भांडवली खाते आणि अन्य					
विविध भांडवली प्राप्ती	0	0	भांडवली परिव्यय	61,643.61	72,573.40
			सामान्य सेवा	3,526.56	5,579.89
			सामाजिक सेवा	9,134.20	15,243.68
			आर्थिक सेवा	48,982.85	51,749.83
कर्ज आणि अग्रिमांची वसुली	642.62	742.20	कर्जे व अग्रिमे संवितरीत	4,664.41	4,974.16
लोक ऋण जमा	87,572.84#	1,25,820.67@	लोक ऋणाची परतफेड	37,665.79#	40,649.98@
आकस्मिक निधीतून विनियोग	200.00	0.00	आकस्मिक निधीतून विनियोग	200.00	0.00
आकस्मिक निधी	200.00	0.00	आकस्मिक निधी	200.00	0.00
लोक लेखे जमा	1,43,466.93	1,36,495.89	लोक लेखा संवितरण	1,21,973.69	1,23,351.19
सुरुवातीची रोख शिल्लक	77,692.29	81,490.71	अंतीम शेष रोख	81,490.71	89,246.74
एकूण विभाग ब प्राप्ती	**3,09,774.68**	**3,44,549.47**	**एकूण विभाग ब वितरण**	**3,07,838.21**	**3,30,795.47**
एकूण एकूण (A+B)	**7,15,452.61**	**7,75,145.93**	**एकूण अनुदान (अ+ब)**	**7,15,452.61**	**7,75,145.93**

@ विशेष आहरण सुविधेअंतर्गत 91 दिवसांचे व्यवहार वगळून (₹ 166.85 कोटींची प्राप्ती आणि वितरण)
विशेष आहरण सुविधेअंतर्गत 91 दिवसांचे व्यवहार वगळून (₹ 7,129.25 कोटींची प्राप्ती आणि वितरण)

(स्रोत: संबंधित वर्षांचे वित्त लेखे)

1.3 लेखापरीक्षणासाठी प्राधिकार

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना भारतीय संविधानाच्या कलम 149 व 151 आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 अन्वये लेखापरीक्षण करण्याचे प्राधिकार प्राप्त झाले आहेत.

कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती अधिनियमाच्या तरतुदी आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्गमीत केलेल्या लेखापरीक्षण व लेखा नियमन, 2020 अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम यांचा खर्च व जमा यांचे लेखापरीक्षण नियंत्रक व महालेखापरीक्षक करतात.

1.4 लेखापरीक्षणाचे नियोजन व आयोजन

लेखापरीक्षण प्रक्रियेची सुरुवात लेखापरीक्षीत घटकांची जोखीम जसे की झालेला खर्च व प्राप्त महसूल, समीक्षणात्मक/गुंतागुंतीची कार्ये, प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांची पातळी, लेखापरीक्षण धारणा, एकंदर अंतर्गत नियंत्रणाचे मूल्यांकन, भागधारकांच्या चिंता आणि लेखापरीक्षण निरीक्षणांचा मागील कल यांच्या मूल्यांकनाच्या आधारावर वार्षिक लेखापरीक्षा योजना तयार करण्यापासून होते. वरील मानकानुसार विविध विभागांतर्गत असलेल्या युनिटचे उच्च, मध्यम आणि कमी जोखीम असलेल्या युनिट्समध्ये वर्गीकरण केले आहे. या जोखिम मूल्यांकनाच्या आधारावर, लेखापरीक्षणाची वारंवारता आणि व्याप्ती ठरवली जाते.

प्रत्येक युनिटचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर, लेखापरीक्षण निष्कर्षांचा समावेश असलेले निरीक्षण अहवाल तपासणी केलेल्या कार्यालय प्रमुखांना पाठविले जातात. निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखापरीक्षण निष्कर्षांना उत्तरे देण्याची विनंती केली जाते. उत्तरे प्राप्त झाल्यानंतर लेखापरीक्षण निष्कर्ष एकतर निकाली काढले जातात किंवा अनुपालनासाठी पुढील कारवाईचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालामधून उद्‌भवणारी महत्त्वपूर्ण निरीक्षणे भारतीय संविधानाच्या कलम 151(2) अंतर्गत राज्यपालांना सादर करण्यात येणा-या लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट करण्यासाठी संस्करीत केल्या जाते.

1.5 लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद

1.5.1 प्रलंबीत निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची नियतकालिक लेखापरीक्षण तपासणी ही त्यांनी केलेल्या व्यवहारांची चाचणी तपासणी आणि विहित नियम व कार्यपद्धतीनुसार महत्त्वपूर्ण लेखे व इतर अभिलेखे ठेवल्याची पडताळणी करण्यासाठी केली जाते. या तपासणी पाठोपाठ निरीक्षण अहवाल तयार करून कार्यालय प्रमुखांना, त्याच्या प्रती पुढील उच्च प्राधिकाऱ्यांसह,

निर्गमीत केला जातो. निरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षण निरीक्षणांवर केलेल्या कारवाईवर नियंत्रण ठेवण्याकरिता प्रलंबित निरीक्षण अहवालांची अर्धवार्षिक तपशीलवार विवरणे संबंधित विभागांच्या सचिवांना पाठविली जातात.

जून 2024 पर्यंत, 2255 निरीक्षण अहवाल (10,395 परिच्छेद) निपटाऱ्यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल व परिच्छेदांचे वर्ष-निहाय तपशील ***परिशिष्ट 1.2*** मध्ये दर्शविले आहेत. यावरून असे दिसून येते की प्रलंबीत लेखापरीक्षण मुद्द्यांचे निराकरण करण्यासाठी वेळेवर आणि प्रभावी पावले उचलली जात नाहीत.

1.5.2 विभागीय लेखापरीक्षण समिती

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व प्रशासकीय विभागांना लेखापरीक्षा समिती स्थापन करण्याचे, प्रलंबित निरीक्षण अहवाल व परिच्छेदांचे पुनरावलोकन करण्याचे आणि त्यांच्या निपटाऱ्याकरिता त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत (डिसेंबर 1985). स्थापन केलेल्या अशा प्रत्येक समितीमध्ये प्रशासकीय विभाग, लेखापरीक्षा यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी आणि लेखापरीक्षीत संस्थेच्या विभाग प्रमुखांसह, वित्त विभागातील एक नामनिर्देशित व्यक्ति असेल. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार या पदापेक्षा कमी नसलेले अधिकारी, प्रतिनिधी म्हणून लेखापरीक्षा समितीचे सदस्य असतात. प्रत्येक तिमाहीत किमान एकदा लेखापरीक्षा समितीची बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

2023-24 दरम्यान, **तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे नऊ लेखापरीक्षण समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या.

तक्ता 1.4: 2023-24 मध्ये आयोजित केलेल्या लेखापरीक्षा समिती बैठका

अनुक्रमांक	प्रशासकीय विभागाचे नाव	आयोजीत केलेल्या एसीएमची संख्या	निपटारा केलेल्या आयआरची संख्या	निपटारा केलेल्या परिच्छेदांची संख्या
1	सार्वजनिक बांधकाम विभाग	4	0	563
2	ऊर्जा	3	5	86
3	उद्योग	2	15	63
एकूण		**9**	**20**	**712**

तक्ता 1.4 वरून स्पष्ट होते की, या अहवालात समाविष्ट असलेल्या महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखापरीक्षण अधिकारक्षेत्रातील 11 प्रशासकीय विभागांपैकी, 2023-24 दरम्यान केवळ तीन प्रशासकीय विभागांनी बैठका घेतल्या.

1.5.3 प्रारुप परिच्छेद आणि अनुपालन लेखापरीक्षणांना विभागांचा प्रतिसाद

या अहवालात दिसणारे पाच प्रारुप परिच्छेद, एक विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण आणि एक माहिती तंत्रज्ञान (आयटी) लेखापरीक्षण फेब्रुवारी 2025 ते ऑक्टोबर 2025 या कालावधीत संबंधित विभागांच्या प्रधान सचिव/सचिवांना अर्ध-शासकीय पत्राने चार आठवड्यांच्या आत प्रतिसाद देण्याच्या विनंतीसह पाठवण्यात आले. चार मसुदा परिच्छेदांची उत्तरे प्राप्त झालेली नाहीत.

1.5.4 लेखापरीक्षण अहवालाचा पाठपुरावा

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जानेवारी 2001 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, प्रशासकीय विभागांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात, लेखापरीक्षणाद्वारे सत्यापित केलेले स्पष्टीकरणात्मक ज्ञापन, लेखापरीक्षण अहवाल राज्य विधानमंडळास सादर केल्यापासून तीन महिन्यांच्या आत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे प्रस्तुत करणे आवश्यक होते. मात्र, प्रशासकीय विभागांनी या सूचनांचे पालन केले नाही. वर्ष 2015-16 ते 2021-22 मधील प्रलंबीत स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. समुहनिहाय तपशील ***परिशिष्ट 1.3*** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 1.5: 2015-16 ते 2021-22 च्या लेखापरीक्षण अहवालांच्या प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याची तारीख	परिच्छेद आणि समिक्षांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	शिल्लक
2015-16	11 ऑगस्ट 2017 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	7	7	0
	7 एप्रिल 2017 (पीएसयू)	7	7	0
2016-17	28 मार्च 2018 (ईएस)	2	2	0
	20 जुलै 2018 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	4	4	0
	20 जुलै 2018 (पीएसयू)	8	8	0

लेखापरीक्षण अहवाल	अहवाल सादर करण्याची तारीख	परिच्छेद आणि समिक्षांची संख्या	प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या	शिल्लक
2017-18	2 जुलै 2019 (ईएस)	4	3	1
	4 मार्च 2020 (आरएस-ट्रान्सपोर्ट, आयटी, होम)	4	4	0
	4 मार्च 2020 (पीएसयू)	7	7	0
2018-19	08 सप्टेंबर 2020 (ईएस)	4	4	0
	08 सप्टेंबर 2020 (पीएसयू)	2	2	0
2019-21	04 ऑगस्ट 2023 (अनुपालन लेखापरीक्षण)	7	7	0
2021-22	18 जुलै 2025 (अनुपालन लेखापरीक्षण)	2	0	2
एकूण		**58**	**55**	**3**

टीप: ईएस-आर्थिक क्षेत्र अहवाल: आरएस-महसूल क्षेत्र; पीएसयू-सार्वजनिक क्षेत्र उपक्रम

तक्ता 1.5 वरून हे निदर्शनास येते की लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या 58 परिच्छेदांपैकी, 2015-16 ते 2021-22 या कालावधीत 55 परिच्छेदांसाठी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्राप्त झाले.

लोक लेखा समिती (पीएसी) आणि सार्वजनिक उपक्रम समिती (सीओपीयु) प्रत्येक प्रकरणात, लेखापरीक्षण अहवालांमध्ये हाताळलेल्या सर्व मुद्द्यांवर कार्यकारी मंडळाची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी विभागांनी त्यांच्या शिफारसींवर कारवाई केलेली टिप्पण्णी (एटीएन) पाठविण्याचा कालावधी निश्चित करतात.

2015-16 ते 2023-24 दरम्यान पीएसी आणि सीओपीयु यांनी 2010-11 ते 2015-16 या वर्षांच्या लेखापरीक्षण अहवालांशी संबंधित 144 परिच्छेदांवर चर्चा केली. पीएसी आणि सीओपीयु यांच्या शिफारशींवर प्रतिक्षीत असलेल्या एटीएन (जून 2024) ची स्थिती **तक्ता 1.6** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 1.6: पीएसी/कोपु शिफारशींवरील कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रलंबित स्थिती

वर्ष	लेखापरीक्षण अहवाल	पीएसी/ कोपु अहवाल क्रमांक	पीएसी/ कोपुचे वर्ष	पीएसी/ कोपु द्वारा शिफारसींची संख्या	प्रलंबित कारवाई केलेल्या टिप्पण्यांची संख्या
2010-11	पीएसयू	01	2020-21	06	06
		06,11,07	2015-16	05	05
2011-12	पीएसयू	05	2015-16	01	01
		18	2017-18	03	03
		06	2015-16	02	02

वर्ष	लेखापरीक्षण अहवाल	पीएसी/ कोपु अहवाल क्रमांक	पीएसी/ कोपुचे वर्ष	पीएसी/ कोपु द्वारा शिफारसींची संख्या	प्रलंबित कारवाई केलेल्या टिप्पण्यांची संख्या
	आरएस (वाहतूक)	33	2017-18	03	03
		34	2017-18	64	02
2012-13	ईएस	45,60	2017-18	26	18
	पीएसयू	06	2015-16	01	01
	आरएस (वाहतूक)	37	2017-18	06	06
2013-14	पीएसयू	07	2015-16	01	01
	आरएस (वाहतूक)	19	2015-16	09	07
2014-15	ईएस	43	2017-18	20	18
	जीएसएस	61	2017-18	13	12
	पीएसयू	02	2020-21	05	05
		18	2017-18	03	03
	आरएस	66	2017-18	05	05
2015-16	ईएस	39	2017-18	13	01
एकूण				**186**	**99**

वरील तक्त्यावरून असे दिसते की, 11 विभागांकडून 99 एटीएन प्रतिक्षित होत्या. ज्या पीएसी आणि सीओपीयु शिफारशींवरील एटीएन प्रतिक्षित आहेत (जून 2024) त्यांची समुह-निहाय स्थिती ***परिशिष्ट 1.4*** मध्ये दर्शविली आहे.

1.6 लेखापरीक्षणाचे परिणाम

वर्षभरात केलेल्या स्थानिक लेखापरीक्षणाची स्थिती

2023-24 या वर्षात केलेल्या ऊर्जा, उद्योग, वाहतूक, वन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पर्यावरण आणि हवामान बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, माहिती तंत्रज्ञान, गृह, कायदा व विधी व्यवहार यांच्या 307 कार्यालयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत 2503 निरीक्षणांमध्ये ₹ 11755.00 कोटींचे कमी मूल्यांकन/कमी आकारणी/ महसुलाची हानी, हे उघडकीस आले. वर्षभरात, 2023-24 मध्ये लेखापरीक्षणात निदर्शनास आणलेल्या 148 निरीक्षणांमध्ये संबंधित विभागांनी ₹ 667.95 कोटींचे कमी मूल्यमापन आणि इतर कमतरता मान्य केल्या. ***परिशिष्ट 1.5*** मध्ये दर्शविल्यानुसार विभागांनी 2023-24 आणि पूर्वीच्या वर्षांच्या लेखापरीक्षण निष्कर्षांशी संबंधित ₹ 33.71 कोटी, 2023-24 मध्ये गोळा केले.

या अहवालाचा समावेश

या अहवालाच्या प्रकरण II मध्ये 'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण' यावर विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण, माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षणावरील 'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' आणि स्थानिक लेखापरीक्षणादरम्यान केलेल्या लेखापरीक्षण तपासणीतून निवडलेल्या पाच लेखापरीक्षण परिच्छेदांचा समावेश आहे. हे पुढील प्रकरण II मध्ये चर्चिले आहे.

प्रकरण-II

व्यवहारांचे लेखापरीक्षण: शासकीय विभाग

प्रकरण II

वन विभाग

2.1 ‘महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाचे’ विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण

➢ **आम्ही हे लेखापरीक्षण का केले?**

- ➢ भरपाई वनीकरण उपक्रम नियम, विनियम आणि मार्गदर्शक तत्वांनुसार यशस्वीरित्या नियोजित आणि पार पाडले गेले.
- ➢ महा-कॅम्पाचे वित्त, विद्यमान नियम आणि विनियमांनुसार कार्यक्षमतेने व्यवस्थापित केले जाते.
- ➢ अंतर्गत नियंत्रण, देखरेख आणि मूल्यांकन यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी आहे.

आम्हाला काय आढळले?

- ❖ भू बँका निर्माण झाल्या नाहीत; उच्च-विचलन विभागांमध्ये भरपाई वनीकरण ची कमतरता.
- ❖ एपीओ विलंब, मंजूर कामे न करणे आणि मंजूर नसलेल्या कामांची अंमलबजावणी.
- ❖ कॅम्पा निधीचे जास्त, कमी आणि अनियमित वितरण.
- ❖ विलंबित रेमिटन्स, अतिरिक्त निधीची गुंतवणूक न होणे आणि व्याजाचे नुकसान.
- ❖ कमकुवत प्रशासन, खराब निरीक्षण आणि अनियमित वैधानिक बैठका.

महत्वाचे आकडे

- ❖ एपीओ अंतिम करण्यात विलंब झाल्यामुळे महा-कॅम्पा केवळ 47.37 *टक्के* भौतिक उद्दिष्टे साध्य करू शकले आणि नियोजित खर्चाच्या केवळ 42.48 *टक्के* खर्च करू शकले.
- ❖ स्थळ निवडीमध्ये त्रुटी असल्याने 2,592.73 हेक्टर जमिनीवर स्थळ -विशिष्ट भरपाई वनीकरण कामांची अंमलबजावणी न होणे.
- ❖ राष्ट्रीय कॅम्पा द्वारे भरपाई वनीकरण प्राप्त रकमेची चुकीच्या मार्गाने वळती करने आणि ₹ 40.80 कोटी व्याज न मिळणे.
- ❖ ₹ 2,184.19 कोटी ते ₹ 3,093.40 पर्यंतच्या शिल्लक कॅम्पा निधीची गुंतवणूक न होणे.
- ❖ अकार्यक्षम जीबी आणि एससी आणि ईसीच्या अपुऱ्या बैठका.

आम्ही काय शिफारस करतो?

- ❖ कालबद्ध एपीओ नियोजन आणि समक्रमित निधी वितरण.
- ❖ वेळेवर भरपाई वनीकरण अंमलबजावणीसाठी सत्यापित नॉन-फॉरेस्ट भू बँक.
- ❖ भरपाई वनीकरण प्राप्तींचे थेट राज्य कॅम्पा निधीमध्ये जमा करणे.
- ❖ औपचारिक गुंतवणूक धोरण आणि अतिरिक्त निधीचा विनियोग.
- ❖ नियमित वैधानिक बैठका आणि मजबूत देखरेख नियंत्रणे.

2.1.1 प्रस्तावना

महाराष्ट्रात 50,858 चौरस किमी वनक्षेत्र[1] आहे जे राज्याच्या एकूण 3,07,713 चौरस किमी भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे 16.53 *टक्के* आहे. एकूण वनक्षेत्रापैकी 9,865.62 चौरस किमी अतिशय दाट जंगल आहे, 21,577.79 चौरस किमी मध्यम दाट जंगल आहे आणि 19,415.12 चौरस किमी खुले जंगल आहे.

रस्ते बांधणे, सिंचन, पाणी पुरवठा योजना आणि उद्योग इत्यादी विकासात्मक कामांसाठी आवश्यकतेनुसार वनजमिनीचा वापर केला जातो, तथापि, अशा वापरासाठी कायदेशीर तरतुदींचे पालन करावे लागते. वन (संवर्धन) अधिनियम (एफसीए), 1980 च्या कलम 2 मध्ये असे नमूद केले आहे कि कोणतेही राज्य शासन किंवा इतर प्राधिकरण केंद्र शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय वनजमिनीचा वापर गैर-वन उद्देशांसाठी करू शकत नाही.

शिवाय, जर कोणत्याही विकास प्रकल्पासाठी वनजमिनीची आवश्यकता असेल, तर वापरकर्ता एजन्सीने[2] (शासकीय किंवा खाजगी), वनजमिनीचा वापर गैर-वन उद्देशांसाठी करण्यापूर्वी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून (एम ओईएफ आणि सीसी) मंजुरीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. हा प्रस्ताव संबंधित राज्य शासनाच्या वन विभागामार्फत सादर करायचा आहे. जर परवानगी दिली गेली, तर वापरकर्ता एजन्सीने भरपाई वनीकरण, निव्वळ वर्तमान मूल्य (एनपीव्ही), पाणलोट क्षेत्र उपचार योजना (सीएटीपी) किंवा वन्यजीव संवर्धन योजना इत्यादींसाठी रकमेच्या स्वरूपात भरपाई द्यावी लागते.

भरपाई वनीकरण निधी (सीएएफ) अधिनियम, 2016 मध्ये भारताच्या सार्वजनिक खात्यांअंतर्गत आणि प्रत्येक राज्याच्या सार्वजनिक खात्यांअंतर्गत निधीची स्थापना करण्याची आणि वापरकर्ता संस्थांकडून मिळालेल्या पैशात भरपाई वनीकरण, अतिरिक्त भरपाई वनीकरण, दंडात्मक भरपाई वनीकरण, एनपीव्ही आणि वन संवर्धन अधिनियम, 1980 अंतर्गत अशा संस्थांकडून वसूल केलेल्या इतर सर्व रकमा जमा करण्याची तरतूद आहे.

---

1 इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट 2023 नुसार

2 केंद्र किंवा राज्य सरकारची कोणतीही व्यक्ती, संघटना किंवा कंपनी किंवा विभाग वनजमिनीचा गैर-वन उद्देशासाठी वापर/विनियोजन किंवा अधिसूचना रद्द करण्याची विनंती करत असेल.

या अधिनियमात निधीच्या प्रशासनासाठी आणि कृत्रिम पुनरुत्पादन (वृक्षारोपण), सहाय्यित नैसर्गिक पुनरुत्पादन इत्यादी स्वरूपात भरपाई वनीकरण करण्यासाठी गोळा केलेल्या पैशाचा वापर करण्यासाठी राष्ट्रीय तसेच प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेश (यूटी) स्तरावर प्राधिकरणांची स्थापना करण्याची तरतूद आहे.

भारत सरकारच्या (जीओआइ) मार्गदर्शक तत्वांनुसार (2 जुलै 2009) कॅम्पा निधी प्राप्त करण्यासाठी आणि कॅम्पा निधी वापरण्यासाठी च्या विहित प्रक्रियांसाठी राज्यस्तरीय भरपाई वनीकरण नियोजन आणि व्यवस्थापन प्राधिकरण (कॅम्पा) स्थापन करणे आवश्यक होते. महाराष्ट्रातील राज्य कॅम्पा ही या मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र शासनाने स्थापन केली आहे आणि भारत सरकार आणि राज्य शासनाकडून वेळोवेळी मिळालेल्या निर्देशांनुसार कॅम्पा निधीचे व्यवस्थापन करत आहे.

भारत सरकारने ऑगस्ट 2016 मध्ये सीएएफ अधिनियम, 2016 लागू केला आणि ऑगस्ट 2018 मध्ये संबंधित सीएएफ नियम, 2018 अधिसूचित केले. अधिनियम आणि नियम दोन्ही 30 सप्टेंबर 2018 पासून लागू झाले आणि राज्य कॅम्पाचे नाव बदलून महा-कॅम्पा ठेवण्यात आले.


महा-कॅम्पा प्रामुख्याने वन विभागाच्या प्रादेशिक, वन्यजीव आणि सामाजिक वनीकरण शाखांद्वारे त्याचे उपक्रम आणि अंमलबजावणी प्रक्रिया चालवते. ते क्षेत्र आणि विषय-विशिष्ट आवश्यकतांनुसार पर्यावरण, वनीकरण, वन्यजीव, जैवविविधता आणि उपजीविका प्रणालींशी संबंधित ज्ञानाचा वापर आणि सराव आणि महा-कॅम्पा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संबंधित भागधारक संस्था, व्यक्ती, संस्था आणि संघटनांशी देखील नेटवर्किंग करते.

2.1.2 संघटनात्मक रचना

महा-कॅम्पा राज्य निधीच्या व्यवस्थापनासाठी जबाबदार आहे आणि निधीचा वापर स्थानिक आणि क्षेत्र-विशिष्ट आवश्यकतांनुसार सीएएफ नियम, 2018 अंतर्गत परवानगी असलेल्या उपक्रमांसाठी आणि भारत सरकार/ महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार केला जाईल. कॅम्पा निधीतून घेतलेल्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीबाबतची कामे पार पाडण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक प्रशासकीय मंडळ (जीबी), मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती (एससी) आणि मुख्य वनसंरक्षक (पीसीसीएफ) (एचओएफएफ[3]) यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यकारी समिती (ईसी) स्थापन करण्यात आली.


[3] वन दलाचे प्रमुख

चार्ट 1: संघटनात्मक रचना



(स्रोत: विभागाने दिलेली माहिती)

सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 17, 18 आणि 19 मध्ये जीबी, एसी आणि ईसी यांचे अधिकार आणि कार्ये पूर्व-निश्चित केली आहेत. प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:



एपीओ ची अंमलबजावणी मंडळ स्तरावर मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ), विभागीय स्तरावर उपवनसंरक्षक (उप वनसंरक्षक) आणि परिक्षेत्र स्तरावर वन परिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) यांच्यामार्फत केली जाते.

2.1.3 वित्तीय स्थिती

राज्य भरपाई वनीकरण निधी राष्ट्रीय प्राधिकरणांकडून वसूल केला जातो आणि महा-कॅम्पा द्वारे आयोजित उपक्रमांसाठी त्याचे वितरण केले जाते. 2019-20 ते 2023-24 या वर्षात, निधीचे उत्पन्न आणि वितरण **तक्ता 2.1.1** मध्ये दिले आहे.

तक्ता 2.1.1: राज्य निधीची वित्तीय स्थिती

(₹ कोटी मध्ये)

वर्ष	प्रारंभीक शेष	प्राप्त	वितरण	अंतीम शेष
2019-20	----[4]	3,844.24	151.52	3,692.72
2020-21	3,692.72	----	260.00	3,432.72
2021-22	3,432.72	285.22	487.50	3,230.44
2022-23	3,230.44	----	448.68	2,781.76
2023-24	2,781.76	669.28*	417.32	3,033.72

(स्रोत: वित्त लेखा जीओएम)

*2023-24 या वर्षासाठीच्या ₹ 669.28 कोटींच्या परतफेडीमध्ये 01/04/2020 ते 31/03/2022 या कालावधीसाठीच्या ₹ 211.01 कोटींची एकत्रित रक्कम आणि मार्च 2023 पर्यंतच्या निधीवर महाराष्ट्र शासनाने भरलेल्या व्याजाच्या ₹ 458.26 कोटीं रकमेचा समावेश आहे.

2.1.4 लेखापरीक्षण उद्दिष्टे

खालील गोष्टींचे मूल्यांकन करण्यासाठी विषय विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण (एसएससीए) करण्यात आले:

- भरपाई वनीकरण उपक्रम नियम, विनियम आणि मार्गदर्शक तत्वांनुसार नियोजित आणि यशस्वीरित्या राबविले गेले.
- महा-कॅम्पाचे वित्त विद्यमान नियम आणि विनियमांनुसार कार्यक्षमतेने व्यवस्थापित केले जाते.
- अंतर्गत नियंत्रण, देखरेख आणि मूल्यांकन यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी आहेत.

[4] 2019-20 या वर्षात राष्ट्रीय भरपाई वनीकरण ठेवीतून निधी प्राप्त झाला, त्यामुळे सुरुवातीची शिल्लक शून्य आहे.

2.1.5 लेखापरीक्षा व्याप्ती आणि कार्यपद्धती

29 जुलै 2024 रोजी पीसीसीएफ (एचओएफएफ), महाराष्ट्र यांच्यासोबत एक प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती, जिथे लेखापरीक्षा उद्दिष्टे, व्याप्ती आणि कार्यपद्धतीची चर्चा करण्यात आली.

पीसीसीएफ (एचओएफएफ), महाराष्ट्र आणि 15 निवडलेल्या[5] विभागांच्या कार्यालयात भरपाई वनीकरण अंतर्गत वृक्षारोपण आणि संबंधित उपक्रमांच्या व्यवस्थापनावर राज्य निधीचा वापर करून एपीओ तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याशी संबंधित 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठीच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणीद्वारे विषय विशिष्ट अनुपालन लेखापरिक्षा ऑगस्ट 2024 ते फेब्रुवारी 2025 दरम्यान करण्यात आली.

एकूण 75 विभागांपैकी, 15 विभागांची निवड आयडिया सॉफ्टवेअर वापरून पुनर्स्थापने शिवाय साधी यादृच्छिक नमूना निवड (SRSWOR) पद्धतीने वितरित केलेल्या निधीवर आधारित करण्यात आली, जी एकूण विभागांच्या 20 *टक्के* आहे.

लेखापरीक्षणामध्ये प्रत्येक विभागात 2019-20 पूर्वी वृक्षारोपण केलेल्या दोन स्थळांची यादृच्छिक नमुना निवड करून क्षेत्र स्तरीय लेखापरीक्षणादरम्यान संयुक्त भौतिक पडताळणी देखील करण्यात आली, जेणेकरून लागवडींचे मूल्यांकन त्यांच्या अस्तित्वाच्या आणि भरपाई वनीकरण उपक्रमांच्या यशाच्या दृष्टीने केले जाईल. निर्गमन बैठक 1 डिसेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आली होती, सादर केलेली उत्तरे योग्यरित्या समाविष्ट करण्यात आली.

2.1.6 लेखापरीक्षा निकष

खालील कागदपत्रांमधून मिळालेल्या लेखापरीक्षा निकषांसह लेखापरीक्षा तपासणी स्थिरचिन्हीत करण्यात आली:

- वन (संवर्धन) अधिनियम, 1980;
- भरपाई वनीकरण निधी अधिनियम, 2016;
- भरपाई वनीकरण निधी नियम, 2018;

[5] उप वनसंरक्षक (डब्ल्यूएल) गुगामल, उप वनअधिकारी (डब्ल्यूएल) कोल्हापूर, उप संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प (पीटीआर), उप वनसंरक्षक (टी) अकोला, बुलढाणा, मध्य चांदा, छत्रपती संभाजी नगर, धुळे, पुसद, सावंतवाडी, वर्धा, कोल्हापूर, पश्चिम नाशिक, यावल, आणि उप वनअधिकारी, बीड.

- अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वनवासी (वन हक्कांचे व्यवस्थापन) अधिनियम, 2006;
- वन (संवर्धन), अधिनियम, 1980 यांचे हँडबुक आणि वन संवर्धन नियम, 2003;
- पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनद्वारे जारी केलेली कॅम्पावरील मार्गदर्शक तत्त्वे;
- वार्षिक कृती आराखडा;
- विभागाची कार्य योजना;
- राष्ट्रीय वन धोरण, 1988;
- भारतीय वन अधिनियम, 1927; आणि
- पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय आणि वन विभाग, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय, आदेश आणि परिपत्रके.

लेखापरीक्षा निष्कर्ष

2.1.7 नियोजन आणि अंमलबजावणी

2.1.7.1 भरपाई वनीकरण साठी बिगर वन जमिनीची भु-बँक तयार करणे

हँडबुकच्या परिच्छेद 2.7 नुसार, राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेश एफ़सी अधिनियम, 1980 अंतर्गत वन मंजुरी प्रस्तावांची प्रक्रिया जलद करण्यासाठी भु-बँक तयार करतील. वन नसलेल्या जमिनींव्यतिरिक्त, वन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली 40 टक्क्यांपर्यंत घनता असलेली निकृष्ट वन जमीन, भारतीय वन सर्वेक्षण (एफएसआय) शी सल्लामसलत करून उपग्रह प्रतिमांद्वारे ओळखली जाऊ शकते आणि भरपाई वनीकरण साठी उपलब्ध करून दिली जाऊ शकते. लेखापरीक्षणात आढळले की:

- विभागाने वन नसलेल्या जमिनीची भु-बँक स्थापित केली नव्हती.
- विभागाने राज्यातील 75 विभागांपैकी फक्त 12[6] विभागांमध्ये निकृष्ट वन जमिनीची भु-बँक तयार केली होती, ज्यामध्ये भरपाई वनीकरण कामांसाठी एकूण 2,797.26 हेक्टर क्षेत्र व्यापले होते.

[6] उप वनसंरक्षक पुसद, बुलढाणा, अकोला, छत्रपती संभाजी नगर, पुणे, भोर, अमरावती, मेळघाट (टी) परतवाडा, नांदेड, उस्मानाबाद, परभणी आणि उप वनअधिकारी, बीड

- 15 पैकी पाच[7] विभागांमध्ये, भरपाई वनीकरण कामांसाठी निकृष्ट वनजमिनीच्या संदर्भात भु-बँक तयार करण्यात आली.

हँडबुकच्या परिच्छेद 2.7 मध्ये विहित केल्यानुसार, वनेतर जमीन आणि निकृष्ट वनजमीन पद्धतशीरपणे ओळख पटवण्यात आणि ती राखुन ठेवण्यात विभागाला आलेले अपयश हे भरपाई वनीकरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या पूर्व नियोजनाचा अभाव आणि संस्थात्मक तयारीतील कमतरता दर्शवते.

वनेतर जमिनीच्या सहज उपलब्ध असलेल्या भु-बँकांच्या अभावामुळे अनेक प्रकरणांमध्ये भरपाई वनीकरणसाठी योग्य जमीन उपलब्ध झाली नाही, ज्यामुळे नुकसानभरपाई वनीकरणाच्या दायित्वांच्या पुर्ततेस विलंब झाला आणि त्यांची अंमलबजावणी झाली नाही, ज्यामुळे वन संवर्धन अधिनियम, 1980 अंतर्गत वन मंजुरी प्रस्तावांना गती देण्याचे उद्दिष्ट अपयशी ठरले.

हे **परिच्छेद 2.1.7.7** मध्ये अधिक तपशीलवार नोंदवले आहे.

हि बाब निदर्शणास आणुन दिल्यावर शासनाने (ऑक्टोबर 2025) सांगितले कि योग्य जमिनीची उपलब्धता नसल्यामुळे आणि प्रशासकीय अडचणींमुळे वनेतर जमिनीच्या बँकांची निर्मिती करता आली नाही. तथापि, भविष्यात भरपाई वनीकरणच्या कामांना सुलभ करण्यासाठी भु-बँकांची निर्मीती करण्याच्या उद्देशाने योग्य बिगर वन जमीनीची ओळख पटवुन त्या राखुन ठेवण्याचे प्रयत्न सध्या सुरु आहेत.

2.1.7.2 वनरहित जमिनीऐवजी वनजमिनीत भरपाई वनीकरणचे काम केले गेले

वन संवर्धन अधिनियम, 1980 आणि वन संवर्धन नियम, 2003 वरील पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (मार्च 2019) द्वारे जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वे आणि स्पष्टीकरणांच्या हँडबुकनुसार, भरपाई वनीकरण हे राखीव/संरक्षित जंगलाच्या जवळ किंवा त्याच्या जवळ ओळखल्या जाणाऱ्या योग्य गैर-वनजमिनीवर शक्य तितके, वापरकर्ता एजन्सीने द्यावयाच्या खर्चावर उभारले पाहिजे. जिथे वनरहित जमीन वळवल्या जाणाऱ्या वनक्षेत्रापेक्षा कमी प्रमाणात उपलब्ध असेल, तिथे भरपाई वनीकरणासाठी वळवल्या जाणाऱ्या क्षेत्राच्या दुप्पट

[7] उप वनसंरक्षक पुसद, बुलढाणा, अकोला, छत्रपती संभाजी नगर आणि उप वनअधिकारी, बीड

प्रमाणात किंवा वळवल्या जाणाऱ्या वनजमिनी आणि उपलब्ध गैर-वनजमिनीमधील फरकाच्या दुप्पट प्रमाणात निकृष्ट जंगलावर करता येईल. केंद्र शासन केवळ राज्य/केंद्रशासित प्रदेशात भरपाई वनीकरणासाठी योग्य बिगर वन जमीन उपलब्ध नाही असे, ज्या राज्यांमध्ये/ केंद्रशासित प्रदेशामध्ये भौगोलिक क्षेत्राच्या 33 टक्क्यांपेक्षा जास्त वनक्षेत्र आहे अशा राज्यशासन/केंद्रशासित प्रदेशाच्या मुख्य सचिवांच्या प्रस्तावित प्रपत्रात असलेल्या प्रमाणपत्राच्या आधारेच स्वीकारेल.

लेखापरीक्षणात एपीओ आणि इतर अभिलेख्यामधून असे आढळून आले की, 15 निवड केलेल्या विभागांपैकी 11 विभागांमध्ये, एकूण 114 प्रकल्पांपैकी 60 प्रकल्पांमध्ये वळती केलेल्या 4,168.01 हेक्टर वनजमिनीच्या तुलनेत 3,777.33 हेक्टर नियोजीत केल्याप्रमाणे वनेतर जमिनीवर नाही तर वनजमिनीवर भरपाई वनीकरण पूर्ण करण्यात आले होते,. उर्वरित चार[8] विभागांमध्ये, **तक्ता 2.1.2** मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे वनजमिनीवर भरपाई वनीकरण करण्यात आलेला कोणताही प्रकल्प नव्हता.

तक्ता 2.1.2: वनजमिनीमध्ये विभागवार केलेले भरपाई वनीकरण

(31 मार्च 2024 रोजी)

अ. क्रमांक	विभागाचे नाव	प्रकल्पांची संख्या	वळवलेल्या वनजमिनीचे क्षेत्रफळ (हे.)	वनक्षेत्रात हाती घेतलेले भरपाई वनीकरण क्षेत्र (हे.)
1.	वर्धा	13	689.39	941.59
2.	कोल्हापूर	15	850.72	774.42
3.	पश्चिम नाशिक	3	4.00	11.70
4.	छत्रपती संभाजीनगर	3	12.05	19.21
5.	मध्य चांदा	11	652.34	774.08
6.	बुलढाणा	2	21.88	44.08
7.	पुसद	3	1,207.81	551.00
8.	धुळे	6	488.68	397.01
9.	अकोला	1	126.00	126.00
10.	सावंतवाडी	1	34.14	34.14
11.	यावल	2	81.00	104.10
	एकूण	**60**	**4,168.01**	**3,777.33**

(स्रोत: महा-कॅम्पा वार्षिक संचालन योजना)

[8] उप वनअधिकारी (टी) बीड, उप वनसंरक्षक (डब्ल्यूएल) गुगामल, उप वनअधिकारी (डब्ल्यूएल) कोल्हापूर आणि उपसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प (पीटीआर)

मुख्य अंतर्दृष्टी:

- 4,168.01 हेक्टरच्या वन जमीन वळणाच्या तुलनेत, भरपाई वनीकरण फक्त 3,777.33 हेक्टरसाठी हाती घेण्यात आले, ज्यामुळे एकूण 390.68 हेक्टर (9.4 *टक्के*) तुटवडा निर्माण झाला.
- विभागांमध्ये कामगिरी अत्यंत असमान होती, ज्यामुळे भरपाई वनीकरणसाठी एकसमान नियोजन आणि अंमलबजावणी आराखड्याचा अभाव दर्शवते.
- सर्वाधिक वळण (1,207.81 हेक्टर) असलेल्या पुसद विभागात केवळ 551 हेक्टरवर भरपाई वनीकरण नोंद झाली ज्यामुळे 54 टक्क्याची तूट दिसून आली.
- वन जमीनीचे केवळ दोन विभागांनी (वर्धा आणि मध्य चांदा) भरपाई वनीकरणमध्ये वळवलेल्या वन जमीनीपेक्षा जास्त साध्य केले, हे दर्शविते कि योग्य जमिनीची उपलब्धता ही मुख्य निर्धारक घटक आहे.
- विशेषतः उच्च-विचलन विभागांमध्ये तुटीचे स्वरूप, गैर-वन जमिनीच्या भुबँका तयार करण्यात आलेल्या अपयशाचा परिणाम अधोरेखीत करते आणि कमकुवत संस्थात्मक तयारी दर्शवते.

महाराष्ट्रातील वनक्षेत्र त्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या फक्त 16.53 *टक्के* असल्याने, भारतीय वन सर्वेक्षण संस्थेने प्रकाशित केलेल्या इंडिया स्टेट फॉरेस्ट रिपोर्ट, 2023 नुसार, भरपाई वनीकरण प्रामुख्याने बिगर वन जमिनीवर केले पाहिजे होते. भरपाई वनीकरण साठी वन जमिनीवर सतत अवलंबून राहणे केवळ राज्याच्या वनक्षेत्राच्या विस्ताराला अडथळा आणत नाही तर राष्ट्रीय वन धोरण, 1988 च्या देशाच्या भौगोलिक क्षेत्राचा एक तृतीयांश भाग वन आणि वृक्षाच्छादित करण्याच्या उद्दिष्टाला देखील कमकुवत करते.

ही बाब निदर्शनास आणुन दिल्यावर, शासनाने सांगितले (ऑक्टोबर 2025) कि केंद्र शासन आणि सार्वजनिक उपक्रमांच्या परिच्छेदात नमूद केलेले बहुतेक प्रकल्प वन आणि वृक्षाच्छादित आहेत. त्यांना खाजगी बिगर-वन जमिनीऐवजी निकृष्ट वन जमिनीवर वनिकरण करण्याची परवानगी दिली जाते कारण त्यांना वनीकरणासाठी योग्य खाजगी जमीन शोधण्यात आणि संपादित करण्यात, विशेषतः ज्या राज्यांमध्ये अशी जमीन मर्यादित किंवा अनुपलब्ध आहे, अनेकदा अडचणी येतात.

हे उत्तर स्वीकार्य नाही कारण प्रकल्पाचा बहुतांश सिंचन विभागाशी आणि महाराष्ट्र शासनाच्या इतर प्रकल्पांशी संबंधित आहेत. शासनाने सांगितल्याप्रमाणे, खाजगी बिगर-वन जमिनीच्या संपादनामधील अडचणी मान्य असल्या तरीही हँडबुकच्या परिच्छेद 2.7 मध्ये अशा अडचणी कमी करण्यासाठी प्रामुख्याने भु-बँकांची आगाऊ

ओळख आणि निर्मिती करणे अपेक्षीत आहे. विशेषतः मर्यादित वनक्षेत्र असलेल्या राज्यात, कमी होत चाललेल्या वनजमिनीवर सतत अवलंबून राहणे, राष्ट्रीय वन धोरण, 1988 मध्ये नमूद केल्याप्रमाणे वन आणि वृक्षाच्छादन विस्तारणाच्या उद्दिष्टाची पूर्णपणे पुर्तता करत नाही.

वरील वस्तूस्थितिहून असे दिसून येते कि भू-बँक पध्दतशीर आराखड्याचा अभाव असल्याने राज्यात भरपाई वनीकरणची वेळेवर आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यास मर्यादा आल्या आहेत.

2.1.7.3 राखीव/संरक्षित वनाची अधिसूचना

मार्गदर्शक सूचना पुस्तिकेच्या परिच्छेद 2.4 (v) नुसार, राज्य शासनाने वनजमिनीच्या बदल्यात भरपाई वनीकरणच्या उद्देशाने निवडलेली कोणतीही बिगर-वनजमिन, "वृक्ष शिखर घनता" लक्षात न घेता च्या आधारावर पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय स्वीकारू शकते. अशा सर्व जमिनीची मालकी राज्य वन विभागाच्या नावे हस्तांतरीत केली जाईल आणि पहील्या टप्प्यातील मंजुरीपूर्वी त्यांना संरक्षित वन म्हणून घोषीत केल्या जाईल.

लेखापरीक्षणाने मार्च 2024 पर्यंत केलेल्या तपासणीत निदर्शनास आले:

- 63,203.195 हेक्टर. (झुडपी जंगल जमीन 14,277.730 हेक्टरसह) वापरकर्ता एजन्सींकडून वळवलेल्या वनजमिनीच्या बदल्यात भरपाई वनीकरणसाठी वनेतर जमीन परत मिळवण्यात आली.
- 57,475.956 हेक्टर जमीन राखीव वन किंवा संरक्षित वन (आरएफ किंवा पीएफ) म्हणून अधिसूचित करण्यात आली.
- उर्वरित 5,727.243 हेक्टर जमीन भारतीय वन अधिनियम, 1927 च्या आरएफसाठी कलम 4 आणि पीएफसाठी कलम 29 अंतर्गत अद्याप अधिसूचित करण्यात आलेली नाही.
- 1,871.259 हेक्टर जमिनीसाठी प्रस्ताव शासकीय स्तरावर प्रलंबित होते.
- 3,855.983 हेक्टर जमिनीसाठी प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक /उप वनसंरक्षक पातळीवर प्रलंबित होते.

वनेतर जमिनीला आरएफ किंवा पीएफ म्हणून अधिसूचित न केल्यामुळे, भारतीय वन अधिनियम, 1927 मध्ये नमूद केलेल्या कायदेशीर तरतुदी आणि संरक्षणाच्या कक्षेत जमीन आणता आली नाही.

ही बाब निदर्शनास आणुन दिल्यावर, शासनाने (ऑक्टोबर 2025) सांगितले कि वन विभागाच्या ताब्यातील वनेतर जमीन (एनएफएल) राखीव वन म्हणून अधिसूचित करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

हे उत्तर नोंदवुन घेण्यात आले आहे. तथापि, लेखापरीक्षणात असे आढळून आले कि मार्च 2024 पर्यंत, ताब्यात घेतलेली 5,727.243 हेक्टर वनेतर जमीन राखीव वन किंवा संरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्यात आली नव्हती, त्यामुळे ती जमीन भारतीय वन अधिनियम, 1927 च्या कायदेशीर चौकटी आणि सुरक्षा नियमांच्या कक्षेबाहेर राहिली. स्थिती दर्शवते कि विहित केलेली प्रक्रिया आवश्यक वेळेत पूर्ण झाली नव्हती.

2.1.7.4 राष्ट्रीय आयोगाकडे वार्षिक कृती आराखडा सादर करणे

सीएएफ नियम, 2018 च्या नियम 2 (ब) नुसार, एपीओ म्हणजे राष्ट्रीय आयोग किंवा राज्य आयोगाने मंजूर केलेल्या भौतिक क्रियाकलापांसाठी आणि आर्थिक तरतुदींसाठी वार्षिक कृती आराखडा, जो यशस्वीतेसाठी महत्त्वाचे टप्पे, अटी ठरवतो आणि आर्थिक वर्षात धोरणात्मक वार्षिक योजना कशी कार्यान्वित केली जाईल हे स्पष्ट करतो.

सीएएफ नियम, 2018 च्या कलम 38 नुसार, राज्याच्या पुढील आर्थिक वर्षासाठी एपीओ राज्य आयोगाकडून दरवर्षी 31 डिसेंबरपूर्वी राष्ट्रीय आयोगाकडे सादर केला जातो.

लेखापरीक्षणात असे आढळून आले कि महा-कॅम्पाने पूर्वनिर्धारित देय तारखेनुसार राष्ट्रीय प्राधिकरणाकडे एपीओ सादर केले नाहीत आणि 2019-20 ते 2023-24 दरम्यान **तक्ता 2.1.3** मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे एपीओ सादर करण्यात 54 ते 141 दिवसांचा विलंब झाला.

तक्ता 2.1.3: एपीओ सादर करण्यात विलंब

वर्ष	एपीओ सादर करण्याची अंतिम तारीख	एपीओ सादर करण्याची वास्तविक तारीख	सादर करण्यास झालेला विलंब (दिवस)	मंजुरीची तारीख
2019-20	31 डिसेंबर 2018	08.05.2019	128	17.12.2019
2020-21	31 डिसेंबर 2019	06.05.2020	127	14.07.2020
2021-22	31 डिसेंबर 2020	21.05.2021	141	02.07.2021
2022-23	31 डिसेंबर 2021	04.05.2022	124	14.06.2022
2023-24	31 डिसेंबर 2022	23.02.2023	54	09.05.2023

(स्रोत: एपीओवर विभागाने दिलेली माहिती)

निवडलेल्या 15 पैकी 10 विभागांमध्ये[18] लेखापरीक्षणामध्ये असे आढळून आले कि कॅम्पा अंतर्गत विविध कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित ग्रामसभेची मान्यता घेण्यात आली नव्हती ज्यामुळे सामाजिक किंवा पर्यावरणीय परिणामांवर सल्लामसलत न झाल्याने अनपेक्षित परिणाम होऊ शकतात.

उत्तरात, शासनाने (ऑक्टोबर 2025) सांगितले की, कॅम्पा निधी अंतर्गत सर्व उपक्रम राबविण्यासाठी संबंधित ग्रामसभेची पूर्व मान्यता आणि सल्लामसलत घेण्याबाबत सर्व संबंधित अंमलबजावणी कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात योग्य ती काळजी घेतली जाईल.

2.1.11 निष्कर्ष

वनजमिनी गैर-वन वापरासाठी वळवल्यामुळे वन आणि झाडांचे नुकसान भरपाई देण्यासाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने एपीओ मध्ये मंजूर केलेल्या भरपाई वनीकरण उपक्रमांसाठी राज्य भरपाई वनीकरण निधीचे व्यवस्थापन आणि वापर करण्याचे महा-कॅम्पाला आदेश देण्यात आले आहेत.

लेखापरीक्षणातून असा निष्कर्ष निघतो कि एपीओ तयार करण्याच्या आणि मंजुरीच्या प्रक्रियेत मोठा विलंब झाला आहे, परिणामी, एपीओची अंमलबजावणी देखील विलंबाने झाली आहे आणि लेखापरीक्षणाद्वारे समाविष्ट कालावधीत नियोजित भरपाई वनीकरण कामांचे लक्ष्य साध्य करता आले नाही.

मार्गदर्शक तत्वांनुसार, भरपाई वनीकरण योग्य गैर-वन जमिनीवर उभारायचे आहे. तथापि, लेखापरीक्षणाद्वारे समाविष्ट कालावधीच्या एपीओमध्ये नियोजित 114 प्रकल्पांपैकी 60 प्रकल्पांच्या संदर्भात भरपाई वनीकरण मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे गैर-वन जमिनीची उपलब्धता न शोधता वन जमिनीवर नियोजित केले गेले. लेखापरीक्षणात असेही आढळून आले कि 2592.73 हेक्टर जमिनीवरील भरपाई वनीकरण स्थळ निवडीमुळे आणि मंजूर जमीन इतर वृक्षारोपण योजनांसाठी वळवल्यामुळे हाती घेता आली नाही.

[18] उप वनसंरक्षक छत्रपती संभाजी नगर, पश्चिम नाशिक, मध्य चांदा, अकोला, बुलढाणा, धुळे, पुसद, सावंतवाडी, यावल आणि बीड

वित्तीय व्यवस्थापनाच्या बाबतीत, महा-कॅम्पाने सीएएफ अधिनियमानुसार वापरकर्ता एजन्सींकडून भरपाई वनीकरणची रकम थेट राज्य निधीत जमा केले जाईल याची खात्री केलेली नाही. राष्ट्रीय प्राधिकरणामार्फत हि रक्कम वळती करणे हे सीएएफ अधिनियमानुसार तरतुदीच्या विरुद्ध आहे ज्यामुळे राज्य निधीत रक्कम जमा होण्यास विलंब झाला आणि राष्ट्रीय प्राधिकरणाने त्या रकमेचे कोणतेही व्याज महा-कॅम्पाला दिलेले नाही.

महा-कॅम्पाला राज्य निधीचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार आहेत, परंतु संपूर्ण राज्य निधीवर त्यांचे सक्रिय नियंत्रण नाही आणि ते केवळ महाराष्ट्र शासनाद्वारे वितरित केलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंत राज्य निधीचे व्यवस्थापन करते. परिणामी, महा-कॅम्पाने अतिरिक्त रकमेसाठी गुंतवणूक योजना तयार केलेली नाही ज्यामुळे राज्य निधीला कमी व्याज मिळते. महा-कॅम्पाने महाराष्ट्र शासनाच्या काही अर्थसंकल्पीय योजनांच्या अंशतः निधीसाठी आणि राज्य निधीच्या वापराच्या नियमांविरुद्ध कामांच्या अपात्र बाबींसाठी देखील राज्य निधीचा वापर केला आहे.

महा-कॅम्पामधील अंतर्गत नियंत्रणांमध्ये सुधारणा करण्याची संधी आहे कारण नियामक मंडळाचे कामकाज चालू नाही आणि सुकाणू समिती आणि कार्यकारी समितीच्या अपु-या बैठका आहेत. महा-कॅम्पाद्वारे हाती घेतलेल्या भरपाई वनीकरण उपक्रमांच्या मूल्यांकनासाठी मूल्यांकन यंत्रणा देखील अधिक मजबूत करणे आवश्यक आहे जेणेकरून महा-कॅम्पा त्याचे उद्दिष्ट साध्य करू शकेल ज्यासाठी ते सीएएफ अधिनियमाअंतर्गत स्थापन करण्यात आले होते.

शिफारशी

- *महा-कॅम्पा एक अंतर्गत नियोजन दिनदर्शिका तयार करू शकते ज्यामध्ये निर्धारित वेळेनुसार आणि जबाबदारीसह राष्ट्रीय प्राधिकरणाकडे एपीओ सादर करणे आणि मंजूर वेळापत्रकानुसार निधी वितरीत करणे सुनिश्चित केले जाऊ शकते.*
- *विभाग संयुक्त स्थळ तपासणी आणि भू-संदर्भाच्या मदतीने योग्य बिगर-वन जमिनीची सत्यापित भु-बँक तयार आणि कार्यान्वित करू शकतो,*

जेणेकरून विहित केलेल्या एक किंवा दोन वाढत्या हंगामात भरपाई वनीकरण वेळेवर पूर्ण होईल.

- *सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 4 नुसार वापरकर्ता संस्थांद्वारे सर्व भरपाई वनीकरण प्राप्ती राष्ट्रीय कॅम्पाएवजी थेट राज्य कॅम्पा निधीमध्ये जमा केल्या जातील याची खात्री करण्यासाठी आणि राष्ट्रीय कॅम्पाद्वारे वळवण्यास अवरोध करण्यासाठी शासन आवश्यक निर्देश जारी करू शकते.*
- *महा-कॅम्पा एक औपचारिक गुंतवणूक धोरण तयार करू शकते आणि अंमलात आणू शकते आणि सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 26 आणि 30 नुसार शासकीय सिक्युरिटीज किंवा शेड्यूल्ड बँकांच्या मुदत ठेवींमध्ये अतिरिक्त शिल्लक गुंतवू शकते.*
- *महा-कॅम्पाची जीबी, एससी आणि ईसीची बैठक विहित कालावधीने बोलावली जाऊ शकते आणि देखरेख आणि अंतर्गत नियंत्रणे मजबूत करण्यासाठी भौतिक प्रगती, निधी वापर आणि अभिलेख देखभालीचा आढावा घेण्याचे आदेश दिले जाऊ शकतात.*

वित्त विभाग

2.2 'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' चे माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षण

2.2.1 प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने (जीओएम) 1996-1997 पासून आपल्या विभागांसाठी विविध मॉड्यूल्स विकसित करून संगणकीकरणाची सुरुवात केली. तथापि, हे मॉड्यूल्स स्वतंत्र होते आणि एकमेकांशी एकात्मिक नव्हते. भारत सरकारने (जीओआइ) एका ई-गव्हर्नन्स प्रकल्पाद्वारे एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) लागू करण्याचे निर्देश दिले (मे 2007 मध्ये).

महाराष्ट्र शासनाने एप्रिल 2008 पासून अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि देखरेख कार्ये, शासनाच्या खर्च आणि जमा रकमांचे लेखांकन, वेतन आणि निवृत्तिवेतनासह कर्मचाऱ्यांचे इतर वैयक्तिक दावे यांच्या स्वयंचलनाची कार्यवाही सुरू केली. ही कार्ये पाच वेब-सक्षम मॉड्यूल्सच्या विकासाद्वारे स्वयंचलित आणि एकात्मिक करण्यात आली आणि खालील **तक्ता 2.2.1** मध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये त्यांची अंमलबजावणी करण्यात आली:

तक्ता 2.2.1: पाच वेब-सक्षम मॉड्यूल्स आणि त्यांच्या अंमलबजावणीची माहिती

अ. क्र.	मॉड्यूलचे नाव	लाइव्ह होण्याचा महिना/वर्ष	यांनी विकसित केले
1.	ट्रेझरी नेट	2009 मध्ये विकसित केलेली आणि लोकल एरिया नेटवर्कवर चालणाऱ्या जुन्या प्रणालीचा मे 2018 ते जानेवारी 2020 दरम्यान वेब-सक्षम प्रणालीमध्ये दर्जावाढ करण्यात आली.	मेसर्स नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (एनआयसी), पुणे
2.	अर्थसंकल्प अंदाज, वाटप आणि सनियंत्रण प्रणाली (बिम्स)	मे 2007	
3.	बिल पोर्टल	मार्च 2015	
4.	शासकीय प्राप्ती लेखा प्रणाली (ग्रास)	जून 2010	
5.	सेवार्थ मॉड्यूल, ज्यामध्ये खालील पाच उप-मॉड्यूल आहेत: (1) वेतन	एप्रिल 2012 ते ऑगस्ट 2014 दरम्यान	मेसर्स टाटा कन्सल्टन्सी

अ. क्र.	मॉड्यूलचे नाव	लाइव्ह होण्याचा महिना/वर्ष	यांनी विकसित केले
	(2) निवृत्तीवेतनवाहिनी (पेन्शन) (3) परिभाषित अंशदान पेन्शन प्रणाली (डीसीपीएस) आणि राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (एनपीएस) (4) जीपीएफ गट IV आणि (5) कर्ज आणि अग्रिम रक्कम		सर्व्हिसेस (टीसीएस), मुंबई

टीप: आकृति 2.2.1 मध्ये दर्शविलेले इतर मॉड्यूल म्हणजे व्यवस्थापन माहिती प्रणाली (एमआइएस) आणि महालेखाकार (एजी) मॉड्यूल ज्यासाठी वरील पाच मॉड्यूलमधून डेटा मिळवला जातो.

वरीलपैकी, सेवार्थ मॉड्यूलचे उप-मॉड्यूल, म्हणजेच जिल्हा परिषदा आणि इतर अनुदानित संस्था व आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेले निवृत्तीवेतनवाहिनी (निवृत्तीवेतन), मॉड्यूल अद्याप लागू करण्यात आलेले नाहीत.

महाकोष पोर्टल, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) अंतर्गत विकसित केलेल्या विविध ॲप्लिकेशन्सच्या लिंक्स प्रदान करते. हे पोर्टल बिम्स, ग्रास, सेवार्थ, डीसीपीएस, निवृत्तिवेतनवाहिनी इत्यादी ॲप्लिकेशन्सच्या लिंक्स पुरवते. Application


2.2.2 संघटनात्मक रचना

अपर मुख्य सचिव हे वित्त विभागाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. वित्त विभागाच्या कार्यांचे स्वयंचलनीकरण करण्याचे काम संचालक, लेखा व कोषागारे (डीएटी), मुंबई यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. संचालकांना सहसंचालक (माहिती तंत्रज्ञान), उपसंचालक (माहिती तंत्रज्ञान) आणि सहायक संचालक (ट्रेझरीनेट) मदत करतात.

2.2.3 आयएफएमएसची प्रणाली वास्तुरचना

आयएफएमएस हे बॅक-एंड डेटाबेस म्हणून डीबी2 (आयबीएमने सुरू केलेले एक आरडीबीएमएस उत्पादन) आणि फ्रंट-एंड म्हणून पीएचपी/जावा स्क्रिप्ट वापरून विकसित केले गेले आहे. आयएफएमएस हे एक वेब-आधारित मॉड्यूलर रचना असलेले असे ॲप्लिकेशन आहे. ज्यात खालील **आकृती 2.2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेगवेगळे मॉड्यूल आपापसात एकमेकांशी संवाद साधतात आणि डेटाची देवाणघेवाण करतात.

आकृती 2.2.1: आयएफएमएसचे मॉड्यूल




आयएफएमएसचे मुख्य वापरकर्ते महाराष्ट्र शासनाचे सर्व विभाग, त्या अंतर्गत असलेले नियंत्रक अधिकारी (नि.अ.) आणि आहरण व संवितरण अधिकारी (डीडीओ), कोषागारे आणि इतर संबंधित लेखापरीक्षा हितधारक जसे कि बँका, भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा विभाग इत्यादी आहेत.

2.2.4 आयएफएमएस मॉड्यूलमध्ये डेटा प्रवाह

अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर, वित्त विभाग (एफडी) महाराष्ट्र शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाला अनुदान वितरित करतो. प्रशासकीय विभाग आयएफएमएसच्या बिम्स मॉड्यूलचा वापर करून, आपल्या नि.अ. मार्फत डीडीओंना अनुदान वितरित करतो. बिलपोर्टल आणि सेवार्थ मॉड्यूल खर्च देयके तयार करतात, जी कोषागारांना सादर केली जातात. बिलपोर्टल/सेवार्थमध्ये देयके तयार झाल्यानंतर लगेचच, बिलाची रक्कम बिम्स ॲप्लिकेशनमधील वाटप केलेल्या अनुदानामध्ये समायोजित केली जाते. कोषागार ट्रेझरीनेट मॉड्यूल वापरून देयकांसाठी बिले मंजूर करते.

आयएफएमएसद्वारे होणा-या खर्चाचा प्रवाह दर्शवणारा तक्ता खालील **आकृती 2.2.2** मध्ये दिला आहे:

आकृती 2.2.2: आयएफएमएसमध्ये खर्चाचा डेटा प्रवाह



2.2.5 लेखापरीक्षणाची उद्दिष्ट्ये

आयटी लेखापरीक्षण खालील बाबींची खात्री करण्यासाठी करण्यात आले की:

- आयएफएमएसच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन प्रभावी आणि कार्यक्षम होते.
- आयएफएमएसमध्ये पुरेशी कार्यक्षमता आणि नियंत्रणे उपलब्ध होती आणि आयटी प्रणालीची उद्दिष्ट्ये व्यावसायिक उद्दिष्टांशी सुसंगत होती आणि आपत्तीनंतर डेटा पुनर्प्राप्त करण्यासाठी आवश्यक व्यवस्था अस्तित्वात आहे; आणि

- प्रणालीची आणि प्रणालीद्वारे प्रक्रिया केलेल्या व्यवहारांची सत्यता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी अंगभूत इनपुट, प्रक्रिया आणि आउटपुट नियंत्रणे पुरेशी आहेत.

2.2.6 लेखापरीक्षणाचे निकष

लेखापरीक्षणाचे निकष खालील स्रोतांवरून घेतले आहेत:

- महाराष्ट्र राज्य ई-गव्हर्नन्स धोरण, 2011
- महाराष्ट्र कोषागार नियम, 1968
- सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या चांगल्या आयटी पद्धती
- आयएफएमएसच्या विकासासाठी सेवा स्तर करार (एसएलए)
- भारत सरकार (जीओआय) द्वारे जारी केलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्त्वे आणि महाराष्ट्र शासनाचे (जीओएम) शासन निर्णय (जीआर)

2.2.7 लेखापरीक्षणाची व्याप्ती, नमुना निवड आणि कार्यपद्धती

2018-19 ते 2023-24 या कालावधीसाठी आयएफएमएसचे (आयएफएमएस) आयटी लेखापरीक्षण जुलै 2023 ते सप्टेंबर 2024 दरम्यान करण्यात आले. 24 मे 2023 रोजी शासनासोबत एक आगमन बैठक आयोजित करण्यात आली होती. 24 जुलै 2025 रोजी आयोजित केलेल्या निर्गमन बैठकीत वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यासोबत लेखापरीक्षण निष्कर्षांवर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्रामध्ये सात[19] प्रशासकीय प्रदेश असून त्यात 36 कोषागारे आहेत. सहा प्रदेशांचे प्रमुख सहसंचालक, लेखा व कोषागार आहेत आणि मुंबई विभागाचे प्रमुख वेतन व लेखा अधिकारी आहेत. 35 प्रशासकीय विभागांमधील डीडीओ कोषागारे/उप-कोषागारांशी जोडलेले आहेत.

लेखापरीक्षणाने मंजूर नमूना निवड कार्यपद्धतीद्वारे चार[20] प्रदेश आणि त्याअंतर्गत प्रत्येकी एक जिल्हा कोषागार[21] निवडले. निवडलेल्या जिल्हा कोषागारांपैकी सहा उप-कोषागारे[22] निवडण्यात आली. लेखापरीक्षणाने निवडलेल्या

[19] अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे.

[20] छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर आणि पुणे.

[21] छत्रपती संभाजीनगर, वांद्रे (मुंबई), पुणे आणि वर्धा (नागपूर).

[22] भोर, फुलंब्री, हिंगणघाट, कारंजा (घा), वेल्हांड, वैजापूर.

जिल्हा कोषागारांमधील सात[23] प्रशासकीय विभागांमधील 55 डीडीओ ***(परिशिष्ट 2.2.1)*** देखील निवडले.

आयएफएमएस मॉड्यूल्सच्या मूल्यांकनासाठी खालील कार्यपद्धती अवलंबण्यात आली:

- संनियंत्रणाचे मुल्यांकन आणि माड्युल्सचे कार्यांवयन तपासण्यासाठी नमुना चाचणीसाठी निवडलेल्या कोषागारांना आणि डीडीओंना सर्वेक्षण प्रश्नावली देऊन अनुप्रयोगाची (ॲप्लीकेशन्स) छाननी करण्यात आली.
- संगणक सहाय्यित लेखापरीक्षण तंत्र (सीएएटी) वापरून डेटा आणि अभिलेखांचे विश्लेषण करण्यात आले.
- अपवाद अहवालाची पुष्टी डीडीओंकडून भौतिक कागदपत्रांची पडताळणी/तथ्ये आणि आकडेवारीची पुष्टी करून केली गेली.
- ग्रास मॉड्यूलचे पाठपुरावा लेखापरीक्षण मुंबई येथील व्हर्च्युअल ट्रेझरी आणि कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि अमरावती येथील निवडक कार्यालयांमध्ये करण्यात आले. शासकीय प्राप्ती लेखा प्रणाली (ग्रास) साठी, वापरकर्ते व्हर्च्युअल ट्रेझरी ऑफिसर (व्हीटीओ), कर निर्धारण विभागांचे करदाते आणि सहभागी बँका आहेत.

लेखापरीक्षण निष्कर्ष

पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे आयएफएमएसच्या, लेखापरीक्षण निष्कर्षांचे वर्गीकरण प्रकल्प व्यवस्थापन, सामान्य नियंत्रणे आणि अनुप्रयोग नियंत्रणे या शीर्षकाखाली केले आहे.

2.2.8 प्रकल्प व्यवस्थापन

एनआयसीने त्यांच्याद्वारे विकसित केलेल्या मॉड्यूल्ससाठी कोणताही विकास खर्च आकारला नाही. तथापि, जून 2024 पर्यंत, आयएफएमएस प्रकल्पावर

[23] अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, महसूल आणि वन, कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता, नगरविकास.

झालेला वास्तविक खर्च **तक्ता 2.2.2** मध्ये तपशीलवार दिलेल्या घटकांवर ₹ 38.58 कोटी होता:

तक्ता 2.2.2: प्रकल्पाचा खर्च

अ.क्र.	घटक	प्रत्यक्ष खर्च (₹ मध्ये)
1.	टीसीएस द्वारे पाच वर्षांच्या देखभालीसह मॉड्यूलचा विकास आणि देखभाल.	
	अ. सॉफ्टवेअर विकासासाठी लागणारा मूळ खर्च	2,45,96,213
	ब. अनुप्रयोग सहाय्याची मूळ किंमत	4,91,52,407
	करांसह एकूण करार रक्कम	**7,37,48,620**
2.	2017 ते 2024 पर्यंत महाआयटी द्वारे मॉड्यूलची देखभाल	16,96,67,047
3	जून 2017 ते मे 2022 पर्यंत टीसीएल, मुंबईच्या डेटा सेंटरमध्ये अनुप्रयोग चालविणे	2,50,64,676
4	टीसीएलच्या डेटा सेंटरमध्ये अनुप्रयोग चालविण्यासाठी कराराची जून 2022 पासुन मार्च 2024 पर्यंत मुदतवाढ	11,73,54,303
	एकूण	**38,58,34,646**

स्रोत: डीएटीने पुरवलेली माहिती

आयएफएमएस मॉड्यूल्स एनआयसी आणि टीसीएस ने विकसित केले होते. एनआयसी ने विकसित केलेल्या मॉड्यूल्सची देखभाल एनआयसी स्वतःच करत होती. जेव्हा कि, टीसीएस ने विकसित केलेल्या मॉड्यूल्सची देखभाल जुलै 2017 पर्यंत टीसीएस करत होती. त्यानंतर, ही जबाबदारी महाराष्ट्र माहीती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी), मुंबई यांना सोपवण्यात आली. एनआयसी आणि टीसीएस या दोन्ही कंपन्यांनी विकसित केलेले मॉड्यूल्स टाटा कम्युनिकेशन लिमिटेड (टीसीएल) च्या डेटा सेंटरमध्ये स्थापित केले होते. याव्यतिरिक्त, हैदराबाद येथील आपत्कालीन पुनर्प्राप्ती स्थळ (डीआरपी) आयएफएमएस मॉड्यूल्सचे संरक्षण करते, ज्याचे कामकाज टीसीएल सांभाळते.

2.2.8.1 परफॉर्मन्स मॉनिटरिंग टूल्स (पीएमटी) चे कार्यावयन न करणे

सेवा स्तर करारानुसार (एसएलए) टीसीएसने (असे पीएमटी विकसित करून कार्यान्वित करायचे होते) जे व्यवस्थापनाला विविध कार्यप्रदर्शन प्रमुख निर्देशकांसह (पीएमकेआय) विविध अहवाल प्रदान करेल, ज्याद्वारे प्रकल्पाच्या विविध कार्यांवर आणि सेवा प्रदात्याद्वारे त्याच्या अंमलबजावणीवर बारकाईने लक्ष ठेवल्या जाईल.

एसएलएच्या परिच्छेद 19 नुसार, टीसीएसला आयटी सोल्युशन सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनचे पाच वर्षांसाठीचे देखभाल सहाय्य प्रदान करावयाचे होते जे प्रणालीच्या समाधानकारक कार्यप्रदर्शनावर आधारित असेल, ज्याचे मूल्यांकन पीएमटी द्वारे तयार केलेल्या पीएमकेआय द्वारे केले जाईल, उदा. ॲप्लिकेशन प्रतिसाद वेळ[24], ॲप्लिकेशन उपलब्धता, सुविधा व्यवस्थापन प्रतिसाद वेळ[25], सुविधा व्यवस्थापन समस्या निराकरण वेळ[26] आणि सुरक्षा व्यवस्थापन[27]. तथापि, लेखापरीक्षणात असे आढळून आले कि एजन्सीने पीएमटी विकसित/कार्यान्वित केले नाही. विकास आणि देखभालीदरम्यान उपभोक्त्याच्या क्रियाकलापांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी एसएलएमध्ये पीएमटीच्या विकासाचा समावेश असूनही, विभागाला तृतीय-पक्ष मूल्यांकन अहवालांवर अवलंबून राहावे लागले, ज्यामुळे मूल्यांकन प्रक्रियेच्या अचूकतेबद्दल आणि सर्वसमावेशकतेबद्दल शंका निर्माण झाली.

लेखापरीक्षणाने ही बाब निदर्शनास आणून दिल्यावर, शासनाने हे मान्य केले (जुलै 2025) कि टीसीएसने पीएमटी पुरविले नाही, त्याऐवजी टीसीएलने पीएमकेआय चे मासिक अहवाल प्रदान केले, ज्याच्या आधारावर विभागाने योग्य ती कारवाई केली. पुढे पीएमटी विकसित केले असते तर अतिरिक्त खर्च झाला असता असेही नमूद करण्यात आले.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण एसएलएमध्ये पीएमटीच्या कार्यांवयनाची तरतूद आहे आणि विभागाने ते सुनिश्चित करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. शिवाय, बिझनेस कंटिन्यूटी प्लॅन आणि डिझास्टर रिकव्हरी प्लॅन यांसारखे महत्त्वाचे मॉड्यूल्स देखील या अहवालांवर अवलंबून होते (ज्याचा तपशील **परिच्छेद 2.2.12** मध्ये दिला आहे).

---

24 वापरकर्त्यांना विशिष्ट वेळेत मॉड्यूल ॲक्सेस करता येईल याची खात्री करण्यासाठी.

25 सेवा प्रदात्याच्या सुविधा व्यवस्थापन आणि सहायता पथक/मदत कक्ष विभागाने नोंदवलेल्या समस्यांना निर्धारित वेळेत प्रतिसाद देईल याची खात्री करणे.

26 सेवा प्रदात्याच्या सुविधा व्यवस्थापन आणि सहायता पथकाने विभागाने नोंदवलेल्या समस्यांचे निराकरण निर्धारित वेळेत केले आहे याची खात्री करणे.

27 सेवेचा नकार, स्पॅम मालवेअर इत्यादी सुरक्षा संबंधित समस्या टाळण्यासाठी.

2.2.8.2 पॅकेज की इन्फ्रास्ट्रक्चर आणि डिजिटल सिग्नेचर इन्फ्रास्ट्रक्चरचे कार्यांवयन न करणे

पॅकेज की इन्फ्रास्ट्रक्चर (पीकेआय) हे सुनिश्चित करते कि संवेदनशील डेटा सुरक्षितपणे प्रसारित आणि संग्रहित केला जातो. पीकेआय डिजिटल स्वाक्षरी इन्फ्रास्ट्रक्चर (डीएसआय) च्या वापरास देखील सक्षम करते, जे कायदेशीररित्या मान्यताप्राप्त आहेत आणि स्वाक्षरी करणाऱ्याची सत्यता पडताळण्याचा मार्ग प्रदान करतात आणि स्वाक्षरी केलेल्या दस्तऐवज किंवा डेटाची सत्यता सुनिश्चित करतात. एसएलएच्या परिच्छेद 3 च्या भाग-डी मध्ये नमूद केल्यानुसार, पीकेआय आणि डीएसआय च्या विकासासाठी कामाची सविस्तर व्याप्ती स्पष्ट केली आहे.

डीएटी येथील दस्तऐवजांची तपासणी केल्यावर आणि आयएफएमएस ॲप्लिकेशन्सची पडताळणी केल्यावर लेखापरीक्षणास असे आढळून आले कि एजन्सीने पीकेआय विकसित केले नव्हते. परिणामी, एजन्सीने विकसित केलेल्या सेवार्थ च्या मॉड्यूल्समध्ये डेटा एन्क्रिप्शन, विश्वासाहर्ता आणि प्रमाणिकरण यंत्रणांचा अभाव होता. यामुळे प्रणालीची सुरक्षितता उल्लंघनांस बळी पडू शकते आणि आर्थिक व्यवहारांची व संवेदनशील माहितीची विश्वासाहर्ता धोक्यात आली.

ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर, शासनाने लेखापरीक्षणाच्या निरीक्षणांची दखल घेतली (जुलै 2025) आणि आयएफएमएससाठी पीकेआय/डीएसआय इंफ्रास्ट्रक्चर उपलब्ध नसल्याची पुष्टी केली. पुढे, विभागाने असेही सांगितले कि, ई-हस्ताक्षर सेवेच्या टप्पानिहाय विकासासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सेवार्थ आणि निवृत्तीवेतनवाहिनी अंतर्गत सर्व कागदपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी केली जाईल. प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि संबंधित प्रणालींसोबत एकत्रीकरण सुनिश्चित करण्यासाठी महाआयटी विकास संस्था आणि सी-डॅक यांच्यासोबत नियमित बैठका घेतल्या जात आहेत.

यातुन करारासंबंधी जबाबदाऱ्यांचे पालन करण्याचे महत्त्व आणि एसएलएच्या अटींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी मजबूत देखरेख यंत्रणेची आवश्यकता अधोरेखित होते.

2.2.8.3 जिल्हा परिषदा आणि इतर अनुदानित संस्था आणि संस्थांनांच्या कर्मचाऱ्यांसाठी टीसीएस द्वारे पेन्शन मॉड्यूल विकसित न करणे

एसएलएनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी तसेच जिल्हा परिषद (झेडपी) कर्मचाऱ्यांसाठी आणि इतर अनुदानित संस्था आणि संस्थांनांच्या कर्मचाऱ्यांसाठी टीसीएसने पेन्शन मॉड्यूल (निवृत्तिवेतनवाहिनी) विकसित करायचे होते. तथापि, टीसीएसने फक्त राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठीच हे मॉड्यूल विकसित केले.

शिवाय, लेखापरीक्षणात असे आढळून आले कि जिल्हा परिषद आणि इतर संस्थांसाठी या अनुप्रयोगाचा (अॅप्लीकेशन्स) एकूण विकास खर्च ₹ 34.47 लाख इतका होता. विभागाला टीसीएसकडून मॉड्यूलशी संबंधित विशिष्ट खर्च वजा करण्यास बांधील होते. तथापि, केवळ ₹ 22.50 लाख वसूल करण्यात आले. परिणामी, **तक्ता 2.2.3** मध्ये वर्णन केल्याप्रमाणे टीसीएसला ₹ 11.97 लाखांचा अवाजवी फायदा मिळाला.

तक्ता 2.2.3: टीसीएसला झालेला अवाजवी फायदा

अ. क्र.	अनुप्रयोगाच्या विकासाचे टप्पे	निवृत्तीवेतनाची *टक्के* वारी	निवृत्तीवेतनासाठी देय रक्कम (झेड.पी.) (₹ मध्ये)	पेन्शनसाठी देय रक्कम (इतर संस्था) (₹ मध्ये)	एकूण देय रक्कम (₹ मध्ये)
1.	पायलट कोषागारासाठी मासिक निवृत्तिवेतन बिले तयार होईपर्यंत संपूर्ण निर्मिती पूर्ण आणि संपूर्ण डेटा स्थलांतरण करणे.	25	6,89,441	1,72,360	8,61,801
2.	पायलट कोषागारासाठी थकबाकी बिलाची निर्मिती	25	6,89,441	1,72,360	8,61,801
3	पायलट कोषागारासाठी पहिली प्रदान प्रक्रिया आणि बिल निर्मिती	10	2,75,776	68,944	3,44,720
4.	कार्यालय प्रमुखाद्वारे निवृत्तिवेतन प्रकरण तयार करण्याची संपूर्ण कार्यप्रणाली	10	2,75,776	68,944	3,44,720
5.	विविध इंटरफेसचा विकास	10	2,75,776	68,944	3,44,720

अ. क्र.	अनुप्रयोगाच्या विकासाचे टप्पे	निवृत्तीवेतनाची *टक्के* वारी	निवृत्तीवेतनासाठी देय रक्कम (झेड.पी.) (₹ मध्ये)	पेन्शनसाठी देय रक्कम (इतर संस्था) (₹ मध्ये)	एकूण देय रक्कम (₹ मध्ये)
6	सर्व कोषागारांमध्ये प्रारंभ (गो लाईव्ह)	20	5,51,553	1,37,888	6,89,441
एकूण वजावट		**100**	**2,75,7763**	**6,89,440**	**3447203**
प्रत्यक्षात कपात केलेली			**18,00,000**	**4,50,000**	**22,50,000**
अतिरिक्त प्रदान			**9,57,763**	**2,39,440**	**11,97,203**

शासनाने (जुलै 2025) उत्तर दिले कि, यासंबंधीच्या तथ्यांची पडताळणी केली जाईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल.

2.2.8.4 वापरकर्ता स्तरावरील गरजांचे अपुरे मूल्यांकन

निवडलेल्या 51 डीडीओंशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणांवर आधारित, वापरकर्त्यांच्या गरजांच्या पर्याप्ततेबाबत शासनाकडून मिळालेले उत्तर खालीलप्रमाणे सारणीबद्ध केले आहे:

क्र.	लेखापरीक्षण निरीक्षण	शासनाचा प्रतिसाद
अ) हाताने तयार केलेली बिले (सेवार्थ)		
1.	***परिशिष्ट 2.2.2.*** मध्ये सविस्तर नमूद केल्यानुसार, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांशी संबंधित रजा रोखीकरण बिल, ग्रॅच्युइटी आणि वेतन थकबाकीची बिले अजूनही हातानेच तयार केली जात आहेत.	शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकबाकी बिलं, रजा रोखीकरण यांसाठी सुविधा नवीन 'सेवार्थ' प्रणालीमध्ये विकसित केली जाईल.
ब) परतावा व्हाउचर्स तयार करण्यासाठी कोणतीही तरतूद नाही (बिल पोर्टल)		
2.	लेखापरीक्षणात असे आढळून आले कि, आयएफएमएस च्या बिल पोर्टल ॲप्लिकेशनमध्ये योगदान पावती, जीआयएस, अतिरिक्त रक्कम भरणा, ठेवी आणि व्यपगत ठेवी, न्यायालयीन शुल्क, मुद्रांक आणि डीसीपीएस यांसारख्या परतावा व्हाउचर बिलांसाठी (आरव्हीबी) कोणतीही तरतूद नव्हती. त्यामुळे, डीटीओंनी 2018-24 या कालावधीत	शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, परतावा व्हाउचर बिले तयार करण्यासाठी सुविधा विकसित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

क्र.	लेखापरीक्षण निरीक्षण	शासनाचा प्रतिसाद
	147305 परतावा व्हाउचर बिले (ज्याचा तपशील ***परिशिष्ट 2.2.3*** मध्ये दिला आहे) हाताने तयार केली.	
क) निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाचा भाग पूर्ववत न होने (निवृत्तीवेतनवाहिनी)		
3.	कम्युटेड पेन्शन नियम, 1984 नुसार, शासकीय कर्मचाऱ्याची पेन्शन, कम्युटेशन रूपांतर केल्याच्या तारखेपासून 15 वर्षे पूर्ण झाल्यानंतर पूर्ववत केली जाते. या ॲप्लिकेशनमध्ये निवृत्तिवेतन पूर्ववत करण्याची स्वयंचलित सुविधा नव्हती आणि त्यामुळे कोषागार अधिकाऱ्यांना ही प्रक्रिया स्वतःच करावी लागत होती.	शासनाने (जुलै 2025) सांगितले कि जुना पेन्शन डेटा सिस्टममध्ये मॅन्युअली टाकण्यात आला होता. त्यावेळी कम्युटेशन तारखेशी संबंधित स्तम्भात नोंद केलली गेली नव्हती. पुढे असेही नमुद केले कि, जर कम्युटेशन आपोआप पुनर्संचयित केले गेले तर निवृत्तिवेतनधारकाला जास्त पैसे दिले जाऊ शकतात. ही ऑटो-रिस्टोरेशन सुविधा टाळण्यासाठी ही सुविधा लागू केलेली नाही.
ड) 80 वर्षांनंतर निवृत्तिवेतन वाढवण्याची सुविधा नाही (निवृत्तिवेतनवाहिनी)		
4.	एफडीने निवृत्तिवेतनधारकांचे वय 80 आणि अधिक झाल्यास त्याचे निवृत्तिवेतन वाढविण्याचा निर्णय घेतला (24/01/2019). निवडलेल्या कोषागारांमध्ये, निवृत्तिवेतनवाहिनी ॲप्लीकेशन ऑटो-वर्किंगची सुविधा नसल्याने निवृत्तिवेतन वाढवण्याची प्रक्रिया मॅन्युअली केली जात होती.	शासनाने सांगितले (जुलै 2025) कि जुना पेन्शन डेटा सिस्टममध्ये मॅन्युअली टाकण्यात आला होता. त्यावेळी निवृत्तिवेतनधारक आणि कुटुंब पेन्शनधारकांच्या जन्मतारखेची नोंद संबंधित स्तम्भात करण्यात आली नव्हती. पुढे असेही नमुद केले कि, जर अतिरिक्त पेन्शन आपोआप पुनर्संचयित केली गेली तर पेन्शनधारकाला जास्त पैसे दिले जाऊ शकतात. हे टाळण्यासाठी स्वयं-संचयन सुविधा लागू केलेली नाही.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे कि, आयएफएमएस ॲप्लिकेशनमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची बिले तयार करण्याची तरतूद नव्हती. शिवाय, त्यात आरव्हीबी तयार करण्याची सुविधा समाविष्ट नव्हती. याव्यतिरिक्त, निवृत्तिवेतनाचा अंशराशीकृत केलेला भाग पूर्ववत करण्यासाठी किंवा 80 वर्ष पूर्ण झाल्यावर निवृत्तिवेतन वाढवण्यासाठी कोणतीही तरतूद नव्हती.

2.2.9 सामान्य नियंत्रणे

सामान्य नियंत्रणांमध्ये डेटा सेंटर ऑपरेशन्स, सिस्टम सॉफ्टवेअरची खरेदी आणि देखभाल, पोच सुरक्षा आणि ॲप्लिकेशन सिस्टमचा विकास व देखभाल यावरील नियंत्रणांचा समावेश होतो. ही नियंत्रणे असे वातावरण तयार करतात, ज्यात ॲप्लिकेशन सिस्टम आणि ॲप्लिकेशन नियंत्रणे कार्य करतात. या सामान्य नियंत्रणांच्या अंमलबजावणीमध्ये ओळखलेल्या त्रुटी खालीलप्रमाणे अधोरेखित केल्या आहेत:

2.2.9.1 भौतिक पोच नियंत्रण

आयएफएमएस हे एक वेब-आधारित ॲप्लिकेशन आहे, जे टीसीएल डेटासेंटरमध्ये केंद्रीयरित्या स्थापित केलेले आहे. आयएफएमएस चे प्रमुख भागधारक संपूर्ण राज्यातील डीडीओ आणि खजाना अधिकारी आहेत. लेखापरीक्षणात ग्राहक-साइड संगणकीय उपयोगकर्त्याच्या बाजुने मालमत्तेला कोणताही भौतिक धोका आढळला नाही. तथापि, लेखापरीक्षणात काही समस्या आढळल्या, जसे कि परवाना नसलेल्या सॉफ्टवेअरचा वापर, उपयोगकर्त्याच्या संगणकांवर बाह्य उपकरणांचा वापर आणि उपयोगकर्त्याच्या मशीनवर सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशनवर निर्बंधांचा अभाव. काही चिंता खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत:

- लेखापरीक्षणात निवडलेल्या डीडीओ आणि कोषागार अधिकारी यांच्या कार्यालयांमध्ये असे आढळून आले कि, यूएसबी ड्राइव्ह, बाह्य हार्ड ड्राइव्ह, मोबाइल उपकरणे आणि इतर काढता येण्याजोग्या माध्यमांसारख्या बाह्य उपकरणांच्या वापरावरील निर्बंधांवर भर दिला गेला नव्हता. असे दिसून आले कि वर्कस्टेशन्सवरील यूएसबी पोर्ट्स/ सीडीरॉम इत्यादी अक्षम केले गेले नव्हते ***(परिशिष्ट 2.2.4).***

- आयएफएमएस साठी वापरल्या जाणाऱ्या सर्व उपयोगकर्त्याच्या टर्मिनल्सवर परवानाधारक सॉफ्टवेअर व्यतिरिक्त इतर कोणत्याही सॉफ्टवेअरच्या इन्स्टॉलेशनसाठी बंदी घातली पाहिजे. ही व्हायरस/मालवेअरपासून संरक्षणासाठी पहिली संरक्षण यंत्रणा आहे. तथापि, लेखापरीक्षणात असे आढळून आले कि आयएफएमएस साठी वापरल्या जाणाऱ्या उपयोगकर्त्याच्या टर्मिनल्सवर अशा कोणत्याही

निर्बंधांवर भर दिला जात नाही. परवान्यांचे विश्लेषण ***(परिशिष्ट 2.2.5)*** मध्ये दिले आहे, जे वैयक्तिक संगणक (पर्सनल कम्पुटर) आणि परवाना असलेले ऑपरेटिंग सिस्टम आणि एमएस-ऑफिस परवाना यांच्या संख्येत मोठी तफावत दर्शविते. त्यामुळे, अशा अनधिकृत सॉफ्टवेअरमधून डेटाबेसमध्ये प्रवेश करण्याचा धोका आहे.

शासनाने (जुलै 2025) उत्तर दिले कि, डीडीओच्या बाबतीत, ते थेट विभागाच्या नियंत्रणाखाली नाहीत. तथापि, कोषागार आणि उप-कोषागारांसाठी जून 2023 मध्ये सूचना जारी करण्यात आल्या होत्या, ज्यात बाह्य उपकरणांच्या वापरास मनाई करण्यात आली होती आणि केवळ परवानाधारक सॉफ्टवेअर वापरणे अनिवार्य करण्यात आले होते, तसेच आयएफएमएस ॲप्लिकेशन्स चालवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संगणकांवर परवाना नसलेले सर्व सॉफ्टवेअर ब्लॉक करण्यात आले होते.

वस्तुस्थिती अशी आहे कि, या सूचनांचे अंतिम वापरकर्त्यांकडून सातत्याने पालन केले गेले नाही, ज्यावरुन आणखी गांभिर्याची आवश्यकता अधोरेखित होते.

2.2.10 तार्कीक हाताळणी नियंत्रण

आयएफएमएसमध्ये तीन डेटाबेस होते, एक बिम्स आणि बिलपोर्टलसाठी, दुसरा सेवार्थ आणि तिसरा डेटाबेस ट्रेझरीनेटसाठी होता. जरी हे मॉड्यूल्स एकात्मिक असले तरी, प्रत्येक डेटाबेस स्वतंत्र युनिव्हर्सल रिसोर्स लोकेशन्स (यूआरएल) आणि लॉगिन क्रेडेंशियल्सद्वारे हाताळणी केला जात होता. लेखापरीक्षणाने प्रत्येक डेटाबेसशी संबंधित लॉगिन क्रेडेंशियल्सचे विश्लेषण केले आणि त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे मांडले आहेत.

2.2.10.1 वर्धित सुरक्षा उपायांची आवश्यकता

बिलपोर्टल मॉड्यूल बिम्स द्वारे ऑनलाइन अर्थसंकल्पीय अनुदानांची प्राप्ती आणि खर्चाशी संबंधित बिलांवर प्रक्रिया करण्याचे काम हाताळते. सेवार्थ मॉड्यूल सुमारे सहा लाख राज्य कर्मचाऱ्यांचे ऑनलाइन वेतन आणि भत्ते व्यवस्थापित करण्यासाठी जबाबदार आहे. ट्रेझरीनेट मॉड्यूल बिलपोर्टल आणि सेवार्थ द्वारे प्रक्रिया केलेल्या बिलांवर प्रक्रिया करते.

असे आढळून आले कि ट्रेझरीनेट मॉड्यूलसाठी दुहेरी ऑथेंटिकेशन सक्षम केले होते. तथापि, बिलपोर्टल आणि सेवार्थ मॉड्यूल्समध्ये टू-वे ऑथेंटिकेशनची सोय नव्हती. शिवाय, दोन्ही मॉड्यूल्समध्ये डेटा एन्क्रिप्शनसाठी पीकेआय नव्हते, ज्यामुळे त्यात संभाव्य अनधिकृत प्रवेश होवु शकत होता. म्हणून, सुरक्षा वाढवण्यासाठी, लॉगिन प्रक्रियेमध्ये दोन-घटक प्रमाणिकरणाचा समावेश केला पाहिजे, जसे कि पासवर्ड आणि नोंदणीकृत मोबाइल डिव्हाइसवर ओटीपी पडताळणी.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, बिलपोर्टलमध्ये लॉगिनसाठी ओटीपीसह टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. सेवार्थ साठी टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन लागू केले जाईल.

2.2.10.2 वापरकर्ता दस्तऐवजीकरण आणि तार्कीक हाताळणी नियंत्रणाच्या डिझाइनमधील तफावत आणि रोल 'झेड' परवानग्यांमधील विसंगती

ट्रेझरीनेट मॉड्यूलच्या डेटाफ्लोचे पुनरावलोकन करताना, लेखापरीक्षणात असे दिसून आले कि, डीडीओंने सादर केलेली बिले स्क्रोल, लेखापरीक्षा, कंपाइलेशन, चेक काढणे, दैनिक क्लोजिंग, वितरण, प्राप्ती आणि जुळवणी यांसारख्या विविध विभागांमधून जातात. या विभागांना हाताळणी विशेषाधिकार नियुक्त करताना, तीन प्राथमिक भूमिका परिभाषित केल्या होत्या: 'ओ' (ऑपरेटर), 'एस' (पर्यवेक्षक/सहाय्यक प्रशासकीय अधिकारी) आणि 'झेड' (प्रभारी किंवा सहाय्यक कोषागार अधिकारी/एपीएओ). प्रत्येक विभागासाठी, विशिष्ट कार्ये निश्चित केली होती आणि भूमिका-आधारित हाताळणी परवानगी मॅट्रिक्स प्रदान केला होता (प्रत्येक विभाग-कार्य संयोजनाचा समावेश असलेला) ज्यात प्रत्येक विभाग कार्य एकत्रित केले होते.

जरी ट्रेझरीनेटच्या वापरकर्ता मॅन्युअलमध्ये विभाग-कार्य स्तरावर भूमिका-आधारित हाताळणी परवानग्या परिभाषित केल्या असल्या तरी, सध्याच्या डेटाबेस डिझाइनने भूमिका-आधारित परवानग्या केवळ विभाग स्तरापर्यंतच मर्यादित करून कार्य स्तरावरील परवानग्या वगळल्या होत्या. अशा प्रकारे, संकल्पनात्मक/ दस्तऐवजीकरण स्तरावरील कार्यात्मक सुस्पष्टता व्यावहारिक डिझाइनमध्ये रूपांतरित झाली नाही.

या विसंगतीमुळे दस्तऐवजीकरण केलेल्या हाताळणी नियंत्रण आवश्यकता आणि अंमलात आणलेल्या प्रणालीमध्ये एक मोठी तफावत दिसून आली. दस्तऐवजीकरणाचे पूर्णपणे पालन करण्यासाठी, विभागांमधील प्रत्येक कार्यासाठी भूमिका-आधारित परवानग्या समाविष्ट करण्यासाठी डेटाबेस डिझाइनमध्ये सुधारणा करणे अनिवार्य आहे.

भूमिका-आधारित हाताळणी धोरण प्रणालीमध्ये पदानुक्रम तयार करण्यासाठी विभाग आणि भूमिकांवर आधारित परवानग्या नियुक्त करते. रोल झेड हा कोषागार/उप-कोषागार प्रभारी किंवा सहाय्यक कोषागार अधिकारी किंवा सहाय्यक वेतन आणि लेखा अधिकाऱ्याला दिला जातो. प्रशासनाच्या या टप्प्यावरील अधिकाऱ्यांना बिले स्क्रोल करणे, चेक/टोकन वितरित करणे किंवा चालान स्वीकारणे, किंवा खात्यांचे दैनिक क्लोजिंग करणे किंवा संकलन करणे आवश्यक नसते.

असे आढळले कि, स्क्रोल, वितरण, प्राप्ती, संकलन आणि दैनिक क्लोजिंगच्या परवानग्या रोल झेड परवानगी असलेल्या वेगवेगळ्या वापरकर्त्यांसाठी नियुक्त केल्या होत्या. हे दस्तऐवजीकरण केलेल्या हाताळणी धोरणांमधील विसंगती दर्शवते.

हे निदर्शणास आणल्यावर, शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, सध्याची ट्रेझरीनेट आवृत्ती जुनी आहे, विभाग एनआयसीच्या मदतीने एकात्मिक ट्रेझरीनेटच्या विकासाच्या प्रक्रियेत आहे, ज्यामध्ये कार्यात्मक स्तरावर परवानगी विकसित केली जाईल.

पुढे असेही नमूद केले कि, हाताखालील भूमिका बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'झेड' भूमिका सर्व कोषागार अधिकाऱ्यांना न देण्याबाबत सूचना जारी केल्या जातील.

तथ्य असेच राहिले कि, दस्तऐवजीकरण केलेल्या प्रवेश नियंत्रण धोरणांमध्ये आणि प्रत्यक्षात दिलेल्या परवानग्यांमध्ये विसंगती आहे.

2.2.10.3 ट्रेझरीनेट मॉड्यूलमध्ये एकाच वापरकर्त्याला परस्परविरोधी विशेषाधिकार

दस्तऐवजीकरणानुसार, तीन प्राथमिक भूमिका परिभाषित केल्या होत्या: 'ओ' (ऑपरेटर), 'एस' (पर्यवेक्षक/सहाय्यक प्रशासकीय अधिकारी) आणि 'झेड' (प्रभारी किंवा सहाय्यक कोषागार अधिकारी/एपीएओ).

लेखापरीक्षणात असे आढळून आले कि, ***परिशिष्ट 2.2.6*** मध्ये तपशील दिल्याप्रमाणे, 55 कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या भूमिका (म्हणजेच 'ओ', 'एस' आणि 'झेड') सोपवण्यात आल्या होत्या.

शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, एक प्रक्रिया म्हणून प्रत्येक वापरकर्त्याला फक्त एकच भूमिका दिली जाते, परंतु कोषागाराच्या आवाक्याबाहेरील प्रशासकीय अडचणींमुळे, कधीकधी एकाच कर्मचाऱ्याला एकापेक्षा जास्त भूमिकांची कार्ये पार पाडावी लागतात.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे कि, प्रवेश अधिकारांच्या चुकीच्या वाटपामुळे सुरक्षेचा मोठा धोका निर्माण झाला आहे, कारण अनधिकृत वापरकर्ते त्यांना दिलेल्या जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त इतर कार्ये करू शकतात.

2.2.10.4 वापरकर्ता खाते लॉकआउट यंत्रणेचा अभाव

एकाधिक अयशस्वी लॉगिन प्रयत्नांनंतर खाते लॉकआउट होण्याची यंत्रणा नसल्यामुळे अभावामुळे सुरक्षेचा मोठा धोका आहे. या असुरक्षिततेमुळे प्रणाली ब्रूट-फोर्स हल्ल्यांना बळी पडू शकते, जिथे हल्लेखोर कोणत्याही निर्बंधाशिवाय वारंवार वेगवेगळ्या पासवर्ड संयोजनांचा प्रयत्न करू शकतात, ज्यामुळे अनधिकृत प्रवेशाची शक्यता वाढते.

लेखापरीक्षणात असे दिसून आले कि, अनेक अयशस्वी लॉगिन प्रयत्नांनंतरही, बिलपोर्टल आणि सेवार्थ मॉड्यूलमध्ये वापरकर्ता खाती लॉक केली गेली नाहीत.

शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, तीन अयशस्वी लॉगिन प्रयत्नांनंतर वापरकर्ता खाते लॉक करण्याची प्रणाली योग्य सॉफ्टवेअरमध्ये विकसित केली जाईल.

2.2.10.5 वापरकर्त्यांना एकाधिक भूमिकांचे वाटप

बिलपोर्टल डेटाबेसवरील विविध व्यवहारांना अधिकृत करण्यासाठी, बीडीएस रोल्स नावाच्या मास्टर तक्त्यामध्ये सीओ, डीडीओ इत्यादी वापरकर्त्यांसाठी विविध भूमिका परिभाषित केल्या आहेत. बीडीएस युजर नावाचा आणखी एक तक्ता अस्तित्वात होता, ज्यामध्ये 30,187 वापरकर्त्यांची यादी होती आणि बीडीएस रोल्स मध्ये नियुक्त केलेल्या वापरकर्ता भूमिकांशी त्याचा संबंध होता.

तथापि, बिलपोर्टल मॉड्यूलच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, वापरकर्त्यांचा तपशील असलेल्या मास्टर तक्त्यामधील (बीडीएस वापरकर्ता) 560 वापरकर्त्यांच्या भूमिका, वापरकर्त्यांसाठी भूमिका परिभाषित करणाऱ्या मास्टर तक्त्यामध्ये (बीडीएस रोल्स) परिभाषित केलेल्या नव्हत्या, ज्याचा तपशील **तक्ता 2.2.4** मध्ये दिला आहे:

तक्ता 2.2.4: अपरिभाषित भूमिकांचे वाटप

भूमिका	मास्टर तक्त्यामध्ये परिभाषित नसलेल्या भूमिका	वापरकर्त्यांची संख्या
1	प्रशासन एजी	1
4	कोषागार अधिकारी	375
C	प्रशासन ईपीसी	1
D	--	169
J	संयुक्त संचालक लेखा आणि कोषागार	7
M	सेवा-एमडीसी	1
P	--	6
एकूण		**560**

यावरून असे दिसून येते कि तक्त्यामध्ये संदर्भिक अखंडतेचा अभाव होता आणि त्यामुळे प्रशासकाला वापरकर्त्यांना कोणत्याही अपरिभाषित भूमिका नियुक्त करण्याची परवानगी मिळत होती.

उत्तरादाखल, शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, मास्टर तक्त्यामध्ये (बीडीएस युजर), नसलेल्या भूमिका आता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

2.2.10.6 व्यक्तींना दुबार (डुप्लिकेट) वापरकर्ता नावे वाटप करणे

एखाद्या ॲप्लिकेशनसाठी एक अद्वितीय लॉगिन आयडी (वापरकर्ता नाव) असणे अनिवार्य आहे. तथापि, **'सेवार्थ'** मॉड्यूलच्या लॉगिन क्रेडेन्शियल्सच्या

पडताळणीमध्ये, लेखापरीक्षणास असे आढळून आले कि 72 प्रकरणांमध्ये दुबार वापरकर्ता नावे तयार केली गेली होती. यामुळे एक गंभीर सुरक्षा धोका निर्माण झाला, कारण यामुळे वापरकर्ता प्रमाणिकरणाच्या विश्वासाहर्तेशी तडजोड होवुन, संवेदनशील डेटावर अनधिकृत प्रवेशाची शक्यता निर्माण झाली आणि वापरकर्त्यांच्या क्रियाकलापांचा अचूक मागोवा घेणे व उत्तरदायित्व निश्चित करणे कठीण झाले. याव्यतिरिक्त, प्रत्येक वापरकर्त्यासाठी अद्‌वितीय ओळख असण्याच्या अभावामुळे डेटा उल्लंघनाचा आणि अंतर्गत गैरवापराचा धोका वाढला.

शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, आढळून आलेली दुबार वापरकर्ता नावे केवळ अशा प्रकरणांशी संबंधित आहेत जिथे वापरकर्त्यांकडे वेगवेगळ्या कालावधीत सक्रिय आणि निष्क्रिय पदाचा दर्जा होता. पुढे असेही नमूद केले आहे या कि समस्येचे निराकरण करण्यासाठी ही नावे काढुन घेण्याची (क्लिन अप) मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या संदर्भात पुढील प्रगतीची प्रतीक्षा आहे (जानेवारी 2025).

2.2.11 क्षमता बांधणी

डीएटी कार्यालयात उपसंचालक (प्रशिक्षण) यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र प्रशिक्षण विभाग आहे. महाराष्ट्र शासनाचे आहरण व संवितरण अधिकारी, नियंत्रण अधिकारी, कोषागार अधिकारी/उप-कोषागार अधिकारी यांच्यासाठी आयएफएमएसवर वेळोवेळी ऑनलाइन, ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित केले जाते. याव्यतिरिक्त, प्रादेशिक स्तरावर सहा प्रशिक्षण विभाग आहेत, ज्यांचे नेतृत्व सहाय्यक संचालक (प्रशिक्षण) करतात, जे महाराष्ट्र शासनाच्या विभागांच्या उप-कोषागार, कोषागाराच्या आणि प्रादेशिक स्तरावरील प्रादेशिक कार्यालयातील उप-कोषागार, कोषागाराच्या सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. आयटी सुरक्षा आणि आयटी मालमत्तेचे संरक्षण, आपत्ती जागरूकता प्रशिक्षण, सायबर जागरूकता प्रशिक्षणे देखील आयोजित केली जातात.

महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयांमध्ये डीडीओ, सीओ, टीओ/एसटीओ यांची एकूण संख्या 29,919 आहे. तथापि, असे लक्षात आले कि आयएफएमएस मॉड्यूलच्या प्रभावी आणि कार्यक्षम वापरासाठी विभागाने कोणतेही प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण

केले नाही. परिणामी, प्रशिक्षण आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची अपेक्षित संख्या लेखापरीक्षणास आकलन करता आली नाही.

तक्ता 2.2.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे डीएटीने 2018-19 ते 2022-23 या वर्षांसाठी दिलेल्या माहितीनुसार, केवळ 22 *टक्के* कर्मचाऱ्यांना आयएफएमएस मॉड्यूल्स चालवण्याचे प्रशिक्षण मिळाले होते.

तक्ता 2.2.5: आयएफएमएस मॉड्यूल्सवर प्रशिक्षण दिलेले कर्मचारी

क्र.	प्रशिक्षण तपशील	प्रशिक्षण सत्रांची संख्या	प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या
1	आयएफएमएस मॉड्यूल्ससाठी ऑफलाइन प्रशिक्षण	580	3,883
2	आयएफएमएस मॉड्यूल्ससाठी ऑनलाइन प्रशिक्षण	69	2,611
एकूण		**649**	**6,494**

2023-24 मध्ये देण्यात आलेल्या प्रशिक्षणासंबंधी माहिती उपलब्ध केली गेली नाही.

शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, प्रशिक्षण गरजा विश्लेषण (टीएनए) केले गेले आहे. टीएनए वर आधारित, आयएफएमएस प्रशिक्षण प्रोबेशनरी अधिकाऱ्यांच्या संयुक्त प्रोबेशनरी प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) आणि विभागीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नती प्रशिक्षणात लागू केले गेले आहे.

विभागाचे उत्तर मान्य करण्यास योग्य नाही कारण अद्याप फक्त 22 *टक्के* कर्मचाऱ्यांनाच प्रशिक्षित करण्यात आले आहे.

2.2.11.1 अपुरे हेल्प डेस्क व्यवस्थापन

आयटी वापरकर्त्यांच्या प्रश्नांना आणि समस्यांना वेळेवर आणि प्रभावी प्रतिसाद देणे हे सुव्यवस्थित आणि कार्यक्षमतेने व्यवस्थापित सेवा डेस्क आणि घटना व्यवस्थापन प्रक्रियेवर अवलंबून असते.

जसे अहवालात आधीच अधोरेखित केले आहे, सेवार्थ मॉड्यूलच्या सिस्टीम देखभालीची जबाबदारी महाआयटी कडे आहे, तर बिम्स , बिलपोर्टल आणि ट्रेझरीनेट मॉड्यूल्सची देखभाल एनआयसीद्वारे केली जाते.

तथापि, 51 डीडीओंकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, घटना नोंदवण्यासाठी कोणतीही एकसमान आणि सुव्यवस्थित प्रक्रिया अस्तित्वात नाही. वापरकर्त्यांच्या प्रतिसादांमध्ये लक्षणीय फरक दिसून आला, काहींनी असे सांगितले कि त्यांनी 'विभागाशी संपर्क साधावा' असा सल्ला त्यांना देण्यात आला होता, तर इतरांनी नमूद केले कि त्यांना 'ईमेलद्वारे डीएटी/एनआयसीला समस्येची माहिती देणे' आवश्यक होते. या स्पष्टतेच्या अभावामुळे वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये विसंगत कार्यपद्धती निर्माण झाल्या आहेत.

पुढे, डीडीओंनी कळवले कि सेवार्थ मॉड्यूलसाठी, मदत तुलनेने सहज उपलब्ध होती. जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत सहाय्य मिळू शकत होते आणि समस्या पुढे पाठवण्यासाठी एक अधिकृत हेल्पडेस्क ईमेल (helpdesk.war.mh@gov.in) उपलब्ध होता. या व्यवस्थेमुळे वापरकर्त्यांना त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक निश्चित माध्यम उपलब्ध झाले. याउलट, एनआयसीद्वारे विकसित आणि देखरेख केल्या जाणाऱ्या बिलपोर्टल आणि बिम्स मॉड्यूल्ससाठी अशा कोणत्याही संरचित सहाय्य यंत्रणेची माहिती देण्यात आली नाही.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, विविध कार्यात्मक समस्या आणि तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी डीएटी स्तरावर एक स्वतंत्र टीम कार्यरत आहे. कार्यात्मक समस्या आणि तांत्रिक समस्या सोडवण्यासाठी, ठरलेल्या कार्यपद्धतीनुसार त्या एनआयसी कडे पाठवल्या जातात.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे कि डीडीओ स्तरावर बिलपोर्टल आणि बिम्स संबंधित अनेक समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत.

2.2.12 व्यवसाय सातत्य आणि आपत्ती व्यवस्थापन

आयएफएमएस ही एक मिशन क्रिटिकल प्रणाली असल्याने, व्यवसाय सातत्य (बीसी) आणि आपत्ती निवारण (डीआर) योजना असणे अनिवार्य आहे. बीसी आणि डीआर योजनेचा भाग म्हणून, विभागाने रिकव्हरी पॉइंट ऑब्जेक्टिव्ह्ज (आरपीओ) तयार करून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे, जे स्वीकारार्ह डेटा नुकसानीची सीमा ठरवते, म्हणजेच आपत्तीमध्ये किती डेटाचे नुकसान सहन केले जाऊ शकते; आणि रिकव्हरी टाइम ऑब्जेक्टिव्ह्ज (आरटीओ) जे

प्रणाली/प्रक्रियांच्या पुनर्प्राप्तीसाठी कमाल स्वीकार्य डाउनटाइम विनिर्दिष्ट करते. नियतकालिक डीआर सराव केले नसणे म्हणजेच नियमित आपत्ती निवारण सराव किंवा चाचण्यांचा अभाव, ज्यामुळे संस्थेची व्यत्ययांमधून सावरण्याच्या क्षमतेची चाचणी होते.

लेखापरीक्षणात असे आढळून आले कि, डीएटी ने टीसीएल सोबत पाच वर्षांच्या करारादवारे (मार्च 2017) सर्व बीसी आणि डीआर नियोजन उपक्रम बाह्यस्रोत केले होते, ज्याला जून 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. करारानुसार, टीसीएलला करारात नमूद केलेल्या उपक्रमांच्या प्रगतीवर लक्ष ठेवायचे होते आणि ***परिशिष्ट 2.2.7*** नुसार मासिक प्रगती अहवाल सादर करायचा होता. लेखापरीक्षणाने 2018-24 या कालावधीशी संबंधित अहवालांची चाचणी केली आणि असे निरीक्षण केले कि:

2.2.12.1 व्यवसाय सातत्य योजना

करारानुसार, टीसीएलने व्यवसाय सातत्य योजनेचा (बीसीपी) अहवाल दरवर्षी डीएटीकडे सादर करणे अपेक्षित होते. अशा अहवालांच्या पडताळणीमध्ये खालील विसंगती आढळल्या:

अ. नवीनतम (मार्च 2024) बीसीपी दस्तऐवजाच्या पडताळणीत असे दिसून आले कि, पहिल्या सादर केलेल्या योजनेपासून (जून 2020) त्यात कोणतेही बदल किंवा फेरबदल करण्यात आले नव्हते, जे दर्शवते कि व्यवसाय सातत्य योजनेचा आढावा घेतला गेला नव्हता किंवा ती अद्ययावत केली गेली नव्हती.

ब. वार्षिक बीसीपी सोबत जोडणे आवश्यक असलेला, बनावट सरावांचा किंवा वास्तविक परिस्थितीचा चाचणी अहवाल, टीसीएलने सादर केलेल्या प्रत्येक वार्षिक अहवालात रिकामा होता.

क. बीसीपी मध्ये एक समर्पित आपत्ती निवारण गट ओळखला गेला होता आणि त्यांना विशिष्ट भूमिका व जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या होत्या, तरीही आपत्तीच्या वेळी महत्त्वाचे कर्मचारी, तृतीय पक्ष आणि वापरकरत्यांच्या मुदतीसाठी वापरकर्ता संपर्कांची यादी असलेले रकाने रिकामे आढळले.

आरपीओ/आरटीओचा अभाव स्पष्ट लक्ष्यांसह पुनर्प्राप्ती प्रयत्नांचा अभाव, अपु-या पुनर्संचयित प्राधान्यक्रमाचा धोका आणि अस्वीकार्य व्यवसाय परिणाम दर्शवते. शिवाय, नियतकालिक कवायतींशिवाय, डीआर योजना प्रभावी आहेत कि नाहीत, कर्मचारी तयार आहेत कि नाहीत किंवा प्रणाली अपेक्षेनुसार पुर्ववत होऊ शकतात याबद्दल अनिश्चितता आहे. डीआर कवायती तयारीची पडताळणी करतात आणि त्रुटी ओळखतात.

हे निदर्शनास आणल्यावर शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, बीसीपी तयार करण्याची आणि त्याची वार्षिक आढावा घेण्याची काळजी घेतली जाईल.

या संदर्भात पुढील प्रगतीची प्रतीक्षा आहे (सप्टेंबर 2025).

2.2.12.2 अपुरा आपत्ती निवारण आराखडा (डीआरपी)

जरी टीसीएलने सादर केलेला डीआरपी जागरूकता आराखडा सर्वसमावेशक आढळला असला तरी, लेखापरीक्षणात असे दिसून आले कि तो केवळ टीसीएलच्या डेटा सेंटरमधील कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित होता. याव्यतिरिक्त, डीआरपी संबंधित कोणतेही दस्तऐवज डीएटी कडे सादर केले गेले नव्हते, ज्यात भूमिका आणि जबाबदाऱ्या सोपविलेल्या व्यक्तींची नावे, दिलेल्या प्रशिक्षणाचे तपशील, डीआरपी दस्तऐवजाच्या प्रती आणि गटाच्या सदस्यांचे संपर्क तपशील इत्यादींचा समावेश होता.

पुढे, डीएटीकडे ॲप्लिकेशन्सच्या विकास आणि देखभालीसाठी पुणे येथील एनआयसी डेटा सेंटर आणि मुंबई येथील महाआयटी सारख्या वेगवेगळ्या जागा होत्या, तरीही या जागांसाठी किंवा राज्यभरात पसरलेल्या वापरकर्त्यांच्या ठिकाणांसाठी (जसे कि डीडीओ /कोषागार अधिकारी) कोणताही डीआरपी जागरूकता आराखडा नव्हता. विभागाकडे आपल्या कर्मचारी आणि वापरकर्त्यांसाठी डीआरपी जागरूकता प्रशिक्षण आयोजित करण्यासंबंधीच्या दस्तऐवजही नव्हते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, पूर्वी टीसीएल ही एमएसपी असल्याने डीआरपीचे व्यवस्थापन करत होती आणि जेव्हा जेव्हा समस्या निर्माण होत असे, तेव्हा टीसीएल, परिस्थितीनुसार एनआयसी किंवा महाआयटी येथील विकासकांच्या सहकार्याने, डीसीडीआर साइट्सचे व्यवस्थापन करत होती, तथापि,

आता एनआयसी आणि महाआयटी येथील विकासकांमध्ये डीआरपी बद्दल जागरूकता वाढवण्यासाठी पुरेशी पावले उचलली जातील.

2.2.12.3 टीसीएलच्या डेटा सेंटरचे कार्यनिष्पादन संनियंत्रण

टीसीएलच्या डेटा सेंटरमध्ये स्थापित केलेल्या आयएफएमएसचे कार्यनिष्पादन संनियंत्रण, मार्च 2017 मध्ये झालेल्या करारनाम्यासोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार केवळ टीसीएलने सादर केलेल्या अहवालांवरच अवलंबून होते, ज्यात कोणत्याही स्वतंत्र पडताळणी किंवा लेखापरीक्षणाचा समावेश नव्हता. यामुळे प्रणालीतील त्रुटींकडे दुर्लक्ष होण्याचा धोका आहे; वापरकर्त्यांचे दावे वास्तविक लवचिकता किंवा अनुपालनाचे प्रतिबिंब दर्शवत नव्हते.

प्रणाली बंद पडण्याच्या वेळेची/सेवेतील व्यत्ययाची नोंद ठेवण्यासाठी कोणतीही नोंदवही ठेवली जात होती कि नाही, याची खात्री करण्यासाठी 51 डीडीओ कडून अभिप्राय घेण्यात आला. 92 *टक्के* डीडीओंनी पुष्टी केली कि अशी कोणतीही नोंदवही ठेवली जात नव्हती. सेवेतील व्यत्ययाच्या संदर्भात, केवळ चार डीडीओंनी एक ते 50 दिवसांपर्यंतच्या डाउनटाइमची नोंद केली. याचे तपशील ***परिशिष्ट 2.2.8*** मध्ये दिले आहेत.

अशा प्रकारे, विभागाकडे डीडीओ, कोषागार अधिकारी, बँका आणि महाराष्ट्र शासनाचे विविध प्रशासकीय विभाग, जे त्यांच्या कामकाजासाठी पूर्णपणे आयएफएमएसवर अवलंबून आहेत, यासारख्या भागधारकांकडून पर्यायी अभिप्राय यंत्रणेचा अभाव होता.

उत्तरात, शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, ही समस्या अत्यंत तांत्रिक स्वरूपाची असल्याने, डीसी आणि डीआर साइट्सचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी टीसीएलवर सोपवण्यात आली होती. व्यवस्थापन सेवा प्रदाता (एमएसपी) म्हणून, पुढे असे म्हटले आहे कि नोव्हेंबर 2024 पासून महाआयटी द्वारे एमएसपी प्रदान केला जात असल्याने, व्यवसाय सातत्य योजना तयार करण्याची आणि दरवर्षी त्याचा आढावा घेण्याची काळजी घेतली जाईल.


म्हणून, लेखापरीक्षणाचा निष्कर्ष असा आहे कि बीसीपी अस्तित्वात असताना, त्यात योग्य अंमलबजावणी आणि जागरूकतेचा अभाव आहे. याव्यतिरिक्त,

टीसीएलच्या डेटा सेंटरमध्ये आयोजित केलेल्या आयएफएमएसच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी पर्यायी अभिप्राय यंत्रणा नव्हती.

2.2.13. ॲप्लिकेशन नियंत्रणे

ॲप्लिकेशन नियंत्रणांमध्ये इनपुट, प्रोसेसिंग आणि आउटपुट नियंत्रणांचा समावेश होतो. आयडिया (इंटरॅक्टिव्ह डेटा एक्सट्रॅक्शन्स अँड ॲनालिसिस) वापरून बिम्स, बिलपोर्टल, ट्रेझरीनेट आणि सेवार्थ सह निवृत्तिवेतनवाहिनीशी संबंधित डेटा आणि नोंदींच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, ॲप्लिकेशन नियंत्रणे अपुरी आहेत, जी पुढील परिच्छेदांमध्ये स्पष्ट केली आहेत.

2.2.13.1 बिम्स



ही एक ऑनलाइन संगणकीकृत प्रणाली आहे जी अर्थसंकल्पीय तरतुदीचे वितरण करते, वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत खर्च अधिकृत करते आणि देखरेख करते.

डीडीओ हे कोषागारांमध्ये बिले सादर करून बिलपोर्टल आणि सेवार्थ मॉड्यूल्सचा वापर करून अनुदानांचा वापर करतात. कोषागार ट्रेझरीनेट मॉड्यूल वापरून देयकासाठी बिले मंजूर करते.

2.2.13.2 अनुदान मंजुरी आणि खर्चाचे विश्लेषण

2018-2019 ते 2023-2024 या कालावधीतील वेतन खर्चाव्यतिरिक्त इतर माहितीचा डिटेल्ड हेड (आब्जेक्ट हेड) निहाय केलेल्या विश्लेषणातून असे दिसून

आले कि, 31-अनुदान (वेतनेतर), 33-सवलती आणि 36-अनुदान (वेतन) या डिटेल्ड हेडचा एकूण खर्चामध्ये 71 *टक्के* वाटा होता ***(परिशिष्ट 2.2.9)***. पुढे, महाराष्ट्र कोषागार नियमांनुसार, विभागीय नियमांद्वारे काही पर्यायी प्रपत्र अधिकृत केल्याशिवाय, अनुदान, देणग्या इत्यादींसाठीची बिले प्रपत्र एमटीआर-44 मध्ये सादर केली जातील.

लेखापरीक्षणात प्रणालीमध्ये वापरकर्ता मॅन्युअलच्या तुलनेत खालील विसंगती आढळल्या:

2.2.13.3 अनुदान मंजुरी आदेश एमटीआर-44 तयार करण्यासाठीच्या वापरकर्ता मॅन्युअलशी सुसंगत नाही

एमटीआर-44 (अनुदान) साठीच्या **बिलपोर्टल** वापरकर्ता मॅन्युअलनुसार, मंजुरीमध्ये मागणी क्रमांक, प्रमुख शीर्षक, योजना संकेतांक, तपशीलवार शीर्षक आणि अनुदानाचा प्रकार यांचा समावेश असणे आवश्यक आहे. तथापि, मंजुरी आदेशांनी खालील तपशिलानुसार या आवश्यकतांचे पालन केले नाही.

अ. अनुदान-सहायता प्रकारच्या मास्टरमध्ये परिभाषित नसलेल्या बाबींवरील मंजुरी: लेखापरीक्षणात असे आढळून आले कि, संकेतांक (0, 7 आणि 8) संबंधित अनुदान-सहायता खर्चासाठी मंजुरी देण्यात आली होती, जे मास्टर तक्त्यामध्ये परिभाषित नव्हते. त्यामुळे, रेफरेंशियल इंटिग्रिटीशी[28] तडजोड झाली होती. मास्टर तक्त्यामध्ये नसलेल्या अशा संकेतांकांच्या विरोधात, ₹ 4,37,759 कोटीच्या 1,16,143 मंजुरी आढळल्या, जे एकूण अनुदान-सहायता मंजुरीच्या 27 *टक्के* होते ***(परिशिष्ट 2.2.10)***.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, सदर संकेतांक एमआयएस उद्देशासाठी आहेत. ते कोणत्याही अधिकृततेवर किंवा डेटा वर्गीकरणावर परिणाम करत नाहीत, परंतु हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे एनआयसीने चुकीची पुष्टी केली आणि योग्य पावले उचलण्याचे आश्वासन दिले जेणेकरून मास्टर डेटा योग्यरित्या दुरुस्त केला जाईल.

[28] रेफरेंशियल इंटिग्रिटी ही डेटाबेसमधील एक संकल्पना आहे जी मास्टर तक्त्यामध्ये विशिष्टपणे परिभाषित केलेल्या घटकांचे व्यवहार सुनिश्चित करते.

ब. मागणी क्रमांक, प्रमुख लेखाशीर्ष, योजना संकेतांक आणि तपशीलवार लेखाशीर्ष नसलेले मंजुरी आदेश: वर नमूद केल्याप्रमाणे, मंजुरीमध्ये मागणी क्रमांक, प्रमुख लेखाशीर्ष, योजना संकेतांक आणि तपशीलवार लेखाशीर्ष असणे आवश्यक आहे.

तथापि, लेखापरीक्षणात 100 मंजुरी आढळल्या जिथे कोणताही मागणी क्रमांक नमूद केलेला नव्हता. लेखापरीक्षणात असेही आढळून आले कि 116 मंजुरींमध्ये कोणतेही प्रमुख लेखाशीर्ष नमूद केलेले नव्हते. 134 मंजुरींमध्ये अनिवार्य योजना संकेतांक नव्हता. पुढे, 12,331 मंजुरींमध्ये तपशीलवार लेखाशीर्ष नव्हते. संपूर्ण वर्गीकरण नसल्यामुळे, मंजुरीची खर्चाच्या तपशिलांशी मेळ घालता आला नाही.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, एनआयसीने चुकीची पुष्टी केली आहे आणि योग्य पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे जेणेकरून मास्टर डेटा योग्यरित्या दुरुस्त केला जाईल.

2.2.13.4 अनुदान मंजुरी आणि अनुदान खर्चात मेळ नसणे

डेटाबेस संरचनेनुसार, अनुदान मंजुरीची विशिष्टता वर्ष, मागणी क्रमांक, प्रमुख शीर्ष, योजना संकेतांक, तपशीलवार शीर्ष आणि अनुदान प्रकार यांद्वारे निश्चित केली जाते. तथापि, खर्चाच्या तपशिलांमध्ये अनुदान प्रकार वगळता इतर सर्व मापदंडाचा समावेश होता. परिणामी, लेखापरीक्षणाला अनुदान मंजुरीच्या तुलनेत खर्चाच्या आकडेवारीचा मेळ घालणे शक्य झाले नाही. अशा प्रकारे, खर्चाच्या सारणीतून अनुदान प्रकारचा रकाना वगळल्यामुळे डेटाबेस संरचनेमधील प्रणालीगत त्रुटीमुळे अनुदान प्रकारावर आधारित एमआयएस प्रभावित झाले.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, सॉफ्टवेअरमध्ये विकसन करण्यात आले आहे, जेणेकरून नमूद केलेले मापदंड सिस्टम डेटाबेसमधून आपोआप घेतले जातील.

2.2.13.5 मंजुरीच्या तारखेपूर्वी सादर केलेली उपयोगिता प्रमाणपत्रे


अनुदान मंजूर झाल्यानंतर आणि त्याचा वापर झाल्यावर उपयोगिता प्रमाणपत्रे मिळवणे आवश्यक असते. तथापि, 2018 ते 2024 पर्यंतच्या डेटाच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 1,35,256 प्रकरणांपैकी 728 प्रकरणांमध्ये उपयोगिता प्रमाणपत्रे त्यांच्या संबंधित मंजुरीच्या तारखेपूर्वी सादर केली गेली

होती. हे प्रणालीमध्ये सुसंगतता तपासणीच्या[29] अभावाचे संकेत देते ***(परिशिष्ट 2.2.11)***.

शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, सध्या उपयोगिता प्रमाणपत्र ऑफलाइन सादर केले जाते. हे देखील पुष्टी करण्यात आले कि, या चुका डीडीओ द्वारे झाल्या होत्या.

अशा प्रकारे, हे दिसुन येते कि अनुदान मंजुरीमध्ये उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यावर प्रणाली पुरेसे नियंत्रण ठेवत नाही.

2.2.14 बिलपोर्टल



बिलपोर्टल मॉड्यूल विविध कार्यालय-संबंधित दावे (टेलिफोन, वीज, पाणी आणि वाहनांची बिले), कर्मचारी-केंद्रित दावे (बदली-प्रवास भत्ता, प्रवास भत्ता-एलटीसी, जीआयएस आणि वैद्यकीय खर्च) आणि अनुदान-सहाय्याशी संबंधित बिले हाताळण्यासाठी तयार केले आहे.

सहाय्यकाद्वारे (असिस्टंट) योग्य एमटीआर प्रपत्र वापरून दावा मसौदा माध्यमात तयार केला जातो. तो मंजुरीसाठी डीडीओकडे सादर केला जातो. डीडीओ बिलाला मंजुरी देतात आणि त्यानंतर बिम्स मध्ये अर्थसंकल्पीय तरतूदीची उपलब्धता

---

[29] सुसंगतता तपासणी ही एक प्रकारची तार्किक तपासणी आहे जी डेटा तार्किकदृष्ट्या सुसंगत पद्धतीने प्रविष्ट केला गेला आहे याची पुष्टी करते. उदाहरणार्थ, वितरण तारीख पार्सलच्या शिपिंग तारखेनंतरची आहे का ते तपासणे.

तपासली जाते. जर अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध असेल, तर अंतिम बिल तयार होते आणि अधिकृतता पावतीसह पुढील कार्यवाहीसाठी कोषागारात प्रदानासाठी प्रस्तुत केले जाते.

2.2.14.1 इनपुट प्रमाणिकरण त्रुटी

(अ) टेलिफोन क्रमांक सामान्यतः 6 ते 8 अंकी असतात. 42,697 टेलिफोन क्रमांकांचा तपशील असलेल्या डेटाबेसच्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 244 नोंदी एकतर रिकाम्या होत्या किंवा त्यामध्ये एक ते तीन अंकी क्रमांक होते.

शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, रिकामे आणि निर्दिष्ट अंकांपेक्षा कमी किंवा जास्त अंकी टेलिफोन क्रमांक प्रणालीमध्ये नोंदवले जाणार नाहीत असे प्रमाणिकरण लागू केले आहे.

(ब) वीज बिलांची माहिती असलेल्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 73 ग्राहक क्रमांक रिकामे होते. त्याचप्रमाणे, तक्त्यामध्ये प्रविष्ट केलेले 463 वीज मीटर क्रमांक रिकामे होते.

शासनाने उत्तरात (जुलै 2025) सांगितले कि, रिकामे वीज मीटर क्रमांक नोंदवले जाणार नाहीत असे प्रमाणिकरण लागू केले आहे.

(क) वाहन नोंदणी क्रमांकाचे स्वरूप XXNNXXNNNN असे असले पाहिजे, जिथे XX हे राज्याला दर्शवणारे अक्षरे आहेत; NN हे जिल्ह्याला दर्शवणारे अंक आहेत; XX हे मालिकेचे प्रतिनिधित्व करणारी अक्षरे आहेत; NNNN हे नोंदणी क्रमांक दर्शवणारे अंक आहेत.

वाहनांचे तपशील असलेल्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे आढळून आले कि:

1. राज्य संकेतांकासाठी, 245 वाहनांमध्ये, वर्णमाला अक्षरांऐवजी संख्यात्मक वर्णांचा चुकीचा वापर केला गेला होता.
2. जिल्हा संकेतांकासाठी, 11 वाहनांमध्ये, तपशिलांमध्ये चुकीने "00" वापरले गेले होते.
3. संख्यात्मक मालिकेसाठी, 22 वाहनांमध्ये, तपशील चुकीने "00" असे नोंदवले गेले होते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, मास्टर तक्त्यामध्ये पडताळणी केली जाईल, जसे कि (1) केवळ निर्दिष्ट स्वरूपातील वाहन क्रमांकच नोंदवले जातील, (2) संख्यात्मक वर्ण आणि वर्णमाला अक्षरांच्या योग्य वापराची खात्री करण्यासाठी निर्बंध लागू केले जातील. तसेच, उत्पादनादरम्यान प्रत्येक वाहनाला एक अद्‌वितीय ओळख क्रमांक दिला जाईल.

ड. नमुना म्हणून निवडलेल्या प्रकरणांच्या प्रत्यक्ष पडताळणीमध्ये वीज बिलांच्या इनपुट प्रमाणिकरण प्रक्रियेत खालील त्रुटी आढळल्या:

1. बिलिंग कालावधी (पासून आणि पर्यंत) या फील्डमधील इनपुट डेटामध्ये डेटा एंट्रीची चूक आढळून आली, जरी तो कालावधी वेगळा होता. अशा घटना टाळण्यासाठी, वापरकर्त्यांसाठी सिस्टीममध्ये अलर्ट समाविष्ट केले पाहिजेत किंवा सिस्टीम इनपुट प्रमाणिकरण पद्धती वापरून दुबार नोंदींवर निर्बंध घातले पाहिजेत, ज्यांची कमतरता होती.

2. एकाच वीज बिलासाठी अनेक आंशिक प्रदान आढळून आले. तथापि, अशा आंशिक प्रदानाची नोंद करण्यासाठी डेटाबेसमध्ये कोणतीही व्यवस्था नव्हती. त्याचप्रमाणे, त्याच वीज कनेक्शनसाठी अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्याकरिता अनेक नोंदी दिसल्या. प्रदानाचा प्रकार, जसे कि सुरक्षा ठेव, नियमित (पूर्ण) किंवा आंशिक प्रदान, निर्दिष्ट करणाऱ्या एका स्वतंत्र फील्डची आवश्यकता भासली.

3. असे आढळून आले कि, एका वापरकर्त्याने दिलेल्या फील्डमध्ये बिलाच्या बीजक क्रमांकाऐवजी ग्राहक क्रमांक टाकला होता. यामुळे योग्य डेटा इनपुट प्रक्रियेबाबत सुधारित वापरकर्ता सूचनांची आवश्यकता अधोरेखित झाली.

शासनाने सांगितले (जुलै 2025) कि, भिन्न बिल कालावधी (पासून आणि पर्यंत) प्रविष्ट करण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण लागू केले आहे, आंशिक प्रदानावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण लागू केले आहे आणि दिलेल्या फील्डमध्ये बिलाच्या बीजक क्रमांकाऐवजी ग्राहक क्रमांक किंवा इतर कोणताही क्रमांक प्रविष्ट करण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण केले जाईल.

2.2.14.2 मास्टर डेटातील त्रुटी

अ. बिलपोर्टल डेटाबेसमध्ये, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय दावे हॉस्पिटलचे तपशील आणि आजारांचे तपशील असलेल्या मास्टर तक्त्यांद्वारे व्यवस्थापित केले

जातात, जे उपचारांसाठी आजार आणि हॉस्पिटल्सशी जोडलेले असतात. औषधे, वैद्यकीय खर्च आणि आयपीडी उपचारांशी संबंधित खर्चाच्या दाव्यांचा तपशील संग्रहित करण्यासाठी इतर विविध तक्ते देखील तयार केले आहेत.

मास्टर तक्त्यांच्या विश्लेषणात खालीलप्रमाणे नियंत्रण त्रुटी आढळल्या:

1. मास्टर आणि ट्रान्झॅक्शन डेटामध्ये रेफरेंशियल इंटिग्रिटीचा अभाव:

लेखापरीक्षणात असे आढळले कि, बिलपोर्टलच्या डेटाबेस डिझाइनमध्ये, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय दावे i) हॉस्पिटलचा तपशील असलेल्या हॉस्पिटलमास्टर तक्त्याद्वारे; ii) आजारांचा तपशील असलेल्या डिसीज (रोग) तक्त्याद्वारे; iii) उपचारांसाठी आजार आणि हॉस्पिटल्सना जोडणाऱ्या डिसीजहॉस्पिटलमॅप तक्त्याद्वारे व्यवस्थापित केले जातात. औषधे, इतर वैद्यकीय खर्च आणि आयपीडी उपचारांशी संबंधित खर्चाच्या दाव्यांचा तपशील संग्रहित करण्यासाठी इतर विविध तक्ते देखील तयार केले आहेत.

या तक्त्यांच्या डेटा विश्लेषणात डिसीज मास्टर तक्ता अद्ययावत नसणे, डिसीजहॉस्पिटलमॅप आणि डिसीज तक्ता तसेच डिसीजहॉस्पिटलमॅप आणि हॉस्पिटलमास्टर तक्त्यां दरम्यान रेफरेंशियल इंटिग्रिटीचा अभाव यांसारख्या त्रुटी आढळल्या. शिवाय, हॉस्पिटलचे नाव आणि आजारांच्या नावांच्या अवैध नोंदी देखील आढळल्या. कर्मचारी आयडीशिवाय वैद्यकीय दावे सादर केले गेले, त्यावर प्रक्रिया केली गेली आणि दाव्यांचे पैसे दिले गेले.

2. इनपुट प्रमाणीकरणामधील त्रुटी:

लेखापरीक्षणात असेही आढळले कि, मास्टर तक्त्यामध्ये रुग्णालयाचे नाव आणि रोगांच्या नावांच्या चुकीच्या नोंदी होत्या. वैद्यकीय दावे सादर केले गेले, त्यावर प्रक्रिया झाली आणि कर्मचारी ओळखपत्रांसारख्या महत्त्वाच्या ओळखपत्रांशिवाय दाव्यांचे पैसे दिले गेले.

3. स्वीकार्यतेच्या पलीकडे प्रतिपूर्तीस परवानगी देणाऱ्या प्रक्रियेतील त्रुटी:

लेखापरीक्षणात असे आढळले कि, रुग्णालयातील वास्तव्याचे दावे आणि औषधांचे दावे खालील तपशिलानुसार स्वीकार्यतेनुसार निकाली काढले गेले नाहीत:

(i) प्रणालीने 143 वैद्यकीय दाव्यांमध्ये खोलीच्या भाड्यासाठी 75 टक्क्यांपेक्षा जास्त प्रतिपूर्तीस परवानगी दिली. इतकेच नाही, तर वैद्यकीय दाव्यांच्या 124 टक्क्यांपर्यंत प्रतिपूर्तीस परवानगी दिली, ज्यामुळे ₹ 3.67 लाख जादा रक्कम मंजूर झाली.

(ii) औषध खरेदीच्या 8,987 वैद्यकीय दाव्यांमध्ये 100 *टक्के* प्रतिपूर्ती, ज्यामुळे ₹ 1.98 कोटींची जादा रक्कम मंजूर झाली.

(iii) वैद्यकीय आगाऊ रकमेच्या माहितीच्या पुनरावलोकनातून असे दिसून आले कि, डीडीओने 448 कर्मचाऱ्यांशी संबंधित 603 आगाऊ रकमा मंजूर केल्या, ज्यांची रक्कम ₹ 5.98 कोटी रुपये होती. बिल काढून किंवा वसुली करून कोणतेही समायोजन करण्यात आले नाही. लेखापरीक्षणात प्रणालीतील त्रुटी आढळल्या, जसे कि नियमित वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले चुकून आगाऊ रक्कम म्हणून वर्गीकृत करणे आणि कार्यालयीन नोंदींमध्ये आगाऊ रकमेचे समायोजन करणे परंतु मॉड्यूलमध्ये आगाऊ रकमेच्या विरोधात ही समायोजने योग्यरित्या अद्यावत न करणे. एक उदाहरण खालीलप्रमाणे दिले आहे:

उदाहरण: अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या कार्यालयातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी (डीडीओ संकेतांक: 7101000454) 18/04/2021 रोजी धनादेश क्रमांक 392367 द्वारे ₹ 1,50,000 वैद्यकीय आगाऊ रक्कम म्हणून वितरित केले. तथापि, शस्त्रक्रिया रद्द झाल्यामुळे, रुग्णालयाने धनादेश कार्यालयात परत केला. कार्यालयाने अर्थसंकल्पाची रक्कम पूर्ववत करण्यासाठी आणि आगाऊ रक्कम रद्द करण्यासाठी प्रणालीमध्ये ही नोंद उलट केली नाही.

शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, या सर्व मास्टर तक्त्यांची पडताळणी केली जाईल आणि रेफ्रंशियल इंटिग्रिटी लागू केली जाईल. रुग्णालयांची आणि रोगांच्या नावांच्या चुकीच्या नोंदी टाळण्यासाठी तपासण्या लागू केल्या जातील असेही सांगण्यात आले. कर्मचारी ओळखपत्राशिवाय वैद्यकीय दाव्यांवर प्रक्रिया केली जाणार नाही. रुग्णालयातील वास्तव्याचे दावे आणि औषधांचे दावे स्वीकार्यतेनुसार तयार करण्यासाठी तपासण्या लागू केल्या जातील.

ब. कंत्राटी कर्मचाऱ्यांचा तपशील असलेल्या मास्टर तक्त्याचे आणि या कर्मचाऱ्यांच्या दाव्यांचे विश्लेषण केले असता असे दिसून आले कि, 22 कंत्राटी

कर्मचाऱ्यांसाठी ₹ 85,46,047 रकमेचे 59 दावे तयार करण्यात आले होते, ज्यांचा तपशील मास्टर तक्त्यामध्ये आढळला नाही. पुढे, या 59 दाव्यांपैकी ₹ 9,44,774 रकमेचे 18 दावे कर्मचाऱ्यांना अदा देखील करण्यात आले होते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, नोंदणी नसलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या दाव्यांची पडताळणी केली जाईल. तसेच, प्रणालीमध्ये केवळ नोंदणीकृत कंत्राटी कर्मचाऱ्यांचेच दावे तयार केले जातील याची खात्री करण्यासाठी आवश्यक प्रमाणिकरण प्रक्रिया लागू केली जाईल.

क. टेलिफोन तपशिलांसाठीच्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 2018-19 ते 2023-24 या वर्षांसाठी मास्टर तक्त्यामध्ये सूचीबद्ध नसलेल्या 499 टेलिफोन कनेक्शनसाठी ₹ 1.83 कोटीचे प्रदान करण्यात आले होते. हे प्रदान कोषागारांनी मंजूर केले होते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, नोंदणी नसलेल्या टेलिफोन कनेक्शनसाठी बिले तयार होण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण लावल्या जाईल.

ड. विद्युत तपशील असलेल्या मास्टर तक्त्याच्या पुढील विश्लेषणात असे निदर्शनास आले कि, मास्टर तक्त्यामध्ये नोंदणी नसलेल्या 25814 विद्युत कनेक्शनच्या संदर्भात ₹ 2123.73 कोटीचे प्रदान मंजूर करण्यात आले होते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, नोंदणी नसलेल्या विद्युत कनेक्शनसाठी बिले तयार होण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण लावण्यात येईल.

ई. तसेच, पाणी कनेक्शनच्या तपशिलांचा मास्टर तक्ता तपासल्यावर, लेखापरीक्षणात असे आढळले कि, नोंदणी नसलेल्या 6,471 पाणी कनेक्शनसाठी ₹ 262.81 कोटी दिले गेले होते.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, नोंदणी नसलेल्या पाणी कनेक्शनसाठी बिले तयार होण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणिकरण लावले जाईल.

फ. वाहने आणि त्यांच्या दुरुस्तीच्या संदर्भातील मास्टर तक्ता तपासल्यावर, लेखापरीक्षणात असे आढळले कि, मास्टर तक्त्यामध्ये नोंदणी नसलेल्या 121 वाहनांच्या दुरुस्तीसाठी ₹ 0.31 कोटी दिले गेले होते. त्याचप्रमाणे, 868 नोंदणी नसलेल्या वाहनांसाठी पेट्रोल/वंगण/तेलाचे दावे ₹ 6.90 कोटींपर्यंत दिले गेले.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. जर ते योग्य आढळले, तर प्रमाणिकरण नियंत्रणे लागू केली जातील. नोंदणी नसलेल्या वाहनांसाठी पेट्रोल/वंगण/तेलाच्या दाव्यांवर निर्बंध घालण्यासाठी नियंत्रणे देखील लागू केली जातील.

वस्तुस्थिती अशी आहे कि, युनिक की[30]/कंपोझिट की[31] मर्यादा लागू करण्यात आली नव्हती, ज्यामुळे रेफरेंशियल इंटिग्रिटीचा अभाव होता.

2.2.14.3 व्यवहारांची पुनरावृत्ती तपासणी नियंत्रण प्रणालीतील त्रुटी

अ. बिलपोर्टल मॉड्यूलच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि बँकेचे तपशील एका मास्टर तक्त्यामध्ये संग्रहित केले जातात. लेखापरीक्षणात असे 36 प्रकरणे आढळली, जिथे एकाच आयएफएससी संकेतांकांचे वाटप एकापेक्षा जास्त शाखांना करण्यात आले होते, ज्यांची संख्या दोन ते पाच वेळा होती.

उत्तरादाखल शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, सहकारी बँकांच्या एकाच आयएफएससी संकेतांकासह अनेक शाखा असतात.

हे उत्तर स्वीकार्य नाही, कारण असे दिसून आले आहे कि 16 सहकारी बँकांच्या बाबतीत, मास्टर फाइलमध्ये राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेप्रमाणेच समान आयएफएससी संकेतांक आहे.

ब. वाहनांचा चेसिस क्रमांक 17-अंकी संकेतांकचा असतो, जो उत्पादनादरम्यान प्रत्येक वाहनाला दिलेला एक अद्‌वितीय ओळख क्रमांक असतो. तथापि, लेखापरीक्षणात डेटाबेसच्या मास्टर तक्त्यामध्ये 3,157 ठिकाणी चेसिस क्रमांकांची पुनरावृत्ती आढळली.

उत्तरादाखल शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, चेसिस क्रमांकांच्या पुनरावृत्तीच्या नोंदणीवर निर्बंध लादले जातील. उत्पादनादरम्यान प्रत्येक वाहनाला एक अद्‌वितीय ओळख क्रमांक दिला जाईल आणि मास्टर तक्त्यामध्ये चेसिस क्रमांकांच्या पुनरावृत्तीची नोंद वैध ठरवली जाईल.

---

[30] एक अद्‌वितीय की कंस्ट्रेंट (Unique Key Constraint) ही डेटाबेसमधील एक संकल्पना आहे जी की फील्डमध्ये (Key Field) दुबार व्हॅल्यूजला परवानगी देत नाही.

[31] कंपोझिट की कंस्ट्रेंट (Composite Key Constraint) ही डेटाबेसमधील एक संकल्पना आहे जी एकापेक्षा जास्त की फील्डच्या संचामध्ये दुबार मूल्यांना परवानगी देत नाही

क. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 102 नोंदींपैकी 45 कंत्राटी कर्मचाऱ्यांची नावे, जन्मतारीख आणि लिंग समान होते, परंतु त्यांचे पॅन क्रमांक वेगळे होते.

उत्तरादाखल, शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, या वस्तुस्थितीची पडताळणी केली जाईल आणि कोणताही पॅन क्रमांक दुबार आढळल्यास तो दुरुस्त केला जाईल आणि प्रणालीमध्ये दुबार पॅन क्रमांकासाठी प्रमाणिकरण समाविष्ट केले जाईल.

ड. टेलिफोन तपशील असलेल्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणाअंती, लेखापरीक्षणात असे आढळून आले कि, समान सेवा प्रदाता आयडी, टेलिफोन क्रमांक, व्हाउचर क्रमांक, सब-व्हाउचर क्रमांक, बिलिंग कालावधी (पासून आणि पर्यंत), डीडीओ आयडी आणि रक्कम यांच्याशी संबंधित 466 दावे आढळले. पुढे, बिलांसाठी मास्टर तक्त्याच्या तपासणीत असे दिसून आले कि, 466 दाव्यांपैकी, ₹ 1,74,658 रकमेची 112 बिले नोंदणी नसलेल्या टेलिफोन क्रमांकांसाठी तयार केली गेली होती.

उत्तरादाखल, शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, तथ्य पडताळली जातील आणि बीडीएस टेलिफोन तपशिलांमध्ये कोणतेही दुबार अभिलेख आढळल्यास ते दुरुस्त केले जातील आणि प्रणालीमध्ये दुबार अभिलेखासाठी प्रमाणिकरण समाविष्ट केले जाईल.

ई. बिलपोर्टलच्या विश्लेषणातून असेही दिसून आले कि, मास्टर तक्त्यामध्ये विजेच्या जोडणींच्या 79,799 नोंदी होत्या, त्यापैकी 4,944 नोंदींमध्ये सेवा प्रदाता, ग्राहक क्रमांक, मीटर क्रमांक, सब-मीटर क्रमांक आणि डीडीओ तपशिलांसाठी समान संख्या होती.

उत्तरादाखल, शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, तथ्य पडताळली जातील आणि मास्टर तक्त्यामधील दुबार अभिलेख (असल्यास) दुरुस्त केले जातील आणि प्रणालीमध्ये दुबार अभिलेखसाठी प्रमाणिकरण समाविष्ट केले जाईल.

फ. पाणी जोडणीचा तपशील असलेल्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, 13,383 पाणी जोडणींपैकी, 230 जोडणींमध्ये सेवा प्रदाता, ग्राहक क्रमांक, मीटर क्रमांक, सब-मीटर क्रमांक आणि डीडीओ तपशिलांची समान

संख्या होती. 184 नोंदींमध्ये पुनरावृत्ती, 30 नोंदींमध्ये तिप्पट पुनरावृत्ती आणि 16 नोंदींमध्ये चौपट पुनरावृत्ती होती.

उत्तरादाखल, शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, तथ्य पडताळली जातील, मास्टर तक्त्यामध्ये आढळलेले दुबार अभिलेख (असल्यास) दुरुस्त केले जातील आणि प्रणालीमध्ये दुबार अभिलेखांसाठी प्रमाणिकरण समाविष्ट केले जाईल.

ग. विजेच्या तपशिलांच्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, समान सेवा प्रदाता, मीटर क्रमांक, सब-मीटर क्रमांक, व्हाउचर क्रमांक, सब-व्हाउचर क्रमांक, बिलिंग कालावधी (पासून आणि पर्यंत) आणि डीडीओ आयडी असलेल्या विजेच्या जोडणींशी संबंधित ₹ 3.65 कोटीचे 288 दावे अदा करण्यात आले होते. हे दर्शवते कि प्रणालीने त्याच बिलिंग कालावधीसाठी विजेच्या बिलाचे एकाधिक दावे सादर करण्याची परवानगी दिली होती.

शासनाने असे सांगितले (जुलै 2025) कि, सारख्याच कालावधीसाठी विजेच्या बिलाचे एकाधिक दावे सादर करण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणीकरणे लागू केली आहेत.

घ. लेखापरीक्षणात असेही आढळून आले कि, त्याच बिलिंग सायकलसाठी ₹ 0.12 कोटी रकमेच्या 10 पाणी जोडणी बिलांसाठी दुबार दावे सादर केले गेले आणि डीडीओद्वारे त्यावर प्रक्रिया करून कोषागारांनी ते अदा केले.

शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, त्याच बिलिंग सायकलसाठी बिले तयार होण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणीकरणे लागू केली जात आहेत.

च. वाहनांचा तपशील असलेल्या मास्टर तक्त्याच्या विश्लेषणातून दाव्यांच्या डेटामध्ये विसंगती आढळून आली. विशेषतः, 254 वाहनांचे ₹ 0.19 कोटीचे दावे समान तपशिलासह (वाहन क्रमांक, सब-व्हाउचर क्रमांक, तारखा, दुरुस्ती एजन्सी आणि दाव्याची रक्कम) सादर केले गेले होते. त्याचप्रमाणे, 1911 वाहनांसाठी पेट्रोल आणि वंगण खरेदीचे ₹ 4.26 कोटीचे दावे अदा करण्यात आले होते.


शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, वाहन क्रमांक, सब-व्हाउचर क्रमांक, सब-व्हाउचरच्या तारखा, दुरुस्ती एजन्सी इत्यादींसारखा समान तपशील प्रविष्ट करण्यावर निर्बंध घालण्यासाठी प्रमाणीकरणे लागू केली जातील.

शासनाने (जुलै 2025) उत्तर दिले कि, वस्तुस्थितीची पडताळणी केली जाईल, जर कोणतेही दुबार किंवा चुकीचे प्रदान आढळल्यास, योग्य कारवाई केली जाईल आणि त्यासाठी प्रणालीमध्ये योग्य प्रमाणीकरणे समाविष्ट केली जातील.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे कि, बिलपोर्टल ॲप्लिकेशनच्या विश्लेषणातून मास्टर आणि ट्रान्झॅक्शन तक्त्यांमधील रेफरेंशियल इंटिग्रिटीच्या अभावामुळे एक गंभीर नियंत्रण त्रुटी निदर्शनास आली. ही कमतरता फसव्या दाव्यांचा, विशेषतः अस्तित्वात नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या ("घोस्ट एम्प्लॉइज") बाबतीत, एक महत्त्वपूर्ण धोका निर्माण करते, कारण यामुळे डेटामध्ये संभाव्य फेरफार करण्यास वाव मिळतो. त्याचप्रमाणे, डेटा स्ट्रक्चर डिझाइनमध्ये महत्त्वाच्या फील्डवर युनिक कि कन्स्ट्रेंट्स लागू करण्यात आले नसल्यामुळे वित्तीय अनियमितता, गैरव्यवहार, फसवणूक आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापनात व्यत्यय यांसारखा धोका वाढतो.

2.2.15 ट्रेझरीनेट

ट्रेजरीनेट कार्यप्रवाह



ट्रेझरीनेट हे आयएफएमएसच्या मॉड्यूल्सपैकी एक आहे, जे बिम्स, बिल पोर्टल आणि सेवार्थ सोबत एकात्मिक आहे. प्रदान प्रक्रियेसाठी ते एसबीआय सीएमपी पोर्टल आणि आरबीआय ई-कुबेर प्रणालीशी देखील जोडलेले आहे. सध्या, सुमारे 34 कोषागारे, एक पीएओ आणि 324 उप-कोषागारे या सॉफ्टवेअरचा वापर करत आहेत.

ट्रेझरीनेटद्वारे बिल प्रक्रियेतील लेखापरीक्षण निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत:

2.2.15.1 शिवभोजन थाळी योजना: डीडीओंच्या खात्यांमध्ये निधीच्या साठवणुकीची प्रणालीगत त्रुटी

अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाद्वारे (01/01/2020) प्रत्येक जिल्हा मुख्यालयात किमान एका उपाहारगृहामार्फत गरीब आणि गरजू व्यक्तींना प्रति थाळी ₹ 10 दराने शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्याची योजना सुरू केली. निवडलेल्या संस्थांनी अन्न पुरवायचे होते ज्याचा खर्च महाराष्ट्र शासनाने उचलायचा होता. पुढील निर्णयांमध्ये (23/01/2020 आणि 13/04/2020) मंजूर संस्थांना ऑनलाइन प्रदान करणे अनिवार्य करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने वित्त विभागाच्या निर्णयाद्वारे (22/01/2013) सर्व विभागांना बिम्समध्ये संस्था, पुरवठादार आणि लाभार्थ्यांची मास्टर लिस्ट तयार करण्याचे निर्देश दिले होते, जेणेकरून लाभार्थ्यांच्या खात्यात थेट प्रदान करता येईल.

निवडलेल्या[32] कोषागारांमधील दस्तऐवजांच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, उपरोक्त निर्णयांनुसार, 2020-21 ते 2023-24 या काळात मुंबईत निवडलेल्या संस्थांना थेट ऑनलाइन प्रदान करण्यात आले. तथापि, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे, मंजूर संस्थांच्या बँक खात्यांमध्ये आरटीजीएस द्वारे थेट ऑनलाइन जमा करण्याऐवजी, निधी काढून डीडीओंच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आला.

वर्धा येथे, जरी 2020-21 या वर्षात निवडलेल्या संस्थांना ऑनलाइन प्रदान करण्यात आले असले तरी, 2021-22 पासून पुढे निवडलेल्या संस्थांना प्रदान करण्यापूर्वी **तक्ता 2.2.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे निधी काढून डीडीओंच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आला.

तक्ता 2.2.6: एजन्सीसाठी असलेला निधी डीडीओंच्या खात्यात जमा करणे

कोषागाराचे नाव	कालावधी	जमा केलेली रक्कम (₹ मध्ये)
छत्रपती संभाजीनगर	2020-21 ते 2023-24	7,48,13,134
पुणे	2020-21 ते 2023-24	92,03,120
वर्धा	2021-22 ते 2023-24	5,56,52,733
एकूण		**13,96,68,987**

[32] 1. छत्रपती संभाजीनगर; 2. मुंबई; 3. पुणे आणि 4. वर्धा

प्रमाणिकरण आणि देखरेख नियंत्रण उपायांच्या अभावामुळे जिल्हा पुरवठा कार्यालयांना स्वतःच्या खात्यांमध्ये निधीची साठवणुक करणे शक्य झाले. त्यामुळे, एजन्सींच्या खात्यात थेट जमा करण्याऐवजी, ₹ 13.97 कोटी विभागाच्या अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आले, ज्यामुळे निर्णयांमध्ये (01/01/2020, 23/01/2020 आणि 13/04/2020) नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यावर देखरेख ठेवण्यात प्रणालीची असमर्थता अधोरेखित झाली.

शासनाने (जुलै 2025) सांगितले कि, यासंबंधी तथ्य पडताळली जातील आणि योग्य ती कारवाई केली जाईल.

2.2.15.2 वर्धा कोषागारात स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) कॅश मॅनेजमेंट प्रोजेक्ट (सीएमपी) द्वारे अयशस्वी झालेल्या ऑनलाइन प्रदानाचे विश्लेषण

महाराष्ट्र शासनाने वित्त विभागाच्या निर्णयाद्वारे (22/01/2013) स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) कॅश मॅनेजमेंट प्रोजेक्ट (सीएमपी) वापरून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाइन प्रदान करण्याची कार्यपद्धती निश्चित केली. एसबीआय सीएमपी हे https://www.sbicmp.co.in/mahakosh या सुरक्षित युआरएल द्वारे उपलब्ध आहे आणि ते बँक खाते क्रमांक आणि आयएफएससी संकेतांक यांसारख्या तपशिलांसह तृतीय-पक्ष प्राप्तकर्ते जोडण्याची सुविधा प्रदान करते.

वर्धा कोषागारातील अयशस्वी सीएमपी प्रदान प्रकरणांच्या विश्लेषणातून असे दिसून आले कि, अशा प्रत्येक घटनेत, सीएमपी पोर्टलने लाभार्थ्याच्या नावाने बँकर्स चेक जारी केला, जो कोषागारात पाठवला गेला. त्यानंतर कोषागार अधिकाऱ्याने तो संबंधित डीडीओकडे पाठवला, ज्याने तो व्यक्तिशः लाभार्थ्याला सुपूर्द केला. अयशस्वी होण्याची कारणे "खाते बंद", "अवैध लाभार्थी", "खाते अस्तित्वात नाही" आणि "खाते निलंबित" अशी होती.

सात[33] प्रकरणांमध्ये असे दिसून आले कि, 2019-20 ते 2023-24 ***(परिशिष्ट 2.2.12)*** या कालावधीत सीएमपी द्वारे केलेले ₹ 1.40 कोटींच्या 342 व्यवहारांचे ऑनलाइन प्रदान सातत्याने अयशस्वी झाले. विशिष्ट खात्यांमध्ये सीएमपी प्रदान अयशस्वी होण्याच्या वारंवार घटना घडल्या असूनही, प्रणालीने डीडीओला प्राप्तकर्त्याचे बँक तपशील अद्यावत करण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी सतर्कता सूचना दिली नाही, ज्यामुळे भविष्यात आणखी प्रदान अयशस्वी होण्याची शक्यता निर्माण झाली.

यावरून असे दिसून येते कि, सीएमपीद्वारे अयशस्वी झालेल्या प्रदानाच्या व्यवस्थापनाची सध्याची प्रक्रिया अनधिकृत लाभार्थ्यांना प्रदान केले जाण्याचा धोका निर्माण करते आणि अशा प्रकरणांमध्ये बँक तपशील अद्यावत करण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी वापरकर्त्यांना सूचित करणाऱ्या प्रणालीतील सतर्कता सूचनेची आवश्यकता अधोरेखित करते.


शासनाने उत्तर दिले (जुलै 2025) कि, सर्व जिल्हा कोषागारे आणि सर्व उप-कोषागारे तसेच वेतन व लेखा कार्यालयात आरबीआय ई-कुबेर प्रदान मोड वापरून अयशस्वी व्यवहारांची हाताळणी करण्यासाठी ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये योग्य तरतुदी करण्यात आल्या आहेत.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे कि, सध्याच्या ट्रेझरीनेट प्रणालीमध्ये विशिष्ट खात्यांमधील सातत्याने अयशस्वी होणाऱ्या सीएमपी व्यवहारांच्या संदर्भात सतर्कता यंत्रणेचा अभाव होता.

[33] 1) बेरोजगार स्टेशनरी स्टोअर्स, मालक: सुमेधा नागोराव डुकरे, खाते क्रमांक: 11036971389 (IFSC SBIN0005764); 2) एम एस मल्हारी ऑटोमोबाईल, खाते क्रमांक: 60033189183 (IFSC MAHB0000059); 3) मा वैष्णवी डिझेल, खाते क्रमांक: 62346475890 (IFSC SBIN0014932); 4) प्रफुल्ल स्क्रीन्स, खाते क्रमांक: 55103070001247 (IFSC SYNB0005510); 5) संकटमोचन पेट्रोलियम एजन्सी, खाते क्रमांक: 32497452125 (IFSC SBIN0001415); 6) श्री साई ऑटो खाते क्रमांक 355505040000191 (IFSC UBIN0535559) आणि 7) एसआर ऑटोमोबाईल्स खाते क्रमांक 970820100110013 (IFSC BKID0009708).

2.2.15.3 सेवार्थ

सेवार्थ मॉड्यूलचा वापर कर्मचाऱ्यांची मासिक वेतन बिले तयार करण्यासाठी केला



जातो. याचा उपयोग कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन प्रकरण तयार करण्यासाठी देखील केला जातो आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी पहिले व मासिक निवृत्तिवेतन बिल तयार केले जाते

लेखापरीक्षणाचे निरीक्षण खालीलप्रमाणे आहे:

2.2.15.4 इनपुट प्रमाणिकरण नियंत्रणाचा अभाव

अ) सेवार्थ डेटाबेसमध्ये कर्मचाऱ्यांच्या नामनिर्देशनाचे तपशील (नॉमिनेशन डिटेल्स) नोंदवले जातात. मास्टर डेटाबेसमध्ये 4,30,448 नामनिर्देशने होती, त्यापैकि 22 नामनिर्देशनांमध्ये असे आढळून आले की, नामनिर्देशित व्यक्तीचे नाव, जन्मतारीख आणि पत्ता समान होता, परंतु नामनिर्देशन आयडी वेगळे होते.

यावरून असे दिसून येते की, एकाच व्यक्तीसाठी दुबार नामनिर्देशने टाळण्यासाठी इनपुट प्रमाणिकरण नियंत्रणे (युनिक कंपोझिट की कन्स्ट्रेंट) अस्तित्वात नव्हती.

हे निदर्शनास आणल्यावर शासनाने असे सांगितले (जुलै 2025) की, पूर्वीच्या प्रणालीमध्ये ही प्रमाणीकरणे अस्तित्वात नव्हती. तथापि, आता नामनिर्देशित

व्यक्तीचे नाव आणि जन्मतारखेवर आधारित दुबार नोंदी प्रतिबंधित करण्यासाठी नियंत्रण समाविष्ट केले आहे.

ब) कर्मचाऱ्यांच्या 4,795 नोंदींमध्ये, पहिले नाव, मधले नाव, आडनाव, जन्मतारीख, रुजू होण्याची तारीख आणि रुजू होण्याचा वर्ग आयडी दुबार होते.

यावरून असे दिसून येते की, एकाच व्यक्तीसाठी दुबार नामनिर्देशने टाळण्यासाठी इनपुट प्रमाणिकरण नियंत्रणे (युनिक कंपोझिट की कन्स्ट्रेंट) अस्तित्वात नव्हती.

हे निदर्शनास आणल्यावर, शासनाने लेखापरीक्षणाचे निरीक्षण स्वीकारून असे सांगितले (जुलै 2025) की, समन्वयातील त्रुटी आणि अंतिम वापरकर्त्यांद्वारे कर्मचाऱ्यांच्या डेटाची मॅन्युअल पुन: नोंदणी, यामुळे प्रणालीच्या सुरुवातीच्या टप्प्यात प्रामुख्याने दुबार वेतन नोंदी निर्माण झाल्या. हे सहसा सेवानिवृत्तीनंतर पुन्हा रुजू होणे, परिवीक्षा कालावधी पूर्ण करणे, पदोन्नती, विभागीय बदली किंवा कर्मचाऱ्यांच्या तपशिलात बदल यांसारख्या घटनांदरम्यान घडते. या नोंदी कर्मचाऱ्यांच्या सेवेची समाप्ती झाल्यानंतर करण्यात आल्या होत्या. पुढे असेही सांगण्यात आले की, दुबार कर्मचारी नोंदी तयार होण्यापासून रोखण्यासाठी सेवार्थ ॲप्लिकेशनमध्ये मजबूत प्रमाणिकरण यंत्रणेसह सुधारणा करण्यात आली आहे.

क) 3,149 प्रकरणांमध्ये शासकीय सेवेत रुजू होण्याचे वय दोन ते 17 वर्षांच्या दरम्यान होते आणि 20 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, रुजू होण्याची तारीख त्यांच्या संबंधित जन्मतारखेच्या आधीची होती.

यावरून असे दिसून येते की, अपेक्षित मापदंडांच्या तुलनेत सेवेत रुजू होण्याची तारीख तपासण्यासाठी इनपुट प्रमाणिकरण नियंत्रणे अस्तित्वात नव्हती.

हे निदर्शनास आणल्यावर शासनाने असे सांगितले (जुलै 2025) की, अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात, अपुऱ्या प्रमाणीकरणामुळे अशा त्रुटीपूर्ण नोंदी केल्या गेल्या. तथापि, आता सेवार्थ ॲप्लिकेशन कठोर प्रमाणिकरण नियमांची अंमलबजावणी करते.

ड) 1,106 कर्मचाऱ्यांच्या सेवेची समाप्तीची तारीख, त्यांच्या रुजू होण्याच्या तारखेपूर्वीची होती.

यावरून असे दिसून येते की, सेवेच्या समाप्तीची तारीख अपेक्षित निकषांनुसार तपासण्यासाठी इनपुट व्हॅलिडेशन नियंत्रणे लागू नव्हती.

उत्तरादाखल शासनाने सांगितले (जुलै 2025) की, सेवार्थ प्रणालीमध्ये, कर्मचारी सेवा समाप्ती प्रक्रियेदरम्यान दिलेल्या तारखेनुसार कर्मचाऱ्याच्या सेवेची समाप्तीची तारीख आपोआप अद्यावत होते. जर या टप्प्यावर चुकीची तारीख टाकली गेली, तर ती नोंदीमध्ये प्रतिबिंबित होते, ज्यामुळे चुका होतात. या विसंगती मॅन्युअल इनपुटमधील चुकांमुळे उद्भवतात, कारण पूर्वी प्रणालीमध्ये सेवेच्या समाप्तीची तारीख अपेक्षित निकषांनुसार तपासण्यासाठी व्हॅलिडेशनची सोय नव्हती. तथापि, आता सेवार्थ ॲप्लिकेशनमध्ये कठोर व्हॅलिडेशन नियम लागू केले आहेत.

तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाने इनपुट व्हॅलिडेशनच्या अभावामुळे मॅन्युअल इनपुटमधील चुकांमुळे उद्भवलेल्या या विसंगती स्वीकारल्या असल्या तरी, सेवार्थ मॉड्यूलमध्ये प्री-व्हॅलिडेशन नियंत्रण अंमलबजावणीशी संबंधित डेटासाठी डेटा दुरुस्तीची (डेटा क्लीनअप) आवश्यकता आहे.

2.2.15.5 रेफरेंशियल इंटिग्रिटी कन्स्ट्रेंट्स अभाव

अ) एम्प्लॉई मास्टर तक्त्यामध्ये 9,78,861 कर्मचाऱ्यांचा तपशील होता, ज्यामध्ये कर्मचाऱ्याचे नाव, जन्मतारीख, रुजू होण्याची तारीख आणि सेवेच्या समाप्तीची तारीख यांचा समावेश होता. या तक्त्याच्या डेटा विश्लेषणातून असे दिसून आले की:

36 प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्याचे नाव, जन्मतारीख, रुजू होण्याची तारीख आणि सेवेची समाप्तीची तारीख याशिवाय कर्मचारी संकेतांक तयार करण्यात आला होता.

यावरून असे दिसून येते की, प्रणाली मास्टर आणि व्यवहारात्मक डेटामधील महत्त्वपूर्ण रेफरेंशियल इंटिग्रिटी तपासणी लागू करत नाही.

हे निदर्शनास आणल्यावर या त्रुटीची विविध कारणे देत, शासनाने उत्तरात सांगितले (जुलै 2025) की, डेटाची विश्वासार्हता राखण्यासाठी या जुन्या नोंदींचे (लेगसी रेकार्ड्स) पुनरावलोकन आणि शुद्धीकरण केले जाईल आणि भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी प्रमाणिकरण नियमांमध्ये सुधारणा केल्या जात आहेत.

ब) 13 कर्मचाऱ्यांच्या ओळख संकेतांकमध्ये, कर्मचाऱ्यांच्या नावाऐवजी विविध पदांच्या नोंदी (जसे कि सहाय्यक पोलीस निरीक्षक, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक इत्यादी) आढळल्या.

यावरून असे दिसून येते की, प्रणाली मास्टर आणि व्यवहारात्मक डेटामधील महत्त्वपूर्ण रेफरेंशियल इंटिग्रिटी तपासणी लागू करत नाही.

उत्तरादाखल शासनाने सांगितले (जुलै 2025) की, हे संकेतांक वैयक्तिक कर्मचाऱ्यांच्या नोंदींशी जोडलेले नव्हते, कारण ते सर्वसमावेशक कर्मचारी मास्टर डेटाशी संबंधित नव्हते.

तथापि, वस्तुस्थिती ही आहे की, जरी शासनाने या विसंगती स्वीकारल्या असल्या तरी, शासनाने डेटाबेसमध्ये रेफरेंशियल इंटिग्रिटी लागू करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत.

2.2.16 निष्कर्ष

आयटी लेखापरीक्षणाचा उद्देश आयएफएमएसच्या प्रकल्प व्यवस्थापन, सामान्य नियंत्रणे आणि ॲप्लिकेशन नियंत्रणांची तपासणी करणे हा होता. आयएफएमएसमध्ये काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर एनआयसी आणि टीसीएसद्वारे पाच वेब-सक्षम मॉड्यूल्सचा विकास करणे समाविष्ट होते. जून 2024 पर्यंत, आयएफएमएस प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च ₹ 38.58 कोटी होता.

लेखापरीक्षणामध्ये एसएलएमध्ये नमूद केलेल्या प्रमुख घटकांच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आढळल्या. पीएमटी आणि पीकेआय विकसित आणि कार्यान्वित करण्यात आलेल्या अपयशामुळे प्रकल्प देखरेख आणि डेटा सुरक्षा या दोन्हींशी तडजोड झाली. आयएफएमएस पायाभूत सुविधा केंद्रीय स्तरावर स्थापीत केलेल्या आणि भौतिकदृष्ट्या सुरक्षित असल्या तरी, वापरकर्ता स्तरावर काही असुरक्षितता होत्या, उदा. विनापरवाना सॉफ्टवेअरचा वापर, सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशनवर निर्बंधांचा अभाव आणि यूएसबीसारख्या बाह्य उपकरणांचा अनियंत्रित वापर. या त्रुटींमुळे प्रणाली संभाव्य सुरक्षा उल्लंघने, मालवेअर धोके आणि संवेदनशील वित्तीय डेटामध्ये अनधिकृत प्रवेशासाठी असुरक्षित बनते.

दोन-घटकीय प्रमाणिकरण आणि प्रमुख मॉड्यूल्समध्ये एन्क्रिप्शनचा अभाव, पासवर्ड धोरणांची अपुरी अंमलबजावणी, वापरकर्ता खाते लॉकआउट यंत्रणेचा अभाव आणि अयोग्य भूमिका व वापरकर्ता व्यवस्थापन यांसारख्या अनेक गंभीर सुरक्षा आणि प्रवेश/पोच नियंत्रण त्रुटी आढळल्या. या त्रुटींमुळे प्रणाली अनधिकृत प्रवेश, डेटा उल्लंघन आणि अंतर्गत गैरवापरासाठी बळी पडू शकते.

विविध मॉड्यूल्समध्ये डेटा विश्वासार्हता, प्रमाणिकरण नियंत्रणे आणि प्रणाली डिझाइनमध्ये काही कमतरता आहेत. मास्टर तक्त्यामधील दुबार नोंदी, अपंजीकृत किंवा दुबार लाभार्थ्यांसाठी दाव्यांवर प्रक्रिया करणे आणि रेफरेंशियल व कंपोझिट कि (Key) मर्यादांचा अभाव यामुळे आर्थिक व्यवहारांच्या विश्वासार्हतेशी तडजोड झाली.

शिफारशी:

- प्रकल्पाच्या उर्वरित घटकांची पूर्तता सुनिश्चित करावी.
- महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण 2011 नुसार तार्किक हाताळणी नियंत्रणे (लॉजिकल ॲक्सेस कंट्रोल्स) लागू असावीत.
- आयएफएमएसच्या कार्य निष्पादनाचे नियमितपणे मूल्यांकन करण्यासाठी एक मजबूत अभिप्राय यंत्रणा सुनिश्चित करावी.
- डेटाच्या विश्वासार्हतेसाठी पुरेशी अनुप्रयोग नियंत्रणे (ॲप्लिकेशन कंट्रोल्स) लागू करावी.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

2.3 ₹ 94.39 कोटींचा वायफळ खर्च

'सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील 53 गावांना पाणी पुरवठा' बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल चुकीचा बनविल्यामुळे ₹ 94.39 कोटींचा वायफळ खर्च आणि पाणी पुरवठा योजना भौतिकरित्या पूर्ण होऊनही सुरू न होणे

महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने 'सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील 53 गावांना पाणी पुरवठा' करण्याच्या योजनेला ₹ 91.09 कोटींची प्रशासकीय मान्यता (प्र.मा.) दिली (30 जानेवारी 2014), ज्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) चे सदस्य सचिव यांनी ₹ 83.57 कोटींची तांत्रिक मंजुरी (टीएस) दिली (13 जानेवारी 2014).

योजनेचा खर्च मर्यादित ठेवण्यासाठी, सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करताना (2014), 'सावलाज पाणी पुरवठा योजने'साठी 2004 मध्ये टाकण्यात आलेली 29.50 किमी लांबीची सध्या अस्तित्वात असलेली माइल्ड स्टील पाइपलाइन या योजनेसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. डीपीआर तयार करतेवेळी, एकूण 15 वर्षे आयुर्मान असलेली सध्याची पाइपलाइन 10 वर्षे जुनी झाली होती.

प्रशासकीय मान्यतेच्या ₹ 91.09 कोटीमध्ये स्थापत्य आणि विद्युत कामे यासोबतच भूसंपादनाचा खर्च, कामाचे सर्वेक्षण आणि अंदाज, नवीन संपवर नवीन जोडणीची तरतूद, पाईप खरेदी आणि इतर विविध खर्च आणि कर यांचा समावेश होता. कार्य. अभि., एमजेपी विभाग, सांगली यांनी ऑगस्ट 2014 ते जून 2019 दरम्यान चार निविदांद्वारे, पाईप विभागाद्वारे पुरविले जाऊन, सिव्हिल आणि मेकॅनिकल कामे दिली. चार निविदेतील कामे जून 2017 ते नोव्हेंबर 2019 दरम्यान पुर्ण करायची होती.

दरम्यान, कार्य. अभि., एमजेपी, सांगली यांच्या प्रस्तावावर, खर्चातील वाढ आणि नवीन बाबी विचारात घेवुन महाराष्ट्र शासनाने ₹ 103.85 कोटींची सुधारित प्र.मा. (22 फेब्रुवारी 2019) दिली, ज्यासाठी मुख्य अभियंता (मु.अभि.), एमजेपी, पुणे यांनी ₹ 96.02 कोटींची सुधारित टीएस (12 सप्टेंबर 2017) दिली.

योजना भौतिकदृष्ट्या ₹ 94.39 कोटीचा खर्च केल्यानंतर पूर्ण झाली (जून 2019). तथापि, सर्व कामे पूर्ण होईपर्यंत, डीपीआरमध्ये वापरासाठी विचारात घेतलेल्या विद्यमान पाईप्सचे 15 वर्षे आयुष्य पूर्ण झाले होते. चाचणी दरम्यान (जुलै 2019) जुन्या पाईपलाईन मध्ये अनेक गळती आढळून आल्या आणि बहुतेक पाईप गंजल्यामुळे खराब झालेले आढळले. जानेवारी 2020 पर्यंत जुन्या पाईपमधील या गळती/नुकसान दुरुस्त करण्याचे विविध प्रयत्न करूनही, ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

वरील तथ्यांवरून, असे दिसून येते कि योजनेसाठी डीपीआर तयार करताना अस्तित्वातील पाईपलाईन वापरण्याच्या निर्णयामुळे प्रकल्पाची व्यवहार्यता बाधीत झाली कारण 'आटपाडी तालुक्यातील 53 गावांसाठी पाणी पुरवठा योजना' जून 2019 मध्ये पूर्ण झाली असूनही ऑक्टोबर 2024 पर्यंत कार्यान्वित होऊ शकली नाही. अशा प्रकारे, त्यावर झालेला ₹ 94.39 कोटींचा संपूर्ण खर्च निष्फळ ठरला. शिवाय, गावकऱ्यांना अपेक्षित पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करता आली नाही.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (जून 2023), मुख्य अभियंता, एमजेपी, पुणे यांनी सांगितले (ऑक्टोबर 2024) की, 98 *टक्के* युटिलिटी काम पूर्ण झाल्यानंतर, योजनेची चाचणी घेण्यात आली (24 जून 2019), परंतु जुन्या एमएस पाईपमध्ये लक्षणीय गळती आढळून आली ज्यामुळे योजना प्रभावीपणे कार्य करू शकली नाही. यापूर्वी, सांगली येथील कार्य. अभि., एमजेपी यांनी सांगितले होते कि उसासाठी जास्त पाण्याचा वापर, रासायनिक अभिक्रिया आणि पाण्याची क्षारता यामुळे पाईपलाईनची स्थिती बिघडली होती, जी डीपीआर तयार करताना निश्चित करता आली नाही. मंत्रालयात झालेल्या बैठकीत (24 फेब्रुवारी 2020) या मुद्द्यावर चर्चा झाली आणि त्यानुसार, 24.50 किमी लांबीच्या पाईपलाईनच्या बदलीचे ₹ 23.31 कोटीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आले (जुलै 2020). पुढे, विभागाने योजना पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले, ज्यासाठी ₹ 44.44 कोटींचे अंदाजपत्रक सादर करण्यात आला (जुलै 2023). महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे योजनेचे खाते बंद करण्याचा प्रस्ताव पुढील निर्णयासाठी पाठवण्यात आले

(फेब्रुवारी 2023). तथापि, आतापर्यंत महाराष्ट्र शासनाकडून कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही (ऑक्टोबर 2024).

लेखापरीक्षणात असा निष्कर्ष निघाला कि डीपीआर टप्प्यावर 15 वर्षांच्या सेवा आयुष्यापैकी आधीच 10 वर्षे पूर्ण झालेल्या पाईपलाईनचा पुनर्वापर करण्याच्या निर्णयावरून असे दिसून आले कि तांत्रिकदृष्ट्या योग्य ती काळजी घेण्यात आली नव्हती. परिणामी भौतिकदृष्ट्या पूर्ण होवुनही वापरात न येणारी पाणी पुरवठा योजना या निर्णयामुळे आरंभीच अव्यवहार्य ठरली. ₹ 94.39 कोटी खर्च होऊनही, ही योजना पूर्ण झाल्यानंतर पाच वर्षांनी (जून 2019) देखील कार्यान्वित करता आली नाही आणि अजूनही असंचालीत आहे (जून 2025). यामुळे 53 गावांना अपेक्षित सेवा पुरविण्यात तडजोडच झाली नाही तर टाळता येण्याजोगा आणि वायफळ खर्चही झाला, ज्यामुळे एमजेपी आणि विभागाच्या नियोजन, तांत्रिक देखरेख आणि आर्थिक सुजाणता यातील कमतरता दिसून आल्या. मुख्य अभियंता, एमजेपी, पुणे यांनी ही योजना अद्याप कार्यरत नसल्याचे सांगीतले (जून 2025).

हे प्रकरण महाराष्ट्र शासनाला कळवण्यात आले (फेब्रुवारी 2025), उत्तर प्रतीक्षित आहे.

2.4 ₹ 97.28 लाखांचा निष्फळ खर्च

महावितरणाचे ₹ 7.77 कोटी थकीत असल्याने बाधीत झालेल्या विद्युत पुरवठ्यामुळे बीड पाणी पुरवठा योजनेसाठी खरेदी केलेली पंपिंग यंत्रसामग्री निष्क्रिय राहिली आणि ₹ 97.28 लाखांचा खर्च निष्फळ ठरला

मुख्य अभियंता (मु.अभि.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी), छत्रपती संभाजीनगर यांनी अटल मिशन फॉर रिजुव्हेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) अंतर्गत 'बीड पाणी पुरवठा योजनेत सुधारणा' या कामासाठी ₹ 127.81 कोटीचे टीएस दिले होते (12 एप्रिल 2017).

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने (युडीडी) दिनांक 19 एप्रिल 2017 च्या जीआरद्वारे, भाग अ-स्थापत्य कामासाठी ₹ 78.34 कोटी आणि भाग ब-यांत्रिक कामासाठी ₹ 36.29 कोटीची प्रशासकीय मान्यता दिली.

असे अपेक्षित होते कि या योजनेच्या कार्यान्वयनाद्वारे बीड शहरातील नगरपरिषद (न.प.) क्षेत्रासाठी सध्याच्या 25 दशलक्ष लिटर प्रतिदिन (एमएलडी) वरून 48.63 एमएलडी पर्यंत पाणी पुरवठा वाढवला जाईल.

योजनेचा एक भाग म्हणून, योजनेच्या यांत्रिकी कामाच्या भागांच्या बाबींसाठीची निविदा कार्यकारी अभियंता (कार्य. अभि.), एमजेपी, बीड यांनी मेसर्स महावीर इलेक्ट्रो मेकॅनिकल प्रायव्हेट लिमिटेड, अकोला (कंत्राटदार) यांना ₹ 15.14 कोटीना दिली (16 जानेवारी 2019). या भागाच्या कामात 495 अश्वशक्ती क्षमतेच्या पाच उभ्या टर्बाइन उपसाधनांसहित पंपाचा पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वयन यांचा समावेश होता. असे नियोजन होते कि 200 अश्वशक्ती क्षमतेचे पाच विद्यमान स्थापित पंप, जे खूप जुने होते, त्याऐवजी पाच नवीन उभे टर्बाइन पंप लावण्यात येतील. हे पाच नवीन पंप बसवले जातील आणि तीन कार्यान्वित केले जातील आणि पाणी पुरवठा यांचे सातत्य सुनिश्चित करण्यासाठी दोन आपत्कालीन परिस्थितीसाठी स्टँडबायवर ठेवले जातील. या नवीन पंपांच्या ऑपरेशनसाठी आवश्यक वीज पुरवठा सध्याच्या 550 केव्हीए वरून 1300 केव्हीए (अतिरिक्त 750 केव्हीए) पर्यंत वाढवायचा होता.

हे काम 15 महिन्यांत (15 एप्रिल 2020 पर्यंत) पूर्ण करण्याचे विहीत करण्यात आले होते. कंत्राटदाराला 11 व्या चालु लेखा बिलापर्यंत कार्य.अभि.यांनी ₹ 12.21 कोटी दिले (ऑगस्ट 2024).

लेखापरीक्षणात आढळून आले कि:

- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) ने जुलै/ऑगस्ट 2018 मध्ये एमसी बीड आणि एमजेपीला कळवले कि 750 केव्हीएचा अतिरिक्त वीज पुरवठा मंजूर करण्यासाठी, एमसी बीडच्या ₹ 7.77 कोटीच्या वीज देयकाची थकबाकी भरणे आवश्यक आहे.
- भाग कामाचा कार्यादेश ज्यात पाच नवीन पंपाची खरेदी अंतर्भुत होती, जानेवारी 2019 मध्ये देण्यात आला.
- कंत्राटदाराने (जून 2019) पाच उभे टर्बाइन पंप त्याच्या उपसाधनांसह ₹ 2.43 कोटी (₹ 0.486 कोटी * 5) किंमतीत खरेदी केले (प्रत्येकी 495 अश्वशक्ती) आणि पुरविले.

- पुरविलेल्या पाच पंपांपैकी, कंत्राटदाराने पुरेशी वीज उपलब्ध नसल्यामुळे पंपिंग स्टेशनच्या ठिकाणी फक्त तीन पंप बसवले आणि उर्वरित दोन पंप आणि त्यांची उपसाधने जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या (डव्ल्युटीपी) ठिकाणी निष्क्रिय ठेवण्यात आले.

अशाप्रकारे, नवीन पंप चालविण्यासाठी 1300 केव्हीए पर्यंत वीजपुरवठा वाढवला गेला नसल्याने, दोन्ही पंप खरेदी केल्यापासून निष्क्रिय राहिले. यामुळे या दोन्ही पंपांच्या खरेदी खर्चापोटी झालेला ₹ 97.28[34] लाखांचा खर्च निष्फळ ठरला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, मुख्य अभियंता, एमजेपी, छत्रपती संभाजीनगर यांनी सांगितले (जुलै 2024) कि, या कार्यालयाने थकबाकी भरण्यासाठी बीड महापालिकेकडे पाठपुरावा केला आहे, परंतु बीड नगरपरिषदेला थकबाकी भरण्यात यश आले नाही. म्हणूनच, कोणताही पर्याय उरला नसल्याने, एमजेपीने एक 495 अश्वशक्ती पंप आणि एक 200 अश्वशक्ती पंप एकत्रित करून योजना अपग्रेड करण्याचा निर्णय घेतला ज्यामुळे 550 केव्हीएच्या ऐवजी 530 केव्हीए पर्यंत वीज वापर मर्यादित होवुन शुद्धीकरण प्रकल्पासाठी 40 एमएलडी पाणी उपलब्ध झाले. या व्यवस्थेमुळे 750 केव्हीएच्या अतिरिक्त वीज भारासाठी 499 प्रति केव्हीए च्या मागणी शुल्काची बचत झाली.

हे उत्तर स्वीकार्य नाही कारण एमएसईडीसीएलने जुलै/ऑगस्ट 2018 मध्ये एमजेपीला कळवले होते कि वीज देयकाची थकबाकी भरल्याशिवाय 750 केव्हीएचा अतिरिक्त वीज पुरवठा मंजूर केला जाणार नाही. अशा परिस्थितीत पाच पंपांची खरेदी आवश्यक असलेल्या पंपांपर्यंत कमी करता आली असती जी वीज भार वाढेपर्यंत सध्याच्या वीज पुरवठ्यासह वापरली जाऊ शकली असती. शिवाय, मागणी शुल्कात बचत करण्याचा विचार पाच नवीन पंप खरेदी करण्यापूर्वी करायला हवा होता.

[34] दोन निष्क्रिय/न वापरलेल्या पंपांची गणना खालीलप्रमाणे आहे: -

वस्तू	प्रति युनिट खर्च (₹)	दोन युनिट्सची किंमत (₹)
उभे टर्बाइन पंप	38,31,281	76,62,562
उभ्या फ्लेंजवर बसवलेली TEFC मोटर	10,32,693	20,65,386
एकूण	**48,63,974**	**97,27,948**

पुढे उत्तर देण्यात आले (नोव्हेंबर 2025) कि विद्यमान 200 अश्वशक्ती पंप पूर्णपणे खराब झाले आहेत आणि ऑपरेशनसाठी अयोग्य आहेत, नवीन पंप सुधारित केले जात आहेत जेणेकरून दोन नवीन पंप (एक कार्यरत + एक स्टँडबाय) आणि 240 अश्वशक्तीचे इतर तीन सुधारित नवीन पंप 40 एमएलडी पर्यंत प्रवाह नियंत्रित करण्यासाठी वापरले जाऊ शकतील. यामुळे उर्वरित दोन पंपांची स्थापना देखील सुलभ होईल.

अशाप्रकारे हे तथ्य कायम आहे कि, आवश्यक वीज भार सुनिश्चित न करता नवीन पंप खरेदी करण्यात आले, ज्यामुळे 2019 मध्ये ₹ 97.28 लाख खर्चून खरेदी केलेले दोन नवीन पंप नोव्हेंबर 2025 पर्यंत निष्क्रिय/विनावापर राहिले.

ही बाब 1 ऑक्टोबर 2025 रोजी शासनाला कळवण्यात आली होती, उत्तर प्रतीक्षित आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

2.5 ₹ 21.73 कोटी शुल्काचे अनियमित वितरण

स्थानिक संस्था, नगरपरिषदा आणि इतर शासकीय विभागांकडून, सविस्तर आराखडे, अंदाजपत्रके तयार करण्यासाठी किंवा तांत्रिक मान्यता देण्यासाठी, आकारण्यात येणाऱ्या ₹ 21.73 कोटी शुल्काचे, सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये अनियमित वितरण

भारतीय संविधानाच्या कलम 266 (2) नुसार, राज्य शासनाला किंवा त्यांच्या वतीने प्राप्त झालेली सर्व महसूली जमा राज्याच्या सार्वजनिक खात्यात जमा करण्यात यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम (एमपीडब्ल्यू) मॅन्युअल, 1984 च्या परिच्छेद 114 मध्ये असे विहित केले आहे कि विभागाच्या प्रत्येक सदस्याने हे लक्षात घेतले पाहिजे कि त्याचा पगार किंवा वेतन हा त्याचा एकमेव कायदेशीर मोबदला आहे आणि शासनाच्या वतीने तो ज्या व्यवसायात किंवा व्यवहारात सहभागी आहे, त्याच्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कमिशन किंवा कोणताही मोबदला मिळणे प्रतिबंधित आहे. शासनाच्या प्रत्येक अधिकाऱ्याला या नियमाचे उल्लंघन झाल्याचे त्याच्या माहितीत आल्यास, तो त्याच्या विभागीय वरिष्ठांना कळवण्यास बांधील आहे.

परिच्छेद 114 च्या परिशिष्ट 5 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (सा.बां.वि.) अधिकाऱ्यांनी खाजगी संस्थेच्या वतीने केलेल्या कामासाठी शुल्क आणि मानधनाची वसुली आणि अनुदान देण्याबाबत नियम विहित केला आहे. यात खाजगी संस्था किंवा संस्थांनांच्या वतीने काम करण्यासाठी विभागाच्या सदस्यांच्या सेवा कोणत्या अटींवर उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात याचा उल्लेख आहे. परिशिष्ट 5 च्या नियम 3 मध्ये असेही म्हटले आहे कि अत्यंत अपवादात्मक परिस्थिती वगळता अधिकाऱ्यांना असे काम करण्याची परवानगी दिली जाऊ नये. जर नियम 3 अंतर्गत अशी परवानगी दिली गेली तर, खाजगी संस्था किंवा संस्थांनांवर आकारण्यात येणारे शुल्क प्रत्येक प्रकरणात शासन निश्चित करेल. परिशिष्ट 5 च्या नियम 4 (ii) मध्ये खाजगी संस्था किंवा संस्थांनांकडून तपशीलवार आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करण्यासाठी किंवा

योजनांची तपासणी करण्यासाठी शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये, प्राप्त झालेल्या शुल्काचे[35] वितरण करण्याची तरतूद आहे.

याशिवाय, परिच्छेद 147 च्या परिशिष्ट 7 मध्ये आस्थापना आणि साधने आणि प्लांट शुल्काच्या वितरणाबाबत नियम विहित आहेत ज्यात परिशिष्ट 7 च्या नियम 9 मध्ये स्थानिक संस्था किंवा खाजगी संस्था किंवा व्यक्ती किंवा केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाच्या वतीने सा.बां.वि.द्वारे आराखडे आणि अंदाजपत्रके तपासणी करणे यासाठी शुल्क आकारण्याचे विनिर्दिष्ट आहेत.

वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाच्या 7 सप्टेंबर 1992 च्या परिपत्रकाद्वारे, सर्व विभागांना सूचना जारी केल्या आहेत, ज्यामध्ये सर्व महत्त्वाच्या आर्थिक बाबींच्या संदर्भात वित्त विभागाचे मत/मंजुरी घेणे अनिवार्य करण्यात आले होते.

एमपीडब्ल्यू मॅन्युअलच्या परिशिष्ट-42 परिच्छेद 135 बाबत 16 डिसेंबर 2015 च्या जीआरनुसार, मु.अभि. हे तांत्रिक मंजुरी देण्यासाठी सर्वोच्च अधिकारी आहे.

शिवाय, तपशीलवार आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करण्यासाठी किंवा योजना इत्यादींच्या तपासणीसाठी शासन आणि संबंधित अधिकाऱ्यामध्ये प्राप्त झालेल्या शुल्काचे वितरण हे केवळ खाजगी संस्था किंवा संस्थांना मिळालेल्या शुल्काच्या संदर्भात आहे, स्थानिक संस्था किंवा केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या कोणत्याही विभागासंदर्भात नाही.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासनाच्या 25 फेब्रुवारी 2019 च्या जीआर द्वारे, इतर शासकीय विभाग किंवा स्थानिक संस्था किंवा खाजगी संस्थेकडून आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करण्यासाठी/तपासणी करण्यासाठी किंवा टीएस प्रदाणासाठी वसूल केलेले शुल्क आणि प्रभार, शासन आणि

---

[35] शुल्क म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या किंवा भारतातील इतर कोणत्याही सरकारच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त इतर स्रोतातून शासकीय कर्मचाऱ्याला दिले जाणारे आवर्ती किंवा अनावर्ती देयक, मग ते शासकीय कर्मचाऱ्याला थेट दिले गेले असो किंवा सरकारच्या मध्यस्थीने अप्रत्यक्षपणे दिले गेले असो, परंतु त्यात (i) अनुर्जित उत्पन्न जसे की मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न, लाभांश आणि प्रतिभूतींवरील व्याज, आणि (ii) साहित्यिक, सांस्कृतिक किंवा कलात्मक, वैज्ञानिक किंवा तांत्रिक प्रयत्नांमधून मिळणारे उत्पन्न, जर असे प्रयत्न शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या सेवेच्या काळात मिळवलेल्या ज्ञानाच्या साहाय्याने केलेले नसतील, यांचा समावेश होत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये वितरित करण्याची प्रक्रिया विहित केली आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे कि ही प्रक्रिया एमपीडब्ल्यू मॅन्युअलच्या परिशिष्ट-5 च्या नियम 4(ii) आणि परिशिष्ट-7 च्या नियम 9 च्या तरतुदींनुसार आहे.

या जीआरमध्ये वसूल केलेल्या शुल्कापैकी रक्कम मापणासाठी 'वितरण समिती[36]' स्थापन करण्याचे विहित केले आहे. अशा वसूल केलेल्या रकमेपैकी, 50 *टक्के* रक्कम शासकीय खात्यात जमा केली जाईल आणि उर्वरित रक्कम सा.बां.वि.च्या अधिकाऱ्यांमध्ये वितरित केली जाईल, जसे कि खाली तपशीलवार सांगितले आहे-

अ. संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना 25%

- i. उपअभियंता - 20%
- ii. कार्यकारी अभियंता - 20%
- iii. अधीक्षक अभियंता - 20%
- iv. मुख्य अभियंता - 20%
- v. आस्थापना - 20% (संबंधित मंजुरी कार्यालयाचे अधिकारी)

ब. 10% अधी.अभि. गुणवत्ता नियंत्रण मंडळ

क. 15% शासकीय स्तरावरील नियंत्रण अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे:

- i. डेस्क अधिकारी - 10%
- ii. अवर सचिव - 15%
- iii. उपसचिव - 30%
- iv. सचिव - 25%
- v. प्रधान सचिव - 20%

सात[37] प्रदेशांमध्ये, 2019-2022 या वर्षात स्थानिक संस्था, नगरपरिषदा आणि इतर शासकीय विभागांकडून ₹ 53.44 कोटी शुल्क वसूल करण्यात आले, त्यापैकी ₹ 21.73 कोटी (40.66 *टक्के*) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये/कर्मच्या-यांमध्ये (***परिशिष्ट 2.5.1*** मध्ये तपशीलवार

---

[36] संबंधित मु.अभि. अध्यक्ष म्हणून, संबंधित अधी.अभि. सदस्य म्हणून आणि संबंधित कार्य. अभि. सदस्य सचिव म्हणून

[37] अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण, नांदेड, नागपूर, नाशिक आणि पुणे

सांगितल्याप्रमाणे) वितरित करण्यास मान्यता देण्यात आली, ज्यामध्ये विभाग स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये (एसीएस ते डेस्क ऑफिसरपर्यंत) वितरित करावयाचे ₹ 8.14 कोटी समाविष्ट होते. सात प्रदेशांकडून प्रत्यक्ष देयकाची माहिती मागवण्यात आली होती, तथापि, केवळ चार[38] विभागांच्या बाबतीत देयकाची माहिती उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्यामध्ये अंदाजपत्रकाच्या तांत्रिक तपासणीसाठी शुल्क म्हणून प्राप्त झालेल्या ₹ 9.99 कोटीपैकी ₹ 4.03 कोटी प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना वितरित/अदा करण्यात आले होते. उर्वरित विभागांच्या बाबतीत प्रत्यक्ष देयकाची माहिती उपलब्ध नाही.

लेखापरीक्षणात (जानेवारी 2023) असे आढळून आले कि

- एमपीडब्लु मॅन्युअलच्या परिशिष्ट-5 च्या नियम 4(ii) मध्ये खाजगी संस्था किंवा संस्थांनांकडून मिळालेल्या शुल्काच्या वितरणाबाबत तरतुद केली आहे जिथे अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत परवानगी दिली जाते. वितरण केस-टू-केस आधारावर करावयाचे असते.
- एमपीडब्लु मॅन्युअलच्या परिशिष्ट-7 च्या नियम 9 मध्ये फक्त आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करण्यासाठी आणि तपासणीसाठी शुल्क आकारण्याचे विहित केले आहे.
- एमपीडब्लु मॅन्युअलमध्ये इतर शासकीय विभाग किंवा स्थानिक संस्थांकडून मिळालेल्या शुल्काचे विभागीय कर्मचाऱ्यांमध्ये वितरण करण्याची तरतूद नाही.
- 25 फेब्रुवारी 2019 रोजीचा जीआर वित्तीय बाबींशी संबंधित होता, एफडी, जीओएमची सहमती आवश्यक होती, जी विभागाने मिळवली नव्हती.
- जरी, विभाग स्तरावरील अधिकाऱ्यांची (एसीएस पासून डेस्क ऑफिसरपर्यंत) अंदाजांच्या तपासणीमध्ये आणि टीएसच्या प्रदानासाठी ईत्यादि, कोणतीही भूमिका नव्हती, तरीही त्यांच्यामध्ये ₹ 8.14 कोटी वाटण्यास मान्यता देण्यात आली.

या प्रकरणाचे प्राथमिक कारण म्हणजे विभागाने एमपीडब्लु मॅन्युअलच्या परिशिष्ट 5 आणि 7 मधील तरतुदीं अयोग्य प्रकारे लागु करुन त्यांची व्याप्ती शासकीय विभाग आणि स्थानिक संस्थांकडून वसूल केलेल्या शुल्कापर्यंत वाढवली

[38] पीडब्ल्यूडी, बीड, उत्तर जळगाव, अहिल्यानगर आणि कळवण

जेव्हा कि या तरतुदी स्पष्टपणे खाजगी संस्थांपुरत्या मर्यादित आहेत आणि अशा वितरणाला परवानगी देत नाहीत.

यामागे एक योगदानात्मक कारण देखील होते. 25 फेब्रुवारी 2019 रोजीचा शासन निर्णय वित्त विभागाची अनिवार्य संमती न घेता, 07 सप्टेंबर 1992 च्या वित्त विभागाच्या परिपत्रकाचे उल्लंघन करून जारी करण्यात आला.

शेवटी, कमकुवत अंतर्गत नियंत्रणामुळे हे शक्य झाले. पुरेशी कायदेशीर आणि वित्तीय तपासणी न करता सदर जीआर जारी झाला यावरुन धोरण तयार करणे आणि वित्तीय प्रशासनात अंतर्गत नियंत्रण यंत्रणेची कमतरता असल्याचे दिसून येते.

परिणामी, स्थानिक संस्था, नगरपरिषदा आणि इतर शासकीय विभागांवर आकारण्यात आलेले ₹ 21.73 कोटी शुल्क विभागीय कर्मचाऱ्यांमध्ये वाटपासाठी अनियमितपणे मंजूर करण्यात आले, ज्यामुळे शासकीय महसूल अनधिकृतपणे वळवला गेला.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर (जानेवारी 2023 आणि मे 2024), एसीएस, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी (फेब्रुवारी 2023 आणि नोव्हेंबर 2025) सांगितले कि, 25 फेब्रुवारी 2019 रोजीचा संदर्भित जीआर एमपीडब्ल्यू मॅन्युअलच्या तरतुदींनुसार, विशेषतः परिशिष्ट 5 आणि 7 आणि 18 मार्च 2004 आणि 05 ऑक्टोबर 2004 रोजीच्या जीआरचा (एफडीच्या संमतीने जारी केलेला) संदर्भ घेऊन जारी करण्यात आला होता. तथापि, त्यांनी लेखापरीक्षणाचा युक्तिवाद स्वीकारला आहे कि जीआर (25 फेब्रुवारी 2019) ला एफडीची कोणतीही मान्यता नव्हती. लेखापरीक्षा आक्षेपाच्या पार्श्वभूमीवर, हा जीआर 8 एप्रिल 2025 पासून स्थगित ठेवण्यात आला आहे. विभागाने आता म्हटले आहे कि त्यांनी एफडीकडून पूर्व-प्रत्यक्ष मंजुरीसाठी प्रस्तुत केला आहे.

खालील कारणांमुळे उत्तर स्वीकार्य नाही:

i) 18 मार्च 2004 आणि 5 ऑक्टोबर 2004 चा जीआर हा व्हीक्यूसीसीच्या प्रयोगशाळेच्या चाचणी शुल्क/अधिभाराबाबत आहे तर 25 फेब्रुवारी 2019 चा जीआर हा आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करणे/ तपासणी करणे किंवा टीएस देण्याबाबत जारी करण्यात आला होता.

ii) एमपीडब्लु मॅन्युअलच्या परिशिष्ट-5 च्या नियम 4(ii) आणि परिशिष्ट-7 च्या नियम 9 च्या तरतुदींमध्ये, 25 फेब्रुवारी 2019 च्या जीआर मध्ये विभागाने अनुमानित केल्याप्रमाणे इतर शासकीय विभाग किंवा स्थानिक संस्थांकडून मिळालेल्या शुल्काचे वितरण विभागीय कर्मचाऱ्यांमध्ये करण्याचे निर्देश नाहीत.

iii) 18 मार्च 2004 आणि 5 ऑक्टोबर 2004 च्या जीआर मध्ये असेही नमूद केले आहे कि "अधिकारी/कर्मच्या-यांना द्यावयाची रक्कम त्या वर्षात अशा व्यक्तीला मिळणाऱ्या एका महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसावी. शिवाय, जर खाजगी संस्था, खाजगी व्यक्ती किंवा निम-शासकीय संस्थांकडून मिळालेले चाचणीचे काम कार्यालयीन वेळेत आणि कार्यालयीन कामाचा भाग म्हणून केले गेले, तर या कामाच्या अधिभारातील रक्कम मोबदला म्हणून दिली जाणार नाही". 25 फेब्रुवारी 2019 च्या जीआर मध्ये अशी कोणतीही अट नमूद केलेली नव्हती. शिवाय, 25 फेब्रुवारी 2019 च्या जीआरमध्ये व्हीक्यूसीसीच्या प्रयोगशाळेच्या चाचणी/अधिभारासाठी एक महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसण्याची अट देखील रद्द करण्यात आली होती.

2.6 ₹ 1.34 कोटी बोनसचे अनियमित प्रदान

सवलत करारात तरतुद नसताना टप्प्याच्या शीघ्र साध्यतेसाठी सवलतधारकाला ₹ 1.34 कोटी बोनसचे अनियमित प्रदान

हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल (हॅम)[39] पॅकेज AM-78B अंतर्गत वाशिम जिल्हयातील शेलू वाशिम रस्त्याचे (एमडीआर-1, लांबी-32 किमी) दुतर्फा कडे असलेल्या दुपदरी रस्त्यात सुधारणा करण्याचे काम मेसर्स आर.बी. घोडके यांना मेसर्स जय साई कन्स्ट्रक्शन (सवलतधारक) यांच्यासह बोली प्रकल्प खर्च (बीपीसी)

[39] हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल ही एक संतुलित पीपीपी चौकट आहे, जिथे सरकार आणि खाजगी क्षेत्र दोन्ही प्रकल्पाचा खर्च आणि जोखीम वाटून घेतात, ज्यामुळे शाश्वत पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळते. बोली प्रकल्प खर्चाच्या 60 *टक्के* रक्कम, बांधकाम कालावधीत सवलतधारकाला प्रत्येकी 12 टक्क्यांच्या 5 समान हप्त्यांमध्ये (टप्पा I ते V) देय असेल. उर्वरित 40 *टक्के* बोली प्रकल्प खर्च, व्यावसायिक कार्यान्वयनाच्या दिवसापासून सुरू होणाऱ्या 20 द्विवार्षिक हप्त्यांमध्ये (ॲन्युइटी) देय असेल.

₹ 107.77 कोटीवर आणि पहिल्या वर्षाच्या संचालन आणि देखभाल खर्चासाठी (ओ ॲन्ड एम) ₹ तीन कोटीवर देण्यात आले (नोव्हेंबर 2018).

- सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बां.वि.) आणि सवलतधारक यांच्यामध्ये सवलत करार (सीए) (डिसेंबर 2018) निष्पादित करण्यात आला.
- नियुक्ती तारीख 25 जानेवारी 2019 रोजी घोषित करण्यात आली आणि नियुक्ती तारखेपासून 24 महिन्यांत (24 जानेवारी 2021 पर्यंत) काम पूर्ण करायचे होते.
- पुढे, मेसर्स एम.एस. कंसल्टंट्स जेव्ही कृष्णा टेक्नो कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड यांची स्वतंत्र अभियंता (आयई) म्हणून नियुक्ती करण्यात आली (मे 2019).
- आयईने पूर्णत्व प्रमाणपत्र जारी केले आणि व्यावसायिक संचालन तारीख (सीओडी) 30 नोव्हेंबर 2020 म्हणुन घोषित केली.
- एकूण पूर्णत्वाचा खर्च ₹ 111.09 कोटी होता, ज्यापैकी ₹ 68.81 कोटी बांधकाम कालावधीत देण्यात आले आणि उर्वरित ₹ 42.28 कोटी संचालन कालावधीत ओ अँड एम प्रदानासह ॲन्युइटी म्हणून देण्यात आले.
- चौथी ॲन्युइटी (वार्षिक व्याज आणि ओ अँड एम सह) ₹ 4.43 कोटी देण्यात आली. (डिसेंबर 2022)

सीएच्या कलम 23.5 मध्ये असे म्हटले आहे कि, जर सवलतधारकाने पूर्णत्वाच्या नियोजित तारखेच्या (एससीडी) 30 दिवस आधी किंवा त्याहून अधिक दिवस आधी सीओडी गाठली तर, प्राधिकरण सवलतधारकाला पहिल्या 30 दिवसांसाठी बीपीसीच्या 60 *टक्के* च्या 0.5 *टक्के* इतका बोनस देईल ज्याद्वारे सीओडी एससीडीच्या आधी येईल आणि त्यानंतर उक्त बोनसची गणना उक्त 30 दिवसांच्या कालावधीच्या आधीच्या प्रत्येक दिवसासाठी प्रोरेटाच्या आधारावर केली जाईल. हा बोनस सवलतधारकाला पहिल्या ॲन्युइटी प्रदानासोबत देय असेल. सीएमध्ये टप्पे लवकर साध्य करण्यासाठी कोणतीही तरतूद नव्हती.

